# ‘स्व’–रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २००९

**संस्थेचे पदाधिकारी**

श्री. जयसिंहभाई मरिवाला

श्री. पुरूषोत्तमभाई श्रॉफ

श्री. श्रीकांत सामळ

श्री. शिरीष पटवर्धन

**संपादक**

श्री. जयंत कवठेकर

**संपादकीय मंडळ**

श्री. सुनील कुलकर्णी

श्री. कृ. गो. लवळेकर

**दूरध्वनी संपर्क**

श्री. जयंत शंकर कवठेकर

संपर्क दूरध्वनी क्र. (घर) २४२२१२९४

(कार्यालय)२६१२१७०४, २६१३४३१०

किंमत रूपये ५/–

वार्षिक वर्गणी रूपये १००/–

(विशेषांकासह)

आजीव सभासद फी – रू.१०००/– फक्त

चेक अथवा ड्राफ्ट ‘स्व’–रूपवर्धिनी या

नावाने काढावा.

## *अंतरंग*

- हृद्‌गत
- मुखपृष्ठ कथा
- संक्षिप्त वार्षिक वृत्त
- विशेष लेख
- आर्थिक स्थिती व आवाहन

**छपाई**

प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.

सर्व कायदेशीर बाबी पुणे कोर्टाच्या अखत्यारीत. हे मासिक ‘स्व’–रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष पटवर्धन, यांनी प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.

**वार्षिक विशेषांक** **मुखपृष्ठ :** श्री. अवधूत फडणीस

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यकारिणी

## सन्माननीय सभासद

* पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर * श्री. प्रमोद चौधरी

* श्री. पुरुषोत्तमभाई श्रॉफ (सन्माननीय पूर्व अध्यक्ष)

### *संस्थापक सदस्य*

- *श्री. पु. व. श्रॉफ*
- *कां. गि. शहा*
- *कृ. ल. पटवर्धन*
- *श्री. श्री.शं. सामळ*
- *श्री. कृ. गो. लवळेकर*
- *अ. न. गोगावले*
- *श्री. रा. प. देसाई*
- *श्री. वा. दे. संचेती*
- *दत्तोबा तांबे*

### *विद्यमान कार्यकारी समिती*

***अध्यक्ष***

*श्री. जयसिंहभाई मरिवाला*

***उपाध्यक्ष***

*श्री. प्रतापराव पवार*
*श्री. उदय गुजर*
*श्री. अविनाश वारदेकर*
*श्री. आर. ए. मेहता*

***सहकार्याध्यक्ष***

*श्री. श्रीनिवास तथा रमेश जोशी*
*श्री. शिरीष पटवर्धन*

***कोषाध्यक्ष***

*श्री. श्रीकांत सामळ*

***सहकार्यवाह***

*श्री. ज्ञानेश पुरंदरे*
*श्री. अविनाश जोशी*
*श्रीमती पुष्पाताई नडे*

***सदस्य***

- *श्री. संजय तांबट*
- *श्री. कन्हैयालाल बलदोटा*
- *श्री जयंत कवठेकर*
- *श्री. रामभाऊ डिंबळे*
- *ॲड. सौ. निलिमाताई गोखले*
- *सौ. बागेश्री पोंक्षे*
- *प्रा. डॉ. राजेंद्र देवपूरकर*
- *श्री. सुनील कुलकर्णी*
- *श्री. विश्वास कुलकर्णी*
- *श्री. विनोद बिबवे*
- *कु. दीपाली पवार*
- *श्री. अरविंद केळकर*
- *श्री. पराग लकडे*
- *श्री. कल्याण वर्दे*
- *प्रा. सौ. छाया सकटे*
- *मेजर श्री. किरण कुडलिंगार*
- *श्री. अजय कदम*
- *सौ. मेघना अत्रे*

**पंजिकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे.**

**फॉरिन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र.८३९३०६०**

संपर्काचा पत्ता : - 'स्व'-रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.

दूरध्वनी : - (कार्यालय) - २६१२१७०४, २६१३४३१०

**100% Exemption available under Sec. 35-AC of the Income Tax Act 1961**

**(For the period 2008-2009 to 2010-2011)** PAN No. : AAATS 5461K

भ्रमण दूरध्वनी क्र. ९८२२६७५७६५ (पटवर्धन) ९८२२६७५७६० (पुरंदरे) ९८२२८२३७५७ (श्रीमती नडे)

ई-मेल : wardhinee@gmail.com वेबसाईट : http://www.swaroopwardhinee.org


**धनादेश 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

# हृद्गत

*येणाऱ्या प्रत्येक नव्या वर्षाबरोबर इतिहासाचीही काही पाने नकळत उलगडली जातात. आपल्या देशाच्या इतिहासातील अनेक पाने ही पराक्रमांनी, समर्पणाच्या घटनांनी भरलेली आहेत. अशा प्रेरणादायी इतिहासाचे स्मरण होणे आजच्या काळात तर आणखीनच महत्त्वाचे. स्वातंत्र्याची अखेरची लढाई ही प्रामुख्याने ब्रिटिशांविरुद्ध होती. आज कदाचित प्रत्यक्ष गुलामी कोणत्या देशाला भोगावी लागणार नाही परंतु विस्तारवादी आणि भोगवादी विचारसरणी असलेले प्रबळ देश आर्थिक ताकदीच्या बळावर अप्रत्यक्ष गुलामी लादण्याचा प्रयत्न करीत राहणार. विश्व व्यापार संघटना, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी संघटना अशा बुरख्यांच्या आडून आणि आकर्षक योजनांच्या आडून जगातील कमकुवत राष्ट्रांचे अस्तित्व पुसण्याचे अनेक प्रयत्न विकसित देश करताना दिसतात. या पार्श्वभूमीवर आजची लढाई ही अधिक अवघड आहे. आजची लढाई ही चाणाक्षपणाची, बुद्धिमत्तेची परीक्षा पाहणारी आहे. आपली बुद्धिमत्ता ही आपल्या देशाच्या संपत्तीत भर घालण्याचे साधन बनेल अशी प्रेरणा तरुणांच्या आणि बालांच्या मनात जागी करावी लागेल. असे काम करणे म्हणजे 'स्व'-रूपवर्धिनीचे काम करणे. गेल्या तीस वर्षापासून वर्धिनीने संपर्कात आलेल्या प्रत्येक वर्धक-वर्धिकेच्या मनात देशभक्तीचा संस्कार रुजविण्याचा प्रयत्न केला आहे.*

*देशातील बुद्धिमत्तेला/प्रतिभेला जेव्हा प्रखर राष्ट्रभक्तीची जोड मिळेल त्यावेळी भारत हा जगातील सर्वांत सामर्थ्यशाली आणि जगाला आधार वाटणारा देश झालेला असेल. हा सुदिन लवकर येण्यासाठीही इतिहासाचे स्मरण करणे आवश्यक आहे. वर्ष २००९ हे त्या अर्थानेही फार महत्त्वाचे होते. लंडनला उच्चशिक्षण घेण्यासाठी गेलेल्या आणि तेथील वातावरणात रमलेल्या 'मदनलाल धिंग्रा' नावाच्या तरुणाला जेव्हा 'सावरकर' नावाच्या देशभक्तीने भारलेल्या परिसाचा स्पर्श झाला त्यातून 'क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा' प्रकट झाले. कर्झन वायलीच्या वधाच्या निमित्ताने इतिहासातील पराक्रमाने, समर्पणाने ओथंबलेले एक पान लिहिले गेले. क्रांतिकारक मदनलाल धिंग्रांचे हे जन्मशताब्दी वर्ष. या निमित्ताने आजच्या प्रखर बुद्धिमान भारतीयांनी नव्या रूपात वावरणाऱ्या कर्झन वायलीचा विनाश करण्यासाठी संकल्प करायला हवा. ज्या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या स्पर्शाने मदनलाल धिंग्रा नावाची मशाल प्रज्वलित झाली. त्या स्वा. सावरकरांनी मातृभूमीच्या ओढीने अस्वस्थ होऊन ब्रायटनच्या समुद्रकिनारी 'सागरा प्राण तळमळला' अशा शब्दांत आपल्या भावना प्रकट केल्या. या गीताचेही २००९ हे शताब्दी वर्ष. गुरुदेव शुक्राचार्यांच्या पोटात शिरलेल्या कचाने आपण संजीवनी विद्या शिकायला गेलेलो आहोत हे सदैव स्मरणात ठेवले आणि कोणत्याही मोहात न पडता ती विद्या मिळताच तो देवलोकी परत आला. योग्य वेळ येताच आपल्या देशात परतण्याचा विचार उच्च शिक्षण, नोकरी व्यवसाय करण्याच्या निमित्ताने विदेशी गेलेल्या भारतीय तरुणांच्या मनात दृढ व्हायला हे गीत प्रेरणा देईल, म्हणून इतिहासातील हे पानही फार महत्त्वाचे आहे. म्हणूनच या कार्यवृत्ताच्या तळटीपांत स्वातंत्र्यवीर सावरकरांचे प्रेरणादायी, अंतर्मुख करणारे विचारकण व काव्यपंक्ती मुद्दाम दिल्या आहेत. देशभक्तीचा संस्कार जागविण्यासाठी, बुद्धिमत्तेला अधिक धार येण्यासाठी वर्ष २००९ मध्ये वर्धिनीच्या सर्व विभागांमध्ये काय काय कार्यक्रम झाले याचा वृत्तांत तर या वार्षिक कार्यवृत्तात आहेच पण विचारांना अशी दिशा देणारे विशेष लेखही या अंकात समाविष्ट आहेत. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केलेले विचार आणि वेगवेगळ्या कार्यक्रमांना अतिथी म्हणून आलेल्या मान्यवरांनी व्यक्त केलेले विचार हे त्याची खात्री पटवतील असा विश्वास वाटतो. वर्षभर झालेल्या कामाचा आनंद जरूर आहे पण समाधान नाही कारण करण्यासारख्या अनेक गोष्टी वेळेच्या मर्यादेमुळे किंवा अपेक्षित बळ न लागल्यामुळे करायच्या राहूनही गेल्या. नव्या वर्षात त्या करण्याचा संकल्प या निमित्ताने आपल्याला साक्षी ठेवून करावा म्हणून हृदगताचे हे निमित्त.*

**धर्माची खरी व्याख्या म्हणजे मनुष्यमात्राचे धारण करणे ही होय.**



# मुखपृष्ठ कथा



वीरमणी मदनलाल धिंग्रांनी १ जुलै, १९०९ या दिवशी भारतमंत्र्यांचा सल्लागार कर्झन वायली याचा वध केला. कर्झन वायलीचा वध आणि त्यानंतरच्या घटनांनी ब्रिटीश सरकार सावरकरांवर कमालीचे संतप्त झाले. त्यांची बॅरिस्टरची सनद रद्द करण्यता आली. त्यांना लंडनमध्ये कुठेही आसरा मिळेना. खाण्यापिण्याचे हाल होऊ लागले. झोप नाही, विश्रांती नाही, अन्न नाही, अशा अवस्थेत निराश मन:स्थितीत सावरकर ब्रायटनला आले. स्वजनांच्या स्मरणाने आणि मातृभूमीच्या विरहाने तळमळणारे सावरकर ब्रायटनच्या समुद्रकिनारी एका कातर क्षणी सागराला न्याहाळीत होते. कविहृदयाच्या या क्रांतिकारकाच्या अलौकिक प्रतिभेतून 'ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला.' या अमर विलापिकेचा जन्म झाला. प्रा. मायदेव यांनी सावरकरांच्या या विलापिकेची पार्श्वभूमी यथार्थ शब्दात मांडली आहे.

सागराला उद्देशून सावरकर म्हणतात, 'हे सागरा! माझ्या भूमातेचे चरण नित्य धुताना मी तुला पाहत होतो. 'अन्य देशी चल जाऊ, सृष्टीची विविधता पाहू' असे तू म्हणालास. माझ्या विरहाच्या कल्पनेने माझी माता अस्वस्थ झाली. तेव्हा 'मी स्वत: याला माझ्या पाठीवर घेऊन जाईन आणि अगदी लवकर परत आणीन' असे तू तिला वचन दिले होतेस. मी तुझ्यावर विश्वास ठेवला आणि मातेला लवकर येईन असे सांगितले.

पण पक्षी जसा पिंजऱ्यात सापडावा किंवा हरीण जसे पाशात शिरावे तशी माझी फसगत झाली आहे. हा भूविरह मी कसा सहन करू? साऱ्या दिशा अंधारल्या आहेत. मी या ठिकाणी गुणरूपी सुमने वेचून जमवली आहेत कारण त्यांचा सुगंध सर्वत्र दरवळावा. पण माझ्या मातृभूमीच्या उद्धाराकरिता या गुणसुमनांचा, माझ्या विद्येचा जर काहीच उपयोग होणार नसेल तर हे सारे व्यर्थ आहे. त्यातच माझ्या प्रिय जनांचाही सहवास मला आता पारखा झाला आहे.

या नभात अनेक नक्षत्रे आहेत पण मला प्यारा आहे तो भरतभूमीचा तारा. येथील प्रासाद भव्य आहेत पण मला माझ्या आईच्या झोपडीचे मोल अधिक आहे. तिच्यावाचून मला राज्य नको. त्यापेक्षा तिच्या वनीचा वनवास मला अधिक प्रिय आहे. हे सागरा तू मला आता आणखीन भुलवू नकोस. ते व्यर्थ आहे. मीच तुला आता तुझ्या पत्नीपासून- सरितेपासून- दूर होण्याची शपथ घालतो आहे.

तुझ्या फेसाळणाऱ्या उन्मत्त लाटांच्या मिषाने तू निर्दयपणे हसून माझी हेटाळणी करतो आहेस. माझ्या मातेला दिलेल्या वचनाचा तू भंग करतो आहेस. तू हे असं का करतो आहेस? तुझ्यावर सध्या स्वामीत्त्व गाजविणाऱ्या आंग्लभूमीला भिऊन? माझ्या मातेला-अबला म्हणून तू फसविले आहेस आणि मलाही यातना दिल्या आहेस. पण लक्षात ठेव की, माझी माता अ-बला नाही. ज्यांनी पळीच्या एका आचमनात तुला पिऊन टाकले होते त्या अगस्ती मुनींना, मी आता हे सर्व सांगणार आहे.

मनाच्या विमनस्क, व्याकुळ अवस्थेतही हा स्वातंत्र्यवीर या गीतातून आपल्याला प्रेरणा देतो की, आपल्या कर्तृत्त्वाचा, विद्यावैभवाचा विनियोग आपल्या मातृभूमीच्या उद्धाराकरिता करणं हेच आपल्या जीवनाचे ध्येय असले पाहिजे, अन्यथा सर्व व्यर्थ आहे. २००९ मध्ये या अमर विलापिकेला शंभर वर्षे पूर्ण झाली. या वर्षीचे मुखपृष्ठ म्हणजे या निमित्ताने स्वातंत्र्यवीरांना, त्यांच्या काव्यप्रतिभेला, जाज्वल्य देशभक्तीला कृतज्ञतापूर्वक केलेले वंदन आहे.

**आपण ज्या देशात जन्मलो व ज्या देवाचे अन्न खाल्ले त्याचे कर्ज फेडल्याशिवाय आपणास स्वर्गाची दारे खुली होणार नाहीत.**

# संक्षिप्त वार्षिक वृत्त

## शाखा विभाग

### संक्रांत उत्सव

दि. १८ जाने. २००९ या दिवशी संपन्न झालेल्या या कार्यक्रमात शारीरिक कौशल्याची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. त्यामध्ये योगासने, सायकलींवरील कसरती, शाखेत खेळले जाणारे खेळ, जाळातील उड्या, दंड, छुरिकायोग व द्वंद्व, वेत्रचर्म, मल्लखांबावरील कसरती या प्रकारांचा समावेश होता. आयकर खात्याचे मुख्य आयुक्त श्री. एम. नरसिमप्पा हे प्रमुख अतिथी म्हणून तर विशेष अतिथी म्हणून सर्वश्री श्री. सुभाषचंद्र नागपाल, हिंदुस्तान एरॉनॉटिक्सचे निवृत्त व्यवस्थापकीय संचालक श्री. कल्याण प्रकाश पुरी, आणि निवृत्त नौदल अधिकारी श्री. पुरुषोत्तम शर्मा हे उपस्थित होते.

### विज्ञान दिन कार्यक्रम

विज्ञान दिनाच्या निमित्ताने रविवार दि. २२ फेब्रुवारीला शाखांतर्गत विज्ञान प्रकल्प स्पर्धा संपन्न झाली. स्पर्धा दोन गटांमध्ये होती.

| गट | | विषय |
|---|---|---|
| पाचवी ते सातवी | : | आपली सूर्यमाला |
| आठवी ते दहावी | : | नाविन्यपूर्ण कल्पना |

स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे सहकार्याध्यक्ष श्री. रमेश जोशी यांच्या हस्ते झाले तर समारोपाला पुण्यातील तरुण संशोधक श्री. राजेंद्र लडकत हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी केलेल्या धडपडींचे कौतुक करून श्री. रमेश जोशी म्हणाले, ''डॉ. अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातील सामर्थ्यवान भारत घडण्यासाठी सर्व देश विज्ञाननिष्ठ घडण्याची आवश्यकता आहे. आपल्या देशानेही प्रगती केली होती, नवी नवी संशोधने जगासमोर मांडली होती असे आपला इतिहास सांगतो, पण आज हे चित्र का दिसत नाही याचा आपण विचार करायला हवा. निसर्गाची संपूर्ण प्रतिकूलता असूनही चिमुरडा इस्राईल देश एवढा बलवान आहे कारण तो देश विज्ञाननिष्ठ आहेत. ह्याच मार्गाने आपल्यालाही वाटचाल करावी लागेल.''

समारोप प्रसंगी विद्यार्थ्यांशी बोलताना श्री. राजेंद्र लडकत म्हणाले, ''नवीन प्रयोग करीत असताना अनेक अडचणी येतात. या अडचणींवर चिकाटीने मात करता येते व अशा धडपडीतून एखादे नवे उपयुक्त उपकरण निर्माण होते.'' यावेळी त्यांनी स्वत: संशोधित केलेले आणि रेल्वेस्थानके स्वच्छ ठेवायला मदत करणारे उपकरण मुलांना दाखविले.

मानव्य संस्थेच्या विद्यार्थ्यांनीही या स्पर्धेत सहभाग घेतला होता.

या स्पर्धेमध्ये लहान गटामध्ये स्वामी सुबोधानंद शाखेच्या व मोठ्या गटामध्ये स्वामी अखंडानंद शाखेच्या प्रकल्पांची निवड करण्यात आली.

### दहावी बारावी शुभेच्छा कार्यक्रम

२२ फेब्रुवारी या दिवशी संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला पुणे जिल्हा परिषदेमधील अधिकारी आणि वर्धिनीच्या कार्यकर्त्या तेजश्रीताई शेंडे यांनी मार्गदर्शन केले. परीक्षेला सामोऱ्या जाणाऱ्या वर्धक-

**कर्तव्यासाठी कर्तव्य करा.**
**कर्तव्याच्या तत्त्वाने आत्मार्पणाचे सामर्थ्य येते.**

वर्धिकांशी बोलताना त्यांनी 'चिमणी आणि विमान' ही रुपककथा सांगितली. कोणावर विसंबून राहून आपण उद्दिष्ट गाठू शकत नाही. त्यासाठी स्वत:चे बळ, आत्मविश्वास वाढविणे हे खूप महत्त्वाचे आहे, असे सांगून, वर्धिनीने आपल्याला किती मोलाचे मार्गदर्शन केलेले आहे याचा विचार प्रत्येकाने करावा असे विचार व्यक्त केले.

**डॉ. आंबेडकर जयंती कार्यक्रम**

'आनंद' पाणपोई : १४ एप्रिल रोजी सकाळी पाणपोयीचे उद्घाटन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील प्राध्यापक श्री. रमेश कांबळे यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी त्यांनी बाबासाहेबांच्या जीवनातील प्रेरणादायी गोष्टी सांगितल्या. तसेच बाबासाहेबांना खरे अभिवादन करायचे असेल तर सलग १८ तास अभ्यास करण्याचा उपक्रम करावा असे आवाहन केले. दिवसभर चाललेल्या या पाणपोयीची सेवा सुमारे ४५०० भाविकांना देता आली. पाणपोयीच्या व्यवस्थेचे काम भगिनी निवेदिता शाखा, आजोळ व संस्कारवर्गाच्या विद्यार्थ्यांनी सांभाळले.

## घारीला हातात धरताना...

आम्ही तिघे नेहमीसारखे त्या दिवशी शाखेत गेलो होतो. शाखा भरायला अवकाश होता. आम्ही नवीन मराठी शाळेच्या दरवाजातून आत शिरलो तर आम्हाला दिसले की शाळेचे एक शिपाईमामा काठीने काहीतरी ढकलत आहेत. आम्ही जवळ जाऊन पाहिले तर पाराजवळ एक घार जखमी होऊन पडली होती. त्या घारीवार उपचार करणे आवश्यक होते पण घार हातात कशी घ्यायची? घार चावणार तर नाही ना? अशी थोडी भीतीही वाटत होती. शेवटी घार हातात धरून, तिला घेऊन आम्ही जवळच्या पोलीस चौकीत गेलो. या जखमी घारीवर उपचार कुठे होतील? असे तेथील पोलिसांना विचारले. त्यांनाही काही सांगता आले नाही. ते एवढेच म्हणाले, की मुलांनो तुम्ही छान काम करताय; या घारीला डॉक्टरकडे घेऊन जा. कोणत्या डॉक्टरकडे न्यावे हेही समजेना. शेवटी एस.पी. कॉलेजसमोर असलेल्या एका डॉक्टरचा दवाखाना गाठला. त्या डॉक्टरांनी खूप मायेनं त्या जखमी घारीवर उपचार केले, मलम दिले. आम्ही त्यांना सांगितले की डॉक्टर आमच्याकडे पैसे नाहीत. डॉक्टर हसले आणि म्हणाले की मला तुमचे पैसे मिळाले, तुम्ही छान मुलं आहात. त्या घारीला घेऊन आम्ही परत शाखेत पोहोचलो. तोपर्यंत शाखेत युवक दादा आले होते. त्यांना सर्व सांगितले मग त्यांनी कात्रज उद्यानातील अधिकाऱ्याशी संपर्क साधला व तेथील एक पक्षीमित्र कार्यकर्ता आला आणि त्या घारीला घेऊन गेला. त्या घारीला त्यांच्या हातात सोपविताना त्या घारीला काय वाटले असेल माहीत नाही; पण आम्हाला मात्र खूप आनंद झाला.

(अक्षय गायकवाड, प्रथमेश बालघरे, कैवल्य पाटसकर)

स्वामी योगानंद शाखा

**कर्तव्याच्या फलाशाविरहित निष्ठेने देशवीरांच्या फाशीचे खांब हे स्वर्गाकडे नेणारे जिने होतात.**

**रक्तदान शिबिर :** १४ एप्रिल रोजी जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने झालेल्या रक्तदान शिबिरात ११८ रक्तपिशव्या संकलित झाल्या. श्री. चेतन कुसाळकर यांनी रक्तदान शिबिराचा समन्वयक म्हणून काम केले.

**व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा**

पुणे शहरातील विविध ज्ञातीसंस्थांमधील ८वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'स्व'-रूपवर्धिनी, केतय्या स्वामी प्रतिष्ठान आणि सामाजिक समरसता मंच यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक २६ एप्रिल रोजी एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे १५० मुला-मुलींनी यामध्ये सहभाग घेतला. कार्यशाळेमध्ये खालील मान्यवरांचे मार्गदर्शन मिळाले.

| **वक्ते** | **विषय** |
| --- | --- |
| डॉ. प्रदीपराव आगाशे | व्यक्तिमत्त्व विकासाचे विविध पैलू |
| डॉ. सुभाषराव देशपांडे | विविध कर्तृत्त्वक्षेत्रांचा परिचय, ध्येयनिश्चिती व क्षमतावर्धन. |

दुसरी कार्यशाळा २८ जून रोजी संपन्न झाली. या कार्यशाळेला सुमारे १३० विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. प्रदीप आगाशे यांनी 'गट्टी गणिताशी' हा विषय रंजकतेने शिकवून गणिताची, विशेषत: भूमितीची वाटणारी भीती घालवली. प्रमेयांची आपल्याला उगीचच भीती वाटत होती अशी प्रतिक्रिया व्याख्यानानंतर अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

## क्रांतीसिंह मदनलाल धिंग्रा अभिवादन कार्यक्रम



हा कार्यक्रम मालवण शिबिरातील चिरस्मरणीय कार्यक्रम ठरला. दिवसभर रिक्षाला ध्वनीवर्धक लावून संपूर्ण गावभर या कार्यक्रमाचा प्रचार करण्यात आला. शिबिरार्थींनी खुर्च्या, टेबले, मदनलाल धिंग्रांचा पुतळा इत्यादी सर्व कार्यक्रमाची जय्यत तयारी फोवकांडा पिंपळाच्या पारावर केली होती. कारगील युद्धात शहीद झालेल्या कॅप्टन मनीष कदम यांच्या पिताश्रींच्या हस्ते क्रांतीसिंह मदनलाल धिंग्रांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. महाराष्ट्र हेरॉल्डचे माजी संपादक श्री. श्रीपाद वाघ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. मदनलाल धिंग्रांचे असीम धैर्य आणि क्रूरकर्मा कर्झन वायलीचा वध हा पराक्रमी इतिहास श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी आपल्या ओघवत्या भाषणातून साक्षात उभा केला. वंदे मातरम्च्या सामुहिक गायनाने अभिवादन सभा संपली आणि सुरू झाली एक चैतन्यपूर्ण मशालफेरी. वाऱ्यावर फडफडणाऱ्या शेकडो मशाली हाती घेऊन मातृभूमीच्या आणि मदनलाल धिंग्रांच्या जयघोषाच्या घोषणा देत सर्व शिबिरार्थी कार्यकर्ते व सर्वसामान्य मालवणकर नागरिकही या 'मशाल यात्रेत' सहभागी झाले. या मशालफेरीने मालवणच्या गल्लीबोळांतील वातावरण देशभक्तीने भारून गेले होते.

**आयुष्य हे चैन नसून आयुष्य हे कर्तव्य आहे.**

**शिबिर वृत्त :** वर्ष २००९ मध्ये शिबिरे खालील प्रमाणे संपन्न झाली.

| शाखा | शिबिर ठिकाण | शिबिराचा विषय | कालावधी | शिबिरार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| स्वामी श्रद्धानंद/ सुबोधानंद | गोपाळराव देशपांडे वसतीगृह वडगाव मावळ | * शौर्यकथा<br>* संघटन | १५ ते १९/४/०९ | १४२ |
| स्वामी योगानंद/ दयानंद | श्रीमती लक्ष्मीबाई लोखंडे वसतीगृह सांगिसे, (कामशेत) | *समर्थ रामदास स्वामी<br>* गट्टी अभ्यासाशी | १५ ते १९/४/०९ | ११८ |
| स्वामी अखंडानंद/ ब्रह्मानंद/ राजर्षि शाहू | सेनापती बापट विद्यालय, माले, ता. मुळशी | * पर्यावरण<br>* अखंड भारत | १५ ते १९/४/०९ | १३० |
| रामकृष्ण/ विवेकानंद/ अभेदानंद | तोरणा वसतीगृह वेल्हा | * सेवाकार्य<br>* छ.शिवाजी महाराज | १५ ते १९/४/०९ | १६० |
| वर्धिनी संचालित शिबिर | राजस्थानी मारवाडी विद्यालय, लातूर | * व्यक्तिमत्व विकास | २४ ते २८/४/०९ | ६० |
| अभ्यासिका केंद्र शिबिर | भावे प्राथमिक शाळा, पुणे | * छंद आणि कला | २६ व २७/४/०९ | ३३ |
| भगिनी निवेदिता | पी.सी.आर.आर भुकूम | * खगोलशास्त्र परिचय | ७ ते ११/५/०९ | ५५ |
| रामकृष्ण/ योगानंद/ श्रद्धानंद | अपंग कल्याणकारी संस्था, वानवडी | * अभ्यासपूरक कौशल्ये,<br>*प्रेरणादायी चरित्रे | ११ ते १४/१०/०९ | १५० |
| राजर्षी शाहू सरस्वती विद्यामंदिर | सरस्वती विद्यामंदिर, वारजे | *अभ्यासपूरक कौशल्ये | १५ ते १८/१०/०९ | २०० |
| शिवाजी वाचनमंदिर | मालवण | *कला प्रशिक्षण<br>*प्रेरणादायी चरित्रे | ३०/१० ते २/११/०९ | ६० |

**स्वदेशी चळवळ म्हणजे दुसऱ्याच्या लुटारूपणास आळा घालून आपल्या हक्कांचा बचाव करणे होय.**

**शिबिरांमध्ये झालेली व्याख्यान सत्रे**

| वक्त्याचे नाव | व्याख्यानाचा विषय |
|---|---|
| श्री. अभिराम दीक्षित | वीर सावरकर शौर्यकथा |
| श्री. ज्ञानेश पुरंदरे | अशी लढली राणी लक्ष्मीबाई |
| श्री. शिरीष पटवर्धन | क्रांतीसिंह नानासाहेब पाटील : शौर्यकथा |
| डॉ. तारासिंह गोरवाडा | शिखांच्या शौर्यकथा |
| डॉ. प्रदीपराव आगाशे | ऐ मेरे वतनके लोगो -कथा देशभक्तांच्या |
| श्रीमती स्मिता पेंडसे | खेळातून संघटन |
| श्री. श्रीराम सबनीस | विद्यार्थ्यांचे रामदास |
| श्री. श्रीकांत भोजकर | समर्थांच्या दृष्टीने व्यक्तिमत्त्व विकास |
| श्री. शिरीष पटवर्धन | दासबोधात मांडलेले व्यक्तिमत्त्व विकासाचे पैलू |
| श्री. वाळकीकर सर | गट्टी इतिहासाशी |
| डॉ. प्रदीपराव आगाशे | गट्टी शास्त्राशी |
| श्री. पोतनीस सर | गट्टी गणिताशी |
| श्री. सारंग अकोलकर | हिंदुत्वासमोरील आव्हाने (प्रेरणासत्र) |
| श्री. ज्ञानेश पुरंदरे | छत्रपती शिवाजी महाराज (प्रेरणासत्र, सर्व ग्रामस्थांसमोर) |
| श्री. जगताप सर, | ग्रामीण जीवन |
| श्री. भोईटे सर | भविष्यातील पर्यावरण योजना |
| श्री. प्रदीप नलावडे | परिसरातील प्राणी |
| श्री. जयंत कवठेकर | भारतीय संस्कृती |
| श्री. रामभाऊ डिंबळे | अखंड भारत |

| वक्त्याचे नाव | व्याख्यानाचा विषय |
|---|---|
| श्री. ज्ञानेश पुरंदरे | १९४७ नंतरचा भारत |
| श्री. अरविंद केळकर | जगायचयं प्रत्येक क्षण (चरित्रकथन) |
| श्री. ज्ञानेश पुरंदरे | भारतीय संस्कृतीची प्रतिके (प्रेरणासत्र) |
| श्री. मंदार परळीकर | आतंकवाद्याच्या तावडीत अडकलेल्या एका स्त्रीची कथा |
| डॉ. सचिन नगरकर | प्राणी व माणसातील फरक |
| श्री. विश्वास कुलकर्णी | शिबिराची यशस्वीता म्हणजे काय? |
| ॲड. रवींद्र यादव | शिवाजी महाराजांची स्वभाव वैशिष्ट्ये |
| श्री. प्रशांत कवडे | शिबिरांची आवश्यकता |
| गटचर्चांचे विषय | हिंदूत्व, वर्धिनीत का यावे? खेळाचे जीवनातील महत्त्व |
| श्री.अनिरूद्ध गायकवाड | भेटकार्ड कार्यशाळा |
| जैव विविधता | श्री. रमण कुलकर्णी |
| संत गाडगेबाबा | श्री. मेधा शेवडे |
| राणी लक्ष्मीबाई | श्री. ज्ञानेश पुरंदरे |
| अभिनय नैपुण्य | श्री. विनोद सातार्डेकर |
| क्रांती श्रृंखला | श्री. प्रसाद गाडे |
| अशी होती शिवशाही | श्री. अमर ठाकूर |
| प्रथमोपचार | डॉ. अविक्षित काळे |
| सौ. प्रज्ञा काळे | भरतनाट्यम् |
| सौ. उमाताई गुजर | अभ्यासकौशल्य |
| श्री. निलेश मंत्री | एक होता कार्व्हर |

**आपणापुढे जे कार्य आहे ते लहानसहान कार्य नाही.**
**आपण देवाने जे कार्य केले तेच करीत आहोत.**

| वक्त्याचे नाव | व्याख्यानाचा विषय |
| --- | --- |
| श्री. शशिकांत मांडके | कुष्ठमित्र बाबा आमटे : कुष्ठ सेवेतील अनुभव |
| श्री. शशिकांत मांडके | ग्रामविकासाचे मॉडेल : राळेगण सिद्धी अण्णा हजारे यांचे प्रेरक जीवन चरित्र |
| श्री. विजय शिवले | 'सुराज्य संस्कार सेवा' या संस्थेच्या कामाचा परिचय |
| श्री. केशव नांदेडकर | पुर्वांचलातील सेवाकार्य |
| डॉ. प्रवीण दबडघाव | आरोग्यसेवा |
| श्री. ज्ञानेश पुरंदरे | शिवाजी महाराजांचे बालपण |
| ॲड. संजय चितळे | स्वराज्याचे शिवशंभू |
| श्री. विजय खुतवड | शिवराय व संतपरंपरा |
| श्री. राहूल कोकीळ | महाराजांची युद्धनीती |
| श्री. केतन पुरंदरे | तोरणा गडाचा इतिहास व तोरणा चढाईतील युद्धनीती |
| श्री. मिलिंद एकबोटे | शंभु महाराज |
| डॉ. विनेश नगरे | समारोप सत्र |
| श्री. कुलकर्णी | स्लाईड शो – जगातील प्रेक्षणीय स्थळे |
| श्री. धायगुडे | एकनाथांची भारूडे : सादरीकरण कार्यक्रम |
| श्री. ज्ञानेश पुरंदरे | असा आणला स्वराज्यासाठी खजिना (प्रेरणादायी कथा) |
| श्री. विक्रांत दिघे | चित्रकला (कृतीसत्र) |
| श्री. विवेक साने | ओरिगामी (कृतीसत्र) |
| श्री. सुनील कुलकर्णी | विज्ञानाशी गट्टी (सप्रयोग) |

| वक्त्याचे नाव | व्याख्यानाचा विषय |
| --- | --- |
| श्री. ज्ञानेश पुरंदरे | खगोलशास्त्रातील भारतीय शास्त्रज्ञांचे योगदान |
| श्रीमती आरती पाटील | नासातील अंतराळ प्रशिक्षण |
| डॉ. अनिरूद्ध देशपांडे | धुमकेतू आणि उल्का |
| डॉ. प्रकाश तुपे | ग्रहमालेचा फेरफटका आणि जीवसृष्टीचा शोध |
| श्री अपर्णा निर्गुडे | कल्पना चावला |
| श्री. बर्वे | चरित्रकथा (स्लाईडशो) |
| श्री. शेखर फाटक | सूर्य व चंद्र ग्रहणे |
| डॉ. रायरीकर | खगोलशास्त्रीय उपकरणे |
| श्री. तुषार पुरोहित व सहकारी | आकाश दर्शन कार्यक्रम |
| प्रा. नभा बडे | नृत्य – एक जीवनाविष्कार |
| प्रा. अप्पा कुलकर्णी | संतदर्शन – जगद्‌गुरू तुकाराम महाराज |
| प्रा. दिलीप कुलकर्णी | संतदर्शन – समर्थ रामदास स्वामी |
| प्रा. जोगिंदर बिसेन | पहा चाळुनी पाने अपुल्या इतिहासाची |
| प्रा. रवी बापटले | सेवक आणि सेवाकार्य |
| मीनाताई गायकवाड | उद्‌घाटन सत्र |
| जैन साध्वी प्रज्ञा सुधाजी | समारोप सत्र |
| ॲड. संजय चितळे | छत्रपती संभाजी महाराज |
| श्री. गणेश पवार | स्वातंत्र्यवीर सावरकर |
| श्री. शशिकांत मांडके | स्वामी विवेकानंद |
| श्री. मोहन शेटे | महादजी शिंदे |

**बंधूहो, स्वदेश हे परमेश्वराने आपणास दिलेले घर आहे.**

**शिबिरामधील विशेष वृत्त :-**

- पुण्याभोवतीच्या गावांमध्ये असलेल्या वसतीगृहांमध्ये पहिल्यांदाच शिबिरे झाली. या शिबिरात त्या-त्या वसतीगृहातील आणि गावातील विद्यार्थी शिबिरार्थी म्हणून उपस्थित होते.
- वडगाव मावळ येथील शिबिरात दररोज शिवरायांची आरती तर माले येथील शिबिरात शिवतांडव स्तोत्र म्हटले जात होते.
- शिबिरस्थानी उपलब्ध असलेल्या वस्तूंचा वापर करून शस्त्रप्रतिकृती तयार करण्याची स्पर्धा खूप रंगली.
- 'डेंजर कॉल' हा कार्यक्रम सांगिसे शिबिरात घेण्यात आला. रात्री अचानक शिबिरस्थानी काही संकट आले तर विद्यार्थी मुकाबला कसा करतात हे यातून जाणून घ्यायचे होते. अचानक केलेल्या या हल्ल्यामुळे अनेक शिबिरार्थी गांगरले. पण नंतर सर्वांना हे लक्षात आणून द्यावे लागले, की समाजामध्ये काही वेळा संकटे अशी अचानक येतात त्यावेळी समाज असाच सैरभैर होतो, गांगरतो. किमान वर्धिनीच्या शाखांमधील विद्यार्थ्यांनी तरी अशा संकटांना अत्यंत धैर्याने सामोरे गेले पाहिजे व त्यासाठी तशी शारीरिक व मानसिक शक्ती मिळविली पाहिजे.
- माले शिबिरात स्थानिक अपंग विद्यार्थी कैलास कोकरे याने शिबिराच्या सर्वच कार्यक्रमांमध्ये चमक दाखविली. **एक हात अधू असलेल्या कैलासने 'एकहाती' १६६ जोर मारून पहिला क्रमांक मिळविला. शिबिराचा आदर्श वर्धक हे बक्षिस अर्थातच त्यानेच पटकावले.**
- माले शिबिरात मुळशी सत्याग्रहाचा स्मृतिदिन होता. या स्मृतीदिनाचे औचित्य साधून सर्व शिबिरार्थींनी मुळशी सत्याग्रहाच्या स्मारकाला भेट देऊन सेनापती बापटांना अभिवादन केले.
- लातूर शिबिराच्या निमित्ताने युवक-युवती कार्यकर्त्यांनी विवेकानंद हॉस्पिटलला भेट दिली. रुग्णालयाचे संस्थापक सदस्य डॉ. अशोकराव कुकडे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सुरू झालेल्या या रूग्णालयाची यशोगाथा मुलांसमोर मांडली. हा एक प्रेरणादायी अनुभव होता.
- नवा व्यापार या खेळातून व्यवहार कसे होतात हे विक्रेता व ग्राहक अशा दोन्ही भूमिकेतून विद्यार्थ्यांना समजले.
- ग्रामीण भागातील सर्व शिबिरांमध्ये ग्राम-सर्वेक्षणाचा एक कार्यक्रम होता. यापैकी वेल्हा शिबिरामधील शिबिरार्थींनी एकूण सात गावांचे सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणात आरोग्य, शिक्षण, व्यसनाधीनता अशा विषयात खालील धक्कादायक गोष्टी समोर आल्या.
- एका गावामध्ये पाण्याचा तुटवडा असल्याने गावकऱ्यांची वारंवार भांडणे होतात.
- एका गावामध्ये व्यसनांचे प्रमाण १०० टक्के आहे. व दरमहा सरासरी १०००/- रूपये व्यसनांवर खर्च होतो असे लक्षात आले.
- एका गावामध्ये जनावरे मरण्याचे प्रमाण जास्त असल्याचे व गुरे प्लॅस्टिक व कपडे खाऊन मरतात अशी माहिती समजली.
- मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत जवळपास सर्वच गावात उदासिनता जाणवली.

**जो स्वदेशासाठी मरतो तो चिरंजीव होतो.**

**पालकांची सहल**

रविवार दिनांक ५ जुलै रोजी स्वामी योगानंद शाखेने पालकांसाठी सहल आयोजित केली होती. शिवथरघळ येथे ही सहल गेली होती. एकूण ६० पालक उपस्थित होते. मुलांप्रमाणे पालकही धबधब्यात भिजण्याचा आनंद घेत होते. या पालकांशी श्री. विश्वास कुलकर्णी व डॉ विनेश नगरे यांचा उत्तम संवाद झाला. वर्धिनीच्या सर्व प्रकल्पांचा परिचय, तसेच आपण वर्धिनीला कशा प्रकारे साह्य करू शकतो यासंबंधी श्री. विश्वास कुलकर्णी यांनी पालकांशी गप्पा मारल्या, तर पालकांचे आरोग्य चांगले राहणे हे मुलांच्या आणि कुटुंबांच्या भविष्याच्या दृष्टीनेही किती महत्त्वाचे आहे यासंबंधी डॉ. विनेश नगरे यांनी संवाद साधला. वर्षातून एखादी तरी अशी सहल पालकांसाठी व्हावी अशी अपेक्षा पालकांनी व्यक्त केली.

**अल्मा मॅटर**

अल्मा मॅटर मिशन या संस्थेने शिक्षकांसाठी दुसरे व्याख्यान सत्र आयोजित केले होते. 'Architect of the architects (students)' असे या व्याख्यानाचे सूत्र होते. वर्धिनीचे दहा युवक-युवती कार्यकर्ते गेले होते. या व्याख्यानात मांडलेले महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे -

* विद्यार्थी काय आहे, त्याच्यामध्ये किती क्षमता आहे हे त्याला जाणवण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत.
* विद्यार्थ्यांमधील कला विकसित करण्याला प्राधान्य द्यावे कारण कलांच्या शिक्षणातून कल्पना शक्तीचा विकास होतो.
* विद्यार्थ्यांना जीवन जगायला / अनुभवायला शिकवा.
* नवनवीन प्रयोग करून विद्यार्थ्यांना प्रयोगशील बनवा.
* 'Together everyone, achieve miracle'

**वर्धापन दिन कार्यक्रम**

**भगिनी निवेदिता शाखा-** शाखेचा वर्धापन दिन २९ जून रोजी साजरा करण्यात आला. शाखेने घरगुती कचऱ्याचे व्यवस्थापन हा विषय नव्या वर्षाचे उद्दीष्ट म्हणून निश्चित केला आहे. त्याचे गांभीर्य सर्वांच्या लक्षात यावे म्हणून स्वच्छता कामगारांच्या जीवनावर आधारित 'कचराकोंडी' हा चित्रपट दाखविण्यात आला. तसेच त्यावर काही चर्चा करण्यात आली.

त्यानंतर मनिषाताई पाठक यांनी घरातील कचऱ्याचे व्यवस्थापन कसे करता येते विशेषत: घरातील ओल्या कचऱ्याची समस्या कशी सोडवता येते याची विस्ताराने माहिती सांगितली.

**स्वामी विवेकानंद शाखा-** ४ जुलै रोजी शाखेचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. टाटा मोटर्समधील अधिकारी व याच शाखेचे वर्धक कार्यकर्ते श्री. अरविंद केळकर हे कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. 'जगायचय प्रत्येक सेकंद' या कै. डॉ. केवळे यांच्या चरित्रातील प्रेरणादायी प्रसंग त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. आलेल्या प्रत्येक अडचणीवर डॉ. केवळे यांनी कशी मात केली हे सांगत सांगत शिकणे किती महत्त्वाचे आहे या विषयी श्री. केळकर यांनी आपले अनुभव सांगितले.

**तरुणांना कर्तव्यबुद्धीने उद्दीपित करा, ध्येयाची भक्ती शिकवा,**
**म्हणजे त्यांच्या अंगात काय सामर्थ्य आहे हे तुम्हाला कळेल.**

**स्वामी अखंडानंद शाखा–** १० ऑक्टोबर २००९ रोजी शाखेचा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. ज्येष्ठ बालसाहित्यिक श्री. दत्ता टोळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. वर्धकांनी या प्रसंगी संगीताच्या तालावर मानवी मनोऱ्यांची उत्तम प्रात्यक्षिके सादर केली. शाखेच्या ‘गरुडझेप’ या त्रैमासिक पत्राचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. श्री. दत्ता टोळ यांनी वाचन व व्यक्तिमत्त्व विकास या विषयाच्या अनुषंगाने वर्धकांना सोप्या व ओघवत्या शैलीत मार्गदर्शन केले. डॉ. आंबेडकर, लोकमान्य टिळक, सर्वपल्ली राधाकृष्णन् यांसारख्या थोर व्यक्तींच्या जीवनातील काही प्रसंग सांगून त्यांच्या जीवनात वाचनाला कसे महत्त्वाचे स्थान होते हे त्यांनी स्पष्ट केले. महादेव नावाच्या छोट्या मुलाच्या उदाहरणातून त्यांनी वाचनाचे वेड कसं असावं ते स्पष्ट केले. त्यांनी शेवटी सगळ्यांकडून वाचनाची प्रतिज्ञा म्हणवून घेतली. या प्रसंगी शाखेतील वर्धकांनी स्वत: तयार केलेले आकाशकंदील व उटणे विक्रीसाठी ठेवण्यात आले होते.

**स्वामी श्रद्धानंद शाखा–** शाखेचा सहावा वर्धापन दिन दि. ९ ऑगस्ट रोजी संपन्न झाला. स्वाईन फ्लूच्या पार्श्वभूमीवर पालकांची उपस्थिती खूप उत्साहवर्धक होती. श्री रामभाऊ डिंबळे कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना श्री. रामभाऊ डिंबळे म्हणाले, की आजच्या काळात आपण घरातील अत्यंत महत्त्वाच्या जागी जो दूरदर्शन संच प्रस्थापित केलेला आहे तो संच, अर्थात या माध्यमातून सतत आदळणाऱ्या जाहिराती मुलांना वेगाने (बि)घडवित आहेत. मुलांच्या सवयी, त्यांचे विचार, त्यांचे बोलणे यावर या जाहिरात विश्वाचा फार मोठा परिणाम झालेला दिसतो. अशा पार्श्वभूमीवर वर्धिनीच्या शाखा आणि त्या शाखांच्या माध्यमातून मुलांवर होणारे (सु)परिणाम फार मोलाचे आहेत. शाखेत आल्यामुळे मुलं स्वावलंबी होतात, सुसंवाद करणारी होतात, सुस्वभावी होतात, सहजपणे सर्वांमध्ये मिसळणारी होतात आणि हट्ट करतात पण चांगल्या गोष्टींसाठी हे अतिशय आनंद देणारे आहे.

**सुबोधानंद शाखा –** शाखेचा १५ वा वर्धापन दिन ९ ऑगस्ट रोजी संपन्न झाला. श्री. जगन्नाथ पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. चित्रपट, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रातही आपल्या कर्तबगारीचा ठसा उमटविणारे श्री. पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन या कार्यक्रमानिमित्ताने लाभले. वर्धक व पालकांशी संवाद साधताना Sincerity, Honesty, Hard work आणि Punctuality या गुणांच्या आधारे आपले ध्येय नक्की साध्य करता येते असा विश्वास त्यांनी बिंबवला.

---

**योग मार्गदर्शन वर्ग –** विश्वयोगी कै. मनोहर श्रीकृष्ण हरकरे यांनी वैदिक ज्ञानभांडार सर्वांना खुले व्हावे यासाठी वैदिक विश्व या संस्थेची नागपुरात स्थापना केली. या संस्थेचे विद्यमान संचालक श्री. दत्तात्रयजी हरकरे यांनी वर्धिनीच्या कार्यकर्त्यांसाठी ३ ऑगस्ट रोजी सकाळच्या वेळात षट्‌चक्रभेदन व योगनिद्रा यासंबंधी अभ्यासवर्ग घेतला. अत्यंत धावपळीच्या सध्याच्या युगात तणावमुक्त व उत्साहपूर्ण कार्यशैलीसाठी योग हा किती हितकारक आहे हे त्यांनी सप्रात्यक्षिक सादर केले.

**प्रत्येक अपजय ही जयाची एक पायरी आहे.**

**गुणगौरव कार्यक्रम–** शैक्षणिक वर्ष २००८-०९ मध्ये उत्तम गुणांनी तसेच अभ्यासेतर अन्य विषयांमध्ये प्रावीण्य प्राप्त केलेल्या सर्वांना शाबासकी देणारा कार्यक्रम २६ जुलै रोजी संपन्न झाला. इयत्ता ७वी पुढील सुमारे ११७ बक्षिसपात्र विद्यार्थ्यांचे या कार्यक्रमात कौतुक करण्यात आले. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष श्री. रवींद्र वंजारवाडकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. काका हलवाई स्वीटस्, टिळक पथ, पुणे यांचेद्वारे श्री. सुरेंद्र गाडवे यांनी गुणवान विद्यार्थ्यांना शाबासकी म्हणून सात किलो पेढे भेट म्हणून पाठविले होते.

**दिवाळी सुटीतील विविध कार्यक्रम–** स्वामी अखंडानंद शाखेने सुगंधी उटणे तयार करणे हा उपक्रम केला, तर स्वामी ब्रह्मानंद शाखने उटणे विक्री उपक्रम केला.

स्वामी श्रद्धानंद शाखेची पुरंदर व वज्रगड येथे सहल गेली होती. किल्ल्यांच्या परिसरातील मंदिराची स्वच्छता, प्रेरणादायी गीते, मकरंद शर्मा या वर्धकाने म्हटलेले पोवाडे आणि निलेश धायरकर यांनी मुरारबाजी देशपांड्यांची सांगितलेली शौर्यकथा अशा भरपूर कार्यक्रमांमुळे मुसळधार पावसातही सहलीचा आनंद सर्वांनी लुटला. परतीच्या वाटेवर केतकावळे येथील श्री. बालाजी मंदिराच्या भेटीने वीररसाबरोबरच भक्तीरसाची अनुभूतीही सर्वांनी घेतली.

*शिक्षक दिनाच्या निमित्ताने शाखेवर अभ्यास तास घेताना स्वामी श्रद्धानंद शाखेतील वर्धक अक्षय जगताप याने गजराचे घड्याळ घरून आणले व पाचवीच्या मुलांचा तास घेताना घड्याळ उघडून घड्याळाची माहिती सर्व मुलांना सांगितली.*

शाखांवर झालेली व्याख्याने

| वक्त्याचे नाव | विषय |
|---|---|
| श्री. सुनील कुलकर्णी | सफर युरोपची |
| श्री. प्रकाशराव दामोदरे | कथा क्रांतिकारकांच्या |
| श्री. ज्ञानेश पुरंदरे | अरूणाचलप्रदेश माहितीपट |
| श्रीमती मनिषाताई पाठक | गट्टी गणिताशी |
| श्री. हेमंत भुजबळ | कथाकथन ‘भानाच भूत’ |
| श्री. मारुती शिंदे | कथाकथन |

शाखांवर झालेल्या पालकसभा

| शाखेचे नाव | वक्ते | विषय |
|---|---|---|
| श्रद्धानंद शाखा | डॉ.देवेंद्र सोनावणे | सकस आहार |
| रामकृष्ण शाखा | डॉ. विनेश नगरे | आरोग्याची काळजी घ्यायची म्हणजे काय? |

## माडगावकर पुरस्कार-२००९

वर्ष २००९ च्या सर्वोत्कृष्ट वर्धक-वर्धिका पुरस्कारांसाठी निवड समितीने खालील वर्धकांची निवड केली आहे.

❖❖❖

**मधुकर माडगावकर पुरस्कार**

माध्यमिक गट : कु. भाग्यश्री दरक

उच्च माध्यमिक गट : कु. निशिकांत भालेकर

❖❖❖

**कै. पद्माबाई माडगावकर पुरस्कार**

पदवीधर गट : श्री. उमेश बिबवे.

**ऐक्याशिवाय देशत्व नाही.**
**ऐक्याशिवाय शक्ती नाही.**

**गणेशोत्सव - २००९**

स्वाईन फ्ल्यूच्या साथीमुळे पुण्याचा गणेशोत्सव या वर्षी खूपच साधेपणाने साजरा झाला. अशा वातावरणात आणि आरोग्याच्या दृष्टीने शासनाने केलेल्या सूचना लक्षात घेऊन वर्धिनीची विद्यार्थ्यांची पथके यावर्षी लक्ष्मीपथावरील मिरवणुकीत सहभागी झाली नाहीत.

शाखांनी सामाजिक विषयावर पथनाट्ये मात्र सादर केली. तसेच पुण्यातील एकूण सहा मंडळांसमोर युवक-युवतींची पथके सहभागी झाली होती.

नाशिक येथे मात्र मिरवणुकीची मजा वेगळी होती. नाशिकच्या जनस्थान सेवा मंडळाच्या मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी ६५ युवक गेले होते. या पथकाचे नाशिककरांनी जोरदार स्वागत केले. झांज पथकाने बसवलेल्या श्रीराम, श्रीकृष्ण छत्रपती श्री शिवरायांच्या जीवनावरील प्रसंग. लोकांना खूप भावले. हे वर्धिनीचे पथक आकर्षणाचे केंद्र बनले होते.

पथकाने दिलेल्या घोषणांना नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळत होता. पण खरा प्रतिसाद मिळाला तो मुंबईवर हल्ला करणाऱ्या कसाब या दहशतवाद्याच्या फाशीच्या प्रसंगाला.

**स्मरण मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचे....**

गेल्या वर्षी २६ नोव्हेंबर रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याला पाहता पाहता एक वर्ष झाले. असे हल्ले देशात कोठेही होऊ नयेत म्हणून सुरक्षा यंत्रणा जशी सजग असायला हवी तशीच काळजी नागरिकांनीही घ्यायला हवी आणि अशा प्रसंगांचा सामना संघटितपणे करायला हवा. मुंबईवरील हल्ल्याच्या या प्रथम स्मरणदिनाच्या पूर्वसंध्येला 'तुजसाठी मरण ते जनन, तुजविण जनन ते मरण' या स्वातंत्र्यवीरांच्या देशरक्षणाच्या संदेशाचे जागरण करण्याच्या हेतूने सारसबागेमध्ये वर्धिनीच्या सर्व शाखांमधील सुमारे ५०० युवक-युवती व वर्धक-वर्धिका एकत्र आले होते.

'जयोस्तुते श्री महन्मंगले शिवास्पदे शुभदे' या गीताचे सामुहिक गायन आणि संकल्प उच्चारण असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते. समूहगानापूर्वी वर्धिनीचे उपाध्यक्ष श्री. उदयराव गुजर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री. श्रीकांत सामळ, श्री. अरविंद केळकर आणि कार्यकारिणीचे अन्य सदस्यही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**वार्षिक क्रीडादिन स्पर्धा-**

१३ डिसेंबर रोजी वार्षिक क्रीडादिन स्पर्धा संपन्न झाल्या. एकूण ५०० वर्धक व युवकांच्या उपस्थितीत स्काऊट ग्राऊंड येथे सर्व स्पर्धा रंगल्या. शिवछत्रपती पुरस्कार विजेते सुप्रसिद्ध क्रीडामार्गदर्शक श्री. राजेंद्र द्रवीड यांनी स्पर्धांचे उद्घाटन केले व खेळाडूंना शपथ दिली.

सुरुवातीला धावणे व योगासन या वैयक्तिक स्पर्धा झाल्या. इयत्ता ५ वीच्या मुलांनी अत्यंत सुंदर असे शीर्षासन करून सर्वांची दाद मिळविली. संपूर्ण वर्धिनीत आपापल्या इयत्तेतील सर्वांत वेगवान धावपटूचा मान मिळविण्यासाठी सुमारे महिन्या-पासून वर्धकांनी सराव केला होता. इयत्ताश: झालेल्या संघांचे खेळ व विजयी शाखा पुढीलप्रमाणे -

**राजकारण हे नीतीला धरून असावे.**

| इयत्ता (गट) | स्पर्धेचा खेळ | विजेती शाखा |
|---|---|---|
| ५ वी - ६ वी | लंगडी | स्वामी योगानंद शाखा |
| ७ वी - ८ वी | खो-खो | स्वामी दयानंद शाखा |
| ९ वी - १० वी | कबड्डी | स्वामी अखंडानंद शाखा |
| ११ वी - १२ वी | कबड्डी | स्वामी दयानंद शाखा |
| युवक गट | व्हॉलीबॉल | स्वामी अभेदानंद शाखा |

या सामन्यांसाठी पंच म्हणून उपस्थित असलेल्या श्री. भूषण दीक्षित यांच्या हस्ते विजेत्या संघांना व खेळाडूंना बक्षिसे देण्यात आली.

---

*सीमेवरील सैनिकांना वर्धक राख्या पाठवितात.*
*अशा एका राखीला सीमेवरील एका सैनिकाने पाठविलेला पत्र प्रतिसाद*



*१५ ऑगस्ट २००९*

*प्रिय बालमित्र मल्लिकार्जुन तसेच विनित यांना*
*सर्वप्रथम या सैनिकाचे अनेक शुभाशिर्वाद.*
*वि. वि.*

*आपण पाठविलेले पत्र आणि राखी पोहोचली. तुम्ही लिहिलेली पत्रे वाचून अतिशय आनंद झाला. खरंच असे वाटले की आम्हा सैनिकांची कोणीतरी आठवण करतंय, तुम्ही लिहिलेली चार अक्षरे वाचून मन अगदी भारावून गेलंय. तुमचे देशप्रेम पाहून मलाही खूप-खूप धन्य वाटले. तुमच्यासारख्या लहान मित्रांनाही देशाविषयी एवढा गर्व आहे याचेच मला कौतुक वाटते.*

*तुम्हीपण मोठे झाल्यानंतर देशसेवेसाठी सैन्यामध्ये या आणि आपल्या मातृभूमीसाठी आपले सर्वस्व अर्पण करा हीच माझी इच्छा आहे. बाकी तुम्ही पत्र पाठविल्याबद्दल धन्यवाद ! आणखी पत्र पाठवीत राहा हीच अपेक्षा.*

*कळावे,*

*आपला सैनिक मित्र,*
*विक्रम.*

**स्वधर्म नि स्वदेश यांच्या स्वातंत्र्यासाठी लढत लढत मरणाऱ्या वीरहो -**
**तुमचे रक्त ही भूतकालची तिलांजली - आगामी वीरांची संजीवनी होय!**

## शारदामणी महिला विभाग

### बालवाडी/बालशाखा विभाग

**संक्रांत उत्सव - २००९**

दि. १० जानेवारी २००९ या दिवशी कार्यक्रम संपन्न झाला. सेवासदन डी.एड. महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. स्वातीताई गाडगीळ या प्रमुख वक्त्या होत्या. स्टरलाईट टेक्नॉलॉजी कंपनीच्या संचालिका सौ. ज्योतीताई आगरवाल या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. 'रंग' या मध्यवर्ती कल्पनेवर आधारित अभिनय गीते बालवाडीच्या विद्यार्थ्यांनी सादर केली. बालशाखेच्या विद्यार्थ्यांनी डंबेल्स/रुमाल अशा साधनांचा वापर करून व्यायाम प्रकार आणि काही मानवी मनोरे सादर केले. सौ. ज्योतीताई आगरवाल यांनी बालांनी सादर केलेल्या अभिनयाचे कौतुक केले. सौ. स्वातीताई गाडगीळ यांनी या प्रसंगी एक प्रेरक युद्धकथा सांगून लहान वयात चांगले संस्कार होण्यासाठी वर्धिनीसारख्या संस्थेत आपली मुलं आवर्जून गेली पाहिजेत याकडे तुम्ही लक्ष द्याल असे पालकांना आवाहन केले.

**नाचू कीर्तनाचे रंगी**

आषाढी एकादशीच्या दिवशी पालखी सोहळा रंगला. काही भाविक नागरिकांनी श्री. विठ्ठल रखुमाईचा वेष धारण केलेल्या बाल वर्धकांना वाकून नमस्कार करून आम्हाला प्रत्यक्ष माऊलीचे दर्शन झाले अशी भावना व्यक्त केली. कुमारी श्रावणी व

### अजब तुझे सरकार

काही कातकरी बालचमूंची भेट मालवण शिबिरात घडविण्यात आली होती. विलक्षण कथा आहे या कातकरी बंधूंची. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात नांदणारे हे आपले बांधव खरेतर जंगलचे राजे. इथल्या वन्यसृष्टीचे हेच खरे ताबेदार. पण सध्या धनदांडग्यांच्या आमरायांचे राखणदार म्हणून काम करण्याची वेळ यांच्यावर आली आहे. पोटापाण्यासाठी असे अनेक कातकरी बांधव कोकणातील गावकुसांबाहेर वस्ती करून रहातात. या देशात बांग्लादेशी घुसखोरांना मतपेट्यांच्या दलालांमार्फत न मागता एका आठवड्यात रेशनकार्ड मिळते. पण पिढ्यान्‌पिढ्या जंगलाची सेवा करणाऱ्या या कातकरी बंधूंकडे अजूनही नागरिकत्वाची ओळख दर्शवणारे कोणतीही कागदपत्रे नाहीत. निवारा, खात्रीशीर रोजगार, मुलांचे शिक्षण अशा अनेक समस्या त्यांच्यासमोर उभ्या आहेत. शिवाजी वाचन मंदिराचे कार्यवाह श्री. गणेश कुशे यांनी या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी कंबर कसली आहे. रेशनकार्डे तर आली. एक खोली बांधून कातकरी मुलांची शाळाही राणे आजींनी सुरू केली आहे. आश्चर्य म्हणजे मुलांना नावेच नव्हती. सर्वजण आईच्या नावावरून ओळखले जायचे. मग शाळेत मुलांचे नामकरण केले. हळूहळू गावच्या हायस्कूलला जाण्याइतपत प्रगती त्यांच्यात दिसून येते आहे. स्वातंत्र्याच्या ६२ वर्षानंतर आता कुठे या निसर्गफुलांची पहाट उगवते आहे.

**जिथे परमेश्वर असतो तिथे पारतंत्र्य कधीही असू शकत नाही व जिथे पारतंत्र्य असते तिथे परमेश्वराचे अधिष्ठान कधीही असू शकत नाही.**

फाल्गुनी या इयत्ता चौथीमधील मुलींनी 'उत्साहाचे बळ मोठे' व 'स्वच्छता' या विषयावर कीर्तन सादर केले.

* सप्टेंबर महिन्यापासून आठवड्यातून एकदा बालवाडीच्या शिक्षिका परिसरातील नागेश्वर मंदिराची स्वच्छता करण्यासाठी जायला लागल्या आहेत. अनुभव अतिशय छान आहेत.

**स्वयंसाह्यता गट**

- **हातकागद वस्तू निर्मिती प्रशिक्षण**
  मिटकॉन आणि हातकागद व्यावसायिकांच्या संयुक्त विद्यमाने तीन आठवड्यांचा एक प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. या वर्गाला वर्धिनीने संघटित केलेल्या बचत गटांमधून सहा सदस्या व पदाधिकारी उपस्थित होत्या. या प्रशिक्षणाच्या बळावर हात-कागदांपासून अनेक शोभिवंत वस्तू बनविण्याचा स्वयंरोजगार या महिलांना करता येईल तसेच आपापल्या गटांमधील इतर सदस्यांनाही त्याचे प्रशिक्षण देता येणे शक्य होईल.
- **प्रशिक्षण कार्यशाळा**
  १६ मार्च ते २१ मार्च २००९ या कालावधीत एक कार्यशाळा 'सेवा सहयोग' या स्वयंसेवी संस्थेच्या बरोबर आयोजित केली होती. या कार्यशाळेमध्ये कापडी बॅग्ज, मेणपणत्या, मातीच्या पणत्या रंगवणे, हातकागदापासून शोभिवंत वस्तू तयार करणे असे विषय शिकवले गेले. ८ दिवसांच्या या कार्यशाळेमध्ये ६५ महिला सहभागी झाल्या होत्या. कार्यशाळेचे उद्घाटन सौ. सुवर्णा गोखले यांच्या हस्ते झाले. या कार्यशाळेमुळे छोट्या कापडी गुढ्या तयार करणे, घुंगरू बांधणे, ज्यूटच्या पिशव्या शिवून देणे अशी अनेक कामे महिलांना मिळाली.
- कु. वैशाली पावसकर यांना संगणक प्रशिक्षक म्हणून एका शाळेमध्ये काम मिळाले.
- बी. एम.सी. सॉफ्टवेअर या कंपनीमध्ये बचत गटातील दोन महिलांना चहाचा स्टॉल चालवण्याची संधी मिळाली आहे.
- प्लॅस्टिकला पर्याय म्हणून इको एम्झाईट या कंपनीकडून कापडी पिशव्या पुरविल्या जातात. या पिशव्या शिवण्याचे काम सुरू केले आहे.
- राखी पौर्णिमेसाठी अथर्व सायबर कॅफे यांच्याकडून ३०० राख्यांची ऑर्डर एका गटातील महिलांना मिळाली.
- वर्तमानपत्राच्या रद्दीपासून वेगवेगळ्या कागदी पिशव्या तयार करण्याचे प्रशिक्षण काही सदस्य महिलांनी घेतले.
- सेवासहयोग संस्थेकडून मिळालेली दप्तरे व वह्या बचत गटातील महिलांच्या पाल्यांना वाटण्यात आली.
- स्माईल, सहेली, स्फूर्ती अशा बचतगटातील महिलांचा महिलांसाठी काम करणाऱ्या संस्थांशी संपर्क वाढला असून या संस्थांनी घेतलेल्या प्रशिक्षण शिबिराला वर्धिनीच्या बचत गटातील महिला उपस्थित होत्या.
- १५० सदस्य महिलांची गटविमा योजने-अंतर्गत पॉलिसी उतरवलेली असून या योजनेचा महिलांना भविष्यामध्ये निश्चित उपयोग होईल.

**जे जे उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर ते ते ।**
**स्वतंत्रते भगवती! सर्व तव सहचारी होते ।।**

## बचतीतून प्रगतीकडे

मला दोन मुले आहेत. एक मुलगा व एक मुलगी. मुलीला वर्धिनीच्या बालवाडीमध्ये घातले. तिला शाळेत सोडण्याच्या आणण्याच्या निमित्ताने रोज वर्धिनीत जाणे सुरू झाले. एक दिवस वर्धिनीत सौ. उषाताई पोफळे यांची भेट झाली. बालवाडीच्या अनेक मुला-मुलींचे पालक त्यांच्याभोवती उभे होते. उत्सुकतेने मीही एवढे सगळेजण काय करीत आहेत हे पाहण्यासाठी डोकावले. सौ. पोफळे बाई खुर्चीवर बसून काहीतरी लिहीत होत्या. प्रत्येक पालक त्यांना पाच-दहा रुपये देत होते व त्या पावती देत होत्या. सगळे पालक गेल्यावरही मी उभी आहे हे पाहून त्या मला म्हणाल्या की तुम्ही का नाही पैसे बचत करीत? रोज थोडे थोडे बचत केलेत तर एक रकमी पैसे मिळतील. विचार करून पाहा. मला त्यांचे म्हणणे पटत होते पण रोज पैसे कसे बचत करायचे हे समजत नव्हते. कारण यजमानांना त्यावेळी नोकरी लागलेली नव्हती. मी २-४ ऑफीसच्या सफाईचे काम सकाळच्या वेळेत करायचे. माझ्या कमाईतील रोजचे दहा रुपये मी बचत खात्यात भरायला सुरुवात केली. म्हणता म्हणता या बचतीच्या सवयीला तीन वर्षे झाली आणि एक दिवस माझ्या हाती मीच केलेल्या बचतीमुळे १२,०००/- रुपये आले. मला खूप आनंद झाला. अशी सवय मी लावून घेतली नसती तर हे पैसे केव्हाच खर्च होऊन गेले असते. या अनुभवामुळे माझा बचतीवरचा विश्वास वाढला.

आता माझ्या यजमानांनाही नोकरी लागली आहे आणि माझे साकळच्या वेळेचे कामही चालू आहे. दरमहा तीनशे रुपयाचे रिकरिंग खाते मी आता सुरू केले आहे. या बचतीचा मला भविष्यात खूप उपयोग होईल. वर्धिनीत सुरू असलेल्या बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्गामध्ये मी आता नाव नोंदविणार आहे. माझ्या मुलांमुळे माझा वर्धिनीत प्रवेश झाला आणि आता मला माझ्या विकासाची दिशाही सापडली आहे असे जाणवते आहे. हे सारं वर्धिनीमुळे झालं आहे.

**- सौ. जयश्री शंकर ढंढोरे**

## प्राणशक्ती उपचार मार्गदर्शन शिबिर

नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यात सहाय्यक परिचारिका अभ्यासवर्गाच्या पुणे व पौड येथील विद्यार्थिनींसाठी वरील विषयाचे शिबीर झाले. तज्ज्ञ शिक्षिका सौ. करंदीकर यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. आपल्याला प्राणशक्ती (म्हणजे ऊर्जा) कोठून मिळते, अशा प्राणशक्तीचा उपयोग करून आपल्या शारीरिक वेदना किंवा दुखणे कमी कसे करायचे, आपली प्रतिकार शक्ती कशी वाढवायची, आपल्या हातांच्या साह्याने ऊर्जा कशी निर्माण करायची अशा अनेक गोष्टी त्यांनी सप्रयोग करून दाखविल्या.

**... श्री स्वतंत्रते तुजसाठी मरण ते जनन।**
**तुजवीण जनन ते मरण।।**

**बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग**

बालवाडी विभागातील शिक्षिकांसाठी बालवाडीचे वर्ग सुरू होण्यापूर्वी जून महिन्यात प्रशिक्षण वर्ग संपन्न झाला. या वर्गामध्ये सर्व शिक्षिकांना खालील वक्त्यांनी मार्गदर्शन केले.

| नाव | विषय |
|---|---|
| श्रीमती मृगयाताई | प्रस्तावना व सूत्रसंचालन |
| श्रीमती वासंतीताई | हस्तकला व पेंटिंग |
| सौ. उमाताई गुजर | नियोजन व त्याचे महत्त्व |
| सौ. संगिताताई येवले | संगीत साधनेची अनुभूती |
| श्री. श्यामसुंदर जोशी | समर्थ व्यक्तिमत्त्व व जाणिवा |
| श्री. सुनीलजी | वारली चित्रकला |
| सौ. अपर्णाताई कार्लेकर | भाषा विषय शिकवावा कसा |

**सहाय्यक परिचारिका अभ्यासक्रम-प्रेरणा शिबिर**

स्थान- स्वरूपवर्धिनी, संख्या-१०० कालावधी २८।२ ते १।३।०९

(शिबिरात खालीलप्रमाणे व्याख्याने झाली.)

| | |
|---|---|
| दीनानाथ मंगेशकर रुग्णालय रुग्णालय परिचय | चित्रफीत |
| जंतुसंसर्ग कसा टाळावा | केळकर आजी |
| स्त्री आरोग्याचे प्रश्न | डॉ विशाखा मॅडम |
| गर्भाशय व जननेंद्रियांची रचना व कार्य | डॉ. सौ. नगरकर |
| वर्धिनीचा परिचय | सौ. बागेश्री पोंक्षे |
| सूर्यनमस्कार / प्राणायाम उपासना | सौ. स्नेहलता मुसळे |
| व्यक्तिमत्त्व व नेतृत्त्व विकास | प्रा. शिरीष आपटे |
| 'स्व'ची ओळख | सौ. मेधा नगरे |
| शिक्षणाचे महत्त्व | शिरीष पटवर्धन |

With Best Compliments From :

**ADEPT FLUIDYNE PVT. LTD.,**

Plot No. 4, S. No. 17/1-B, Kothrud Industrial Estate,
Kothrud, Pune 411 038
Phone : 25431474, 25441124, 25464551

**जननि। तुझ्या सन्मान-रक्षणी अर्पु रणी हे प्राण।**
**शत्रुकंठ भंगोनि घालु तुज दारुण रक्तस्नान ।।**

**सहाय्यक परिचारिका अभ्यासक्रम**

पौड व पुणे येथील या अभ्यासक्रमाच्या शाखांतील ८७ विद्यार्थिनींना प्रशस्तीपत्रक देण्याचा कार्यक्रम १५ जुलै रोजी झाला. या कार्यक्रमाला टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे डीन श्री. कारेकर अध्यक्ष म्हणून तर गुप्ते हॉस्पिटलचे डॉ. संजय गुप्ते हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ. गुप्ते यांनी वर्धिनीच्या कामाचे कौतुक करीत समाजाला अशा कामांची खूप आवश्यकता असल्याचे नमूद केले. अध्यक्षस्थानावरून बोलताना श्री. कारेकर यांनी सामाजिक दृष्टिकोनातून सेवेचे काय महत्त्व आहे हे समजावून सांगितले. यशस्वी विद्यार्थिनींचीसुद्धा प्रातिनिधिक मनोगते झाली. वर्धिनीचे सहकार्यवाह श्री. अविनाश जोशी यांनी सर्वांचे स्वागत केले. सौ. विजयाताई कुलकर्णी यांनी प्रास्ताविक तर डॉ. सचिन नगरकर यांनी कार्यक्रमाचा समारोप केला. नर्सिंगची प्रतिज्ञा घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन केंद्र

**पर्यायांचा विचार करायलाच हवा !**

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या माध्यमातून रविवार दिनांक १५ नोव्हेंबर रोजी एक कार्यशाळा घेण्यात आली. एम.पी.एस.सी./यु.पी.एस.सी. परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही कार्यशाळा घेण्यात आली. या परीक्षांचा निकाल खूप कमी लागतो तसेच यशस्वी करण्यासाठी खूप काळही द्यावा लागतो. या पार्श्वभूमीवर स्पर्धा परीक्षांची तयारी करीत असतानाच त्या तयारीच्या आधारावर करिअरचे अन्य कोणते पर्याय असू शकतात? अशी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मानसिकता उत्तम राहण्यासाठी काय करावे? असे विषय या कार्यशाळेत मांडण्यात आले. एकूण २५ विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला. या विद्यार्थ्यांना एम.आय.टी. स्कूल ऑफ बिझिनेसचे डायरेक्टर ग्रुप कॅप्टन श्री. दीपक आपटे तसेच वर्धिनीचे कार्यकर्ते मेजर किरण कुडलिंगार यांनी मार्गदर्शन केले.

**मुख्य परीक्षा मार्गदर्शन वर्ग**

अगदी थोड्या दिवसांवर येऊन ठेपलेल्या मुख्य परीक्षेच्या तयारीत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी केंद्राच्या वतीने रविवार दिनांक ६ डिसेंबर रोजी एका मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. एम.पी.एस.सी. परीक्षेत राज्यामध्ये गुणवत्ता यादीत चमकलेल्या सौ. शोभाताई ढोक, डॉ. नीलेश क्षीरसागर यांनी तसेच डॉ. प्रशांत टोपे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सांख्यिकी, राज्यघटना आणि भूगोल या विषयांचे प्रामुख्याने या वर्गामध्ये मार्गदर्शन करण्यात आले. उत्तम यश मिळवण्यासाठी उत्तरे लिहिताना मुद्द्यांची सुसंगती आणि तर्कसंगत भाषा या गोष्टींचे भान सांभाळावे असा या तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना सल्ला दिला.

**अमर होय ती वंशलता ।**
**निर्वंश जिचा देवाकरिता ।।**

# क्षण आनंदाचे



**अभ्यासिका केंद्रातील खालील विद्यार्थ्यांना सुयश मिळाले आहे.**

**एम.पी.एस.सी-२००६ ची मुख्य परीक्षा :** डॉ. गुणेश बागले, श्री. विनोद पाटील, डॉ. निलेश क्षीरसागर, श्री. दत्ता सांगोलकर, सौ. ज्योती संजय राजेशिर्के (PSI)

**ऑल इंडिया मेडिकल प्रवेश परीक्षा :** डॉ. सुहास गायकवाड, डॉ. जगदिश शिंदे, डॉ. तुषार जैन, डॉ. पवार, डॉ. निलेश दीक्षित, डॉ. प्रज्ञा पाईकराव, डॉ. नितिन पाईकराव, डॉ. राहूल गणकवार

**महाराष्ट्र राज्य मेडिकल प्रवेश परीक्षा :** डॉ. सुहास गायकवाड, डॉ. जगदिश शिंदे, डॉ. तुषार जैन, डॉ. पवार, डॉ. निलेश दीक्षित, डॉ. प्रज्ञा पाईकराव, डॉ. नितिन पाईकराव, डॉ. राहूल गणकवार, डॉ. गजानन रातोळीकर, डॉ. अमोल डांगे

**डी.एन.बी. प्रवेश परीक्षा :** डॉ. अतुल आरोटे, डॉ. मयुरा गोरे

**पी.एस.आय. निवडचाचणी मुख्य परीक्षा :** सर्वश्री बापू इंगळे, संतोष शेटे, विजय जगदाळे, गणेश इंगळे, महेश माळी, विजय जाधव

- वर्धिनीच्या अभ्यासिकेतील विद्यार्थी वैद्य श्री. नीलेश क्षीरसागर हे एम.पी.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण झाले. या परीक्षेत मुलांच्या गटात ते राज्यामध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले असून त्यांची उपजिल्हाधिकारी या पदासाठी निवड झाली आहे.
- **एम.पी.एस.सी. प्राथमिक निवड चाचणी परीक्षा :** सर्वश्री देवेंद्र रासकर, सतीश माळी, श्रीमंत पाटील, सौ. ज्योती राजेशिर्के, संजय राजेशिर्के, सौ. आर पाटील, डॉ. गुणेश बागले

**वर्धिनीतील विद्यार्थी व कार्यकर्ते :**

- पुण्यात संपन्न झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमामध्ये मल्लखांबाची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली होती. यामध्ये वर्धिनीचा युवक कार्यकर्ता संतोष घाडगे याचा महत्त्वाचा सहभाग होता. याच संतोष घाडगे याने अमरावती येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत तसेच कोल्हापूर येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत अनेक पारितोषिके पटकाविली. पुरलेल्या मल्लखांबावरील स्पर्धेत तो सुवर्णपदकाचा मानकरी ठरला. तसेच मध्य प्रदेशात झालेल्या राष्ट्रीय पातळीवरच्या स्पर्धेत पाच पैकी चार सुवर्णपदकांचा तो मानकरी ठरला आहे.
- कुमार कृष्णा गाडे याची भूमिका असलेल्या नाटकाचे 'स्टार माझा' या मराठी वाहिनीवर प्रसारण झाले.
- S.E.Engg. (Mech) चे शिक्षण घेणारा युवक

मयुर शेडगे याने कऱ्हाड येथे झालेल्या रोबो बनविण्याच्या स्पर्धेमध्ये भाग घेतला होता. या स्पर्धेत त्याला 'बेस्ट इनोव्हेशन' चा पुरस्कार मिळाला.

- वर्धिनीचे युवक कार्यकर्ते श्री. उमेश बिबवे हे पुणे विद्यापीठाची सेटची परीक्षा उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले.
- वर्धिनीचे युवक कार्यकर्ते श्री. पुष्कर वाडेकर हे कंपनी सेक्रेटरीची परीक्षा उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले.
- वर्धिनीचे युवक कार्यकर्ते श्री. दीपक भोरेकर हे बी.एड. (फिजिकल) ही परीक्षा विशेष गुणवत्तेसह उत्तीर्ण झाले.
- पुणे शहर बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेमध्ये वर्धिनीच्या रामकृष्ण शाखेचा वर्धक कुमार आकाश निंबर्गाकर याने ४९ किलो वजनाच्या गटामध्ये सुवर्णपदक मिळविले. तसेच 'मोस्ट प्रॉमिसिंग बॉक्सर' म्हणूनही त्याची निवड करण्यात आली.
- 'किमयागार' या सदरामधून दिनांक १२ व १९ सप्टेंबरला 'स्व'-रूपवर्धिनीचे सहकार्याध्यक्ष श्री. श्रीनिवास तथा रमेश जोशी यांचा विस्तृत परिचय प्रसारित झाला. तर २६ सप्टेंबर व ३ ऑक्टोबर या दोन तारखांना 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेचा परिचय प्रसारित झाला.
- 'स्व'-रूपवर्धिनीच्या रामकृष्ण शाखेचा वर्धक डॉ. मिलिंद भोई याची केंद्र सरकारने नुकतीच नियोजन मंडळाचा मानद सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे.
- श्रद्धानंद शाखेचा वर्धक कु. प्रतिक कोंडे हा माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेत दुसऱ्या क्रमांकाने व जिल्ह्यात सतराव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला.
- युवक कार्यकर्ते निलेश धायरकर यांना 'वीर सावरकर साहस पुरस्कारा'ने सन्मानीत करण्यात आले.

***वरील सर्वांचे वर्धिनीच्या वतीने हार्दिक अभिनंदन!***


## संपदा सहकारी बँक लि.

**मुख्य कार्यालय : ७१७ बुधवार पेठ, कसबा गणपती मंदिराजवळ, पुणे ४११ ००२**

**फोन नं. : (०२०) २४४५९७०८, फॅक्स : २४४९३२६१**

***आकर्षक व्याजदरांच्या विविध ठेव योजना आणि सुलभ कर्ज योजना***

**आपणांसाठी सादर करीत आहोत. कृपया अवश्य संपर्क साधा.**

| | |
|---|---|
| * बुधवार पेठ शाखा, पुणे | फोन नं. ०२०-२४४५९७०८, २४४५१८३० |
| * चाकण शाखा, जिल्हा पुणे | फोन नं. ०२१३५-२५२९३८, २५४७३३ |
| * सुभाषनगर शाखा, पुणे | फोन नं. ०२०-. २४४९५०२२, २४४९५४३४ |
| * कर्वे रोड शाखा, पुणे | फोन नं. ०२०-२५३९५८७६,२५३९४०६२ |


**की घेतले व्रत न हें अम्ही अंधतेने ।**
**लब्धप्रकाश-इतिहास-निसर्गमाने ।।**

## फिरती प्रयोगशाळा

सुरुवातीपासून फिरत्या प्रयोगशाळेचे काम पाहणाऱ्या श्री. सुनील कुलकर्णी यांच्या या योगदानाची दखल घेऊन साप्ताहिक सकाळच्या ३ जानेवारीच्या अंकामध्ये 'शिक्षणातील शिलेदार' या शीर्षकाखाली त्यांच्या या कामाचा परिचय प्रसिद्ध झाला होता.

● कराड येथील कल्पना चावला विज्ञान केंद्रामध्ये झालेल्या कार्यक्रमाला ४ थी ते १० वी मधील २०० विद्यार्थी व पालक उपस्थित होते. गमतीदार प्रयोगांच्या माध्यमातून रंगलेल्या या कार्यक्रमानंतर दहावीमधील विद्यार्थ्यांसाठी एक प्रयोगसत्र घेण्यात आले.

● सांगिसे येथील लक्ष्मीबाई लोखंडे आश्रमशाळा आणि परिसरातील १० वीमधील विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी १० वीच्या अभ्यासक्रमावर आधारित सर्व प्रयोगांचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शनाचे सत्र घेण्यात आले.

● २८ फेब्रुवारी व १ मार्च असे दोन दिवस जि. प. शाळा, फणसु ता. दापोली या शाळेतील तसेच परिसरातील ८ गावांच्या शाळांमधील शिक्षकांसाठी एक प्रशिक्षण वर्ग संपन्न झाला. या वर्गाला ३५ शिक्षक उपस्थित होते. दमट आणि क्षारयुक्त हवेमुळे प्रयोगाची अनेक साधने वापरताना शिक्षकांना अडचण येत होती. पण नेहमीच्या वापरातील अनेक वस्तूंचा, निसर्गात उपलब्ध असलेल्या अनेक गोष्टींचा वापर करून प्रयोगाची साधने कशी बनवता येतात. याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

**<u>सहभागी शिक्षकांच्या प्रतिक्रिया</u>**

● कोणतीही सबब न सांगता आम्ही स्वत: साधने तयार करून विद्यार्थ्यांना प्रयोग दाखवू; त्यांनाही साधने तयार करायला शिकवू.

● प्रयोगांच्या माध्यमातून विज्ञान विषय किती रसाळपणे शिकवता येतो याचे प्रत्यंतर आले.

● टाकाऊ गोष्टींमधून टिकाऊ व प्रयोगाला उपयुक्त साधने बनविता येऊ शकतात हा दृष्टिकोन या प्रशिक्षणामुळे मिळाला.

● आजपर्यंत शासकीय माध्यमातून अनेक प्रशिक्षण शिबिरे झाली पण हे प्रशिक्षण शिबिर खूप आवडले.

● या प्रशिक्षण वर्गात ज्या काही गोष्टी शिकवल्या, जे प्रयोग करून दाखविले, समजावून सांगितले त्या विषयावरची पुस्तिका लवकरात लवकर प्रसिद्ध करावी.

***'स्व'-रूपवर्धिनीने पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या सहकार्याने महानगरपालिकेच्या शाळांमध्ये तीन अभ्यासिका केंद्रे सुरू केली आहेत. सध्या शंभर विद्यार्थी या अभ्यासिकांचा लाभ घेत आहेत. तीनही अभ्यासिका केंद्रांच्या परिसरातील ज्येष्ठ नागरिक व गृहिणी या अभ्यासिकांच्या संचालनात सहभागी झाले आहेत हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे.***

**जे दिव्य, दाहक म्हणुनि असावयाचें ।**
**बुध्याचि वाण धरिले करि हे सतीचें ।।**

# केंद्रीय कार्यक्रम

## नियोजन बैठक

दिनांक ८ मार्च रोजी शैक्षणिक वर्ष २००९-१० ची नियोजन बैठक झाली. बैठकीच्या पहिल्या सत्रामध्ये आगामी वर्षातील स्वत:च्या कामाचे नियोजन लेखी स्वरूपात तयार करून सर्वांसमोर ठेवण्यात आले. दुसऱ्या सत्रामध्ये वर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. राजाभाऊ लवळेकर यांनी 'कार्यकर्त्यांची मानसिकता' या विषयावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रामध्ये शाखा विभाग, प्रकल्प विभाग आणि महिला विभाग अशा तीन गटामध्ये गटश: चर्चा झाली. आपापल्या विभागाची वर्षाची रचना काय असावी, कोणते बदल करावेत, नवे कोणते कार्यक्रम डोळ्यांसमोर आहेत यावर चर्चा झाली. सेवावर्धिनी संस्थेचे समन्वयक श्री. प्रमोद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाने बैठकीचा समारोप झाला.

## त्रिदशकपूर्ती मेळावे

वर्धापन दिनाच्या निमित्ताने युवक मेळाव्याच्या रूपाने पहिला कार्यक्रम झाला. प्रमुख पाहुणे म्हणून पुणे विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव उपस्थित होते. श्री. विश्वास कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले तर सूत्रसंचालन शंतनु पाटसकर यांनी केले. ३० वर्षाच्या वर्धिनीच्या कामावर आधारीत एक पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन या वेळी सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांचा उपाध्यक्ष श्री. उदय गुजर यांच्या हस्ते, तर पौड येथील डॉ. सौ. वैदेही व डॉ. सचिन नगरकर यांचा डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. 'आपल्या जीवनातील वर्धिनीचे स्थान' याविषयी काही प्रातिनिधिक मनोगते ऐकल्यावर डॉ. नरेंद्र जाधव यांनी आपले विचार मांडले.

**परिवार मेळावा :** १९ जुलै रोजी विवाहीत युवक-युवतींचा 'परिवार मेळावा' संपन्न झाला. जोडीदाराला 'स्व'-रूपवर्धिनीचा जवळून परिचय करून देण्यासाठी हा मेळावा घेण्यात आला. सुमारे ४० जोडपी सहकुटुंब उपस्थित होती. ओमकार पूजनानंतर पहिल्या सत्रामध्ये या मेळाव्यामागचा हेतू श्री. शिरीष पटवर्धन यांनी विषद केला. वर्धिनीमार्फत सध्या चालू असलेल्या सर्व शाखा आणि प्रकल्पांचा परिचय, त्यातील प्रेरणादायी अनुभव श्री. ज्ञानेश पुरंदरे आणि श्रीमती पुष्पाताई नडे यांनी सर्वांसमोर मांडले.

दुसरे सत्र 'परिचय सत्र' होते. उपस्थित प्रत्येकाने आपापला परिचय सर्वांना करून दिला. वर्धिनीच्या कामाचा इतका तपशीलात परिचय पहिल्यांदाच ऐकल्याचे अनेकांनी आवर्जून सांगितले तसेच काहींनी वर्धिनीच्या कामात सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली. आपल्या पतीमुळेच मला सामाजिक कामाची आवड निर्माण झाली असे एका युवकाच्या पत्नीने आवर्जून सांगितले.

त्यांनतर वर्धिनीच्या कार्यकारिणीचे सदस्य श्री. रामभाऊ डिंबळे यांनी उपस्थित गृहस्थी

जोडप्यांना मार्गदर्शन केले. सत्राच्या प्रारंभी म्हटलेल्या गीताची आठवण देत ते असं म्हणाले, ''मनातलं धृपद विसरलं नाही ही जरूर चांगली गोष्ट आहे, पण पुरेशी नाही.''

वर्धिनीच्या कामाचा संस्कार लाभलेला पती किंवा पत्नी लाभली हे जोडीदाराने आपले भाग्य समजावे कारण असा योग सर्वांच्या नशिबात नसतो. अशा युवक-युवतींचे वेगळेपण सुरुवातीला पटतेच किंवा आवडतेच असे नाही. हळू हळू राहण्यातील साधेपणा, विचारातील वेगळेपणा भावतो असे सांगून श्री. डिंबळे यांनी स्वत:च्या आयुष्यातील अनेक प्रसंग सांगितले.

विवाहाच्या वेळी होणाऱ्या सप्तपदी विधीतील सातवे पाऊल 'मैत्रीचे' असल्याचे आठवण करून देत त्यांनी असे सुचविले की, अशा मैत्रीच्या नात्याने जगलात तर ते जिणं खऱ्या अर्थाने 'सुखाचं जीणं' होईल. सहधर्मचारिणी व्हायचं असेल तर वर्धिनीच्या वातावरणात-संस्कारात

**वर्धिनीचा युवक कार्यकर्ता चंदन हायगुंडे याच्या विवाह निमंत्रण पत्रिकेतील खालील मजकूर सामाजिक भान जागविण्याचा संस्कार वर्धकांमध्ये कसा रुजतो याचा प्रत्यय देईल. त्याच्या आवाहनास भरघोस प्रतिसाद मिळाला व त्यातून त्याने सामाजिक संस्थांना आवश्यक ती मदत पोहोचवली.**

***आहेर स्वीकारला जाईल ...... पण....***

लग्न म्हणजे व्यक्तीच्या सामाजिकरणाची महत्त्वाची पायरी. तेव्हा आपले सामाजिक कर्तव्य काही अंशी पार पाडण्याच्या हेतूने लग्न समारंभात अवाजवी खर्च कमी करून आपल्या पीडीत आणि वंचित देशबांधवांच्या सेवेसाठी यथाशक्ती निधी अर्पण करण्याची आमची भावना आहे.

- ईशान्य भारतात म्हणजे आसाम, मेघालय, त्रिपुरा, मणिपूर, मिझोराम, नागालँड आणि अरूणाचल प्रदेश या राज्यांना बांगलादेशी घुसखोरी, दहशतवाद आदि समस्यांनी घेरले आहे. देशद्रोही घुसखोरांनी तेथील मोठा भूप्रदेश गिळंकृत करून स्वतंत्र भारतात आपल्याच भूमीत गुलामासारखे रहाण्याची वेळ आणली आहे. या घुसखोरीच्या आणि दहशतवादाच्या विरोधात कार्यरत असणाऱ्या देशबांधवांच्या चळवळीसाठी यथाशक्ती निधी अर्पण करण्याची आमची इच्छा आहे.
- महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यात तळासरी या वनवासी भागात संघर्षपूर्ण परिस्थितीत वनवासी कल्याण केंद्राच्या निवासी शाळेचा प्रकल्प चालतो. या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक आणि प्रेरणादायी विषयांवरील पुस्तके देण्याची आमची इच्छा आहे. आमच्या या उपक्रमात आपण योगदान देण्यास इच्छुक असाल तर आपल्या निधीचा आहेर म्हणून स्वीकार करायला आम्हाला आनंद वाटेल. आपण नक्कीच योगदान द्याल ही अपेक्षा व्यक्त करताना, पुष्पगुच्छ, भेटवस्तु व अन्य स्वरूपाचा आहेर आणू नये ही विनंती.

वाढलेल्या आपल्या पतीचा/पत्नीचा धर्म काय आहे हेही जाणून घ्यायला हवं असं सांगून ते म्हणाले, ''पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या, आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी'' हा तो धर्म आहे. असा धर्म असलेल्यांबरोबरचा संसार म्हणजे अशा कामात सहभागी होणं.

## स्वाईन फ्लू... प्रशिक्षण व मदत केंद्रावरील अनुभव

पुण्याचे नाव स्वाईन फ्लूच्या प्रादुर्भावाने जरा जास्तच गाजले. आजार आटोक्यात आणण्यासाठी राज्यशासनाने पुण्यातील सर्व शाळा व महाविद्यालये बंद ठेवण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार १० ऑगस्टपासून वर्धिनीची बालवाडी, सर्व शाखा, अभ्यासिका केंद्र असे सर्व विभाग बंद ठेवले होते. रा. स्व. संघ जनकल्याण समितीने पुढाकार घेऊन महानगरपालिका संचालित अशी सुमारे ३१ मदत केंद्रे सुरू केली होती. यापैकी सुमारे ८ केंद्रांवर वर्धिनीचे युवक युवती कार्यकर्त्यांची आपली सेवा रुजू केली. या निमित्ताने केंद्रांवर येणाऱ्या, केंद्राशी संपर्क साधणाऱ्या रुग्णांचे, संशयित रुग्णांचे वेगवेगळे अनुभव घेता आले.

त्यातील हे दोन अनुभव पुरेसे बोलके आहेत.

नायडू रुग्णालयाशी जोडलेल्या मदत केंद्रावर जे कार्यकर्ते काम करीत होते. त्यांना दूरध्वनीच्या माध्यमातून रुग्णांशी संवाद साधण्याचे काम सोपविले होते. या संवादातून सहजपणे समुपदेशनाचेही काम कळत नकळत झाले व त्याचे परिणामही अनुकूल घडले.

१) स्मिता नावाच्या एका आजारी महिलेचा दूरध्वनी आला. फोनवरून त्या खूप चिंतेत आहेत आणि त्यांच्या घरी कोणीही नाही हे समजले. स्वाईन फ्ल्यूच्या आजारासारखी (घसा दुखणे, सर्दी) काही लक्षणे दिसत असल्यामुळे नायडू रुग्णालयात त्यांनी तपासणीही केली होती. पण तपासणी अहवाल मिळाला नसल्याने त्या खूप घाबरलेल्या होत्या. कार्यकर्त्याने त्यांना धीर दिला. काळजी काय घ्यायची हे समजावून सांगितले. २-४ मिनिटांच्या या संवादामुळे त्यांची भीती कमी झाली.

२) शेख नावाच्या एका माणसाच्या मुलाची तपासणी झाली होती पण त्याचा रिपोर्ट आलेला नव्हता. केंद्रामध्ये असलेल्या यादीत त्याचे नाव नव्हते. मग या कार्यकर्त्याने त्यांना बसवले, त्यांची, त्यांच्या आजारी मुलाची चौकशी केली, आजाराची काय काय लक्षणे आहेत हे नीट विचारून घेतले आणि मग लक्षात आले की या मुलाला स्वाईन फ्लूची लक्षणे नाहीत. तरीसुद्धा काय काळजी घ्यायची हे समजावून सांगितले. यामुळे ती व्यक्ती इतकी खूष झाली की, वर्धिनीच्या त्या कार्यकर्त्यांचा हात हातात घेऊन त्याने पुन:पुन्हा धन्यवाद दिले आणि 'खुदा तुम्हारा भला करेगा' असा आशिर्वाद देऊन ते गेले.

ते भारतीय अबला-बलतेज काही ।
अद्यापि या भरतभूमित लुप्त नाही ।।

*** महामेळावा**

त्रिदशकपूर्तीच्या निमित्ताने महामेळाव्याचे आयोजन रविवार दिनांक २५ ऑक्टोबर रोजी करण्यात आले. हा मेळावा बी.एम.सी.सी. महाविद्यालयाच्या टाटा सभागृहामध्ये संपन्न झाला. एकूण ३२० युवक युवती या मेळाव्याला उपस्थित होते.

भोजन व्यवस्था- चहा व न्याहारीची जबाबदारी स्वामी योगानंद शाखेच्या पालकांनी सांभाळली तर भोजनासाठी पोळ्या स्वामी अखंडानंद व रामकृष्ण शाखेच्या पालकांनी पुरविल्या. स्वादयुक्त भोजनाची भेट वर्धिनीचे देणगीदार आणि हितचिंतक श्री. जयंत नातू यांच्याकडून मिळाली. पालकांच्या व हितचिंतकांच्या अशा सक्रीय योगदानामुळे पदार्थांची रुची अधिकच वाढली.

या मेळाव्यामध्ये खालील वक्त्यांनी मार्गदर्शन केले.

| | |
|---|---|
| प्रा. श्री. रामभाऊ डिंबळे | वर्धिनी काल-आज-उद्या |
| प्रा. श्री. शरद वाघ | कुटुंबजीवन व्यवस्थेचे भारतीय जीवनातील स्थान |
| मा. श्री. मुकुंदराव गोरे | समाजातील सज्जन शक्ती संघटित करण्याच्या कामात वर्धिनीकडून अपेक्षा |

मेळाव्याचे उद्‌घाटन बीएमसीसी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. अनिरुद्ध देशपांडे सर यांनी केले तर समारोपाला आय.टी. आणि व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञ श्री. अच्युत गोडबोले यांचे मार्गदर्शन लाभले.

**रक्तदान शिबिरे :**

गेल्या किमान पंचवीस वर्षांपासून प्रत्येक वर्षी वर्धिनी रक्तदान शिबिराचे आयोजन करीत आलेली आहे. डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्ताने होणाऱ्या या रक्तदान शिबिरातून आजवर २००० हून अधिक रक्तपिशव्या संकलित झालेल्या आहेत. यावर्षी या शिबिरात ११८ रक्त पिशव्या संकलित झाल्या. तातडीच्या गरजेच्या वेळीही वर्धिनीने रक्तदान शिबिराचे आयोजन अनेकदा केलेले आहे. सध्याची तातडीची गरज लक्षात घेऊन आणि के.ई.एम. रुग्णालयाची रक्तपेढी आणि पिंपरी येथील पी.एस.आय. रक्तपेढी यांच्या विनंतीला मान देऊन वर्धिनीने दोन रक्तदान शिबिरांचे आयोजन सप्टेंबर महिन्यामध्ये केले होते. या दोन शिबिरात मिळून ९६ रक्तपिशव्या रक्त संकलित झाले.

यापैकी एका रक्तदान शिबिराचे आयोजन ऐन गणेशोत्सवात करण्यात आले होते. ढोल ताशा पथकांच्या वादनाचा सराव गेल्या चार वर्षांपासून संगम ब्रिजवरील डेक्कन एम्ब्रॉयडरी कंपनीच्या आवारात होत आहे. या वर्षीच्या सरावाच्या काळातच या शिबिराचे आयोजन के.ई.एम. रक्तपेढीसाठी करण्यात आले. डेक्कन एम्ब्रॉयडरी कंपनीच्या इमारतीत कंपनीच्या अनुमतीने हे शिबिर घेण्यात आले. या स्तुत्य उपक्रमाला कंपनीने नुसती परवानगी दिली नाही तर कंपनीचे प्रमुख श्री. भुपेंद्र श्रॉफ यांनी रक्तदानासाठी आलेल्या प्रत्येकाला पुरेशी न्याहारीची व्यवस्थाही केली

**अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला ।**
**मारिल रिपु जगति असा कवण जन्मला ।।**

आणि प्रोत्साहन म्हणून एकेक शर्ट भेटस्वरूपात दिला.

दुसरे रक्तदान शिबिर स्वामी दयानंद शाखेच्या वतीने पिंपरीच्या पी.एस.आय. रक्तपेढीसाठी १३ सप्टेंबर रोजी घेण्यात आले. शाखेशी संबंधित पालक, युवक, व्यावसायिक युवक अशांच्या योगदानातून ६५ रक्तपिशव्या संकलित झाल्या. दोन्ही रक्तदान शिबिरांची जबाबदारी श्री. प्रशांत तांबे आणि श्री. राहूल शिळिमकर यांनी सांभाळली.

---

# हम होंगे कामयाब एक दिन !

(ही प्रेरणादायी सत्यकथा आहे 'सुधीर गोरखनाथ कातकडे' या अभ्यासिकेतील विद्यार्थ्याची.)

लक्ष्मीपूजनाचा दिवस होता. आईने पूजेची तयारी करून ठेवली होती. तयारी ती काय? देवाच्या दोन तसबिरी, शेताच्या कडेला असलेल्या फुलझाडांवरची फुले आणि घरातील 'लक्ष्मी'. पूजेनंतर नमस्कार करायला वाकलो आणि डोळ्यात आसवं आली. अवघ्या तीन-चार रूपयांची चिल्लर घरात होती. या 'लक्ष्मीची' मनोभावे पूजा घरच्यांनी बांधली होती. डोळ्यासमोर माझ्याच गावातील माझ्या जवळच्या नातेवाईकांच्या घरचे दृश्य तरळले. त्यांच्या घरी 'लक्ष्मी' प्रसन्न होती. नोटांची थप्पी मी तिथे पाहिली होती. सरस्वतीची पूजा नीट केली तरच लक्ष्मी प्रसन्न होणार हे मला त्याक्षणी जाणवलं आणि लक्षात आलं की परिस्थिती बेताची म्हणून मला पालकांनी मामाकडे पाठवले. पण मीच संगत बिघडवून घेतली आणि सातवीपर्यंत सतत पहिला दुसरा येणारा मी नववीत नापास झालो. घरच्यांच्या दृष्टीने आता शिक्षणापेक्षा शेतीकामालाच माझा उपयोग. शाळा सुटली. त्या लक्ष्मीपूजनाने माझ्यातील जिद्द जागी केली. आईवडिलांचे आशीर्वाद घेऊन मी घर सोडले. आडवाटेचे माझे खेडे सोडून मी शहरात आलो. नशिबाने एका बंगल्यावर मला वॉचमनची नोकरी मिळाली. रात्री वॉचमन म्हणून काम करीत दिवसा गाडी चालवायला शिकलो आणि त्याच मालकाच्या गाडीवर ड्रायव्हर म्हणून काम करायला लागलो. मालक आणि त्यांच्या कुटुंबातील सर्वचजण खूप चांगले होते. त्यांच्या मुलांच्या आग्रहामुळे दुसऱ्या प्रयत्नांत मी दहावी झालो. ५३ टक्के गुण मिळाले. माझा आत्मविश्वासही वाढला आणि उत्साहही. त्याच उत्साहामध्ये मी महाविद्यालयात प्रवेश घ्यायला गेलो. कला वाणिज्य आणि शास्त्र शाखा म्हणजे काय हे मला मुळीच माहिती नव्हतं. मी ज्या रांगेत उभा होतो ती होती शास्त्रशाखेच्या प्रवेशाची. रांगेत उभ्या असलेल्या मुलांकडे चौकशी करताना समजलं की शास्त्र शाखेची फी नऊशे रूपये आहे. माझ्याजवळ फक्त पाचशे रूपये होते म्हणून मी ती रांग सोडून दिली आणि दुसऱ्या रांगेत उभा राहिलो. ती होती वाणिज्य शाखेची. फी ३५०/- रूपये इतकीच असल्याने मी वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला आणि नोकरी सांभाळून

**अग्नी जाळि मजसी ना खड्ग छेदितो ।**
**भिउनि मला भ्याड मृत्यु पळत सूटतो ।।**

कॉलेजला जायला लागलो. सर्व तासांना आणि तेही सलग कधी बसता यायचे नाही त्यामुळे अकाउंटस सारख्या विषयासंबंधी अनेक शंका डोक्यात असायच्या. अकाउंटस्‌च्या तासाला प्रश्न विचारायचो. मी नियमित येत नसल्याचे माहिती असल्याने मी मुद्दाम प्रश्न विचारतो अशी शंका येऊन प्राध्यापकांनी मला वर्गाबाहेर काढले. पण त्यामुळे मी खचलो नाही. मी प्राचार्यांना भेटलो. नोकरी करून शिकत असल्याचे सांगितले व त्यांना विनंती केली की मला कॉलेजमध्येच जर रात्रपाळीच्या वॉचमनची नोकरी दिलीत तर दिवसा मी कॉलेज करू शकेन. त्यांनी मला प्रोत्साहन दिले व तशीच नोकरीची संधीही दिली. वॉचमनचे काम करीत मी त्याच महाविद्यालयातून वाणिज्य पदवीधर झालो. अकाउंटस् विषयात मी वर्गात पहिला आलो. माझ्या आईवडिलांनाही खूप आनंद झाला. आता माझा आत्मविश्वास वाढला होता त्यामुळे मी बी.बी.ए साठीची प्रवेशपरीक्षा दिली आणि चांगले गुण मिळाल्याने पुणे विद्यापीठात प्रवेशासाठीच्या मुलाखतीला आलो.

मुलाखतीमध्ये माझे इंग्रजीचे 'अगाध' ज्ञान पाहून मुलाखत घेणाऱ्या प्राध्यापिका बाईंच्या चेहऱ्यावरील प्रश्नचिन्हे मला दिसायला लागली. मी त्यांना विनंती केली की मला फक्त दोन महिन्यांची मुदत द्या मी माझे इंग्रजी सुधारीन. मी खूप मेहनत घेतली आणि मला प्रवेश दिल्याचा त्यांना आज नक्कीच अभिमान वाटतो आहे अशी मी प्रगती करून दाखवली आहे. पुण्यात आलो खरा पण रहाण्याचा प्रश्न होताच. शासकीय वसतीगृहात प्रवेश मिळेपर्यंत ८-१० दिवस मी चिवडा बिस्किटे खाऊन आणि वाहनतळावर झोपून दिवस काढले. 'स्व'-रूपवर्धिनीमध्ये अभ्यासाला यायला लागल्यापासून आणि येथील वातावरणामुळे माझ्याही मनात समाजासाठी काम करायला हवं हा विचार पक्का होतो आहे; नव्हे-नव्हे मी त्याची सुरवातही केली आहे. माझ्यासारखेच वॉचमनचे काम करणाऱ्या दोघांना मी शिकवायला सुरूवात केली आहे.

❖ ❖ ❖

# दत्ताची 'सुवर्णमयी' वाटचाल...

दीपबंगला परिसरातील एका गरीब वस्तीत राहणारा दत्ता १९८२-८३ च्या आसपास वर्धिनीच्या संपर्कात आला. शाखेच्या नित्य संपर्कामुळे हळूहळू घरच्यांनाही कार्यकर्त्यांची व येणाऱ्या मित्रांची सवय झाली. वडिलांचे उत्पन्न बेताचे आणि त्यातच व्यसनाकडे पावले वळलेली, पण दत्ताबद्दल, वर्धिनीबद्दल खूप अभिमान. अशा वातावरणात वाढणाऱ्या दत्ताला परिस्थितीची जाणीव होती. शाळकरी वयातच शाखा सांभाळून त्याने दूध घरपोच पोहोचवण्याचे काम स्वीकारले. या कामातूनच त्याला एका बंगल्यात छोटी छोटी कामे मिळायला लागली. दत्ता प्रत्येक काम अगदी प्रामाणिकपणे आणि तन्मयतेने करीत होता. दत्ताच्या शिक्षणाला कळत नकळत आधार मिळत होता. शालेय शिक्षण संपवून दत्ता महाविद्यालयात दाखल झाला. शाखेची जबाबदारी वाढली. शाखाप्रमुख म्हणून काम पाहू

**द्वेषासि दुष्ट रुढीसी । सोडावे ।**
**सख्यासि आईच्यासाठी जोडावे ।।**

लागला. कामं सांभाळून शाखेची जबाबदारी, शिक्षण व्यवस्थित चालू होते. ज्या बंगल्यात काम करीत होता त्यांच्याच नात्यातीत 'सुवर्णा' त्याची जीवनसाथी झाली.

आयुष्याच्या या टप्प्यावर वेगवेगळ्या आर्थिक आणि मानसिक आंदोलनांना झेलत आता दोघांचा प्रवास सुरू झाला. लहानपणापासून केलेल्या छोट्या छोट्या कामांमुळे व्यवसाय करण्याकडे कल होता. मुंबईला जाऊन हॉटेल्सना वस्तू पुरवण्याचा व्यवसाय त्यांनी सुरू केला. दोघांनीही प्रचंड कष्ट उपसले. एका टप्प्यावर स्थिर उत्पन्नासाठी नोकरी करण्याचे दोघांनी ठरविले आणि पुण्याला परतले. दत्ता एका रंग उद्योगात लागला तर सुवर्णा एका दूध सोसायटीत. दत्ताच्या कंपनीत संप सुरू झाला. संपाचे कारण पटण्यासारखे नसल्याने दत्ता संपात सहभागी तर झाला नाहीच पण त्याने कंपनीमधील आपल्या सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन पटवून दिले की या संपामुळे झाले तर आपलेच नुकसान होणार आहे. उत्पादनापासून माल विक्रीसाठी बाहेर जाण्यापर्यंतची सर्व कामे दत्ताच्या नेतृत्त्वाखाली त्याच्या सहकाऱ्यांनी सांभाळली. संपकरी कामगारांचाही त्याने विश्वास मिळवला आणि सामोपचाराने संप मिटवून सर्वजण पुन्हा जोमाने कामाला लागले. दत्ताच्या या कर्तबगारीला कंपनीनेही सन्मानित केले. वाहतूक आणि एक्साईज विभागाचा अधिकारी म्हणून तो काम पाहू लागला. या कंपनीत १०-१२ वर्षे नोकरी केली. या काळात आपल्याबरोबर नोकरीला लागलेल्या आणि वेगवेगळी व्यसने करू लागलेल्या आपल्या १०-१२ सहकाऱ्यांना त्याने त्या सवयीतून सोडविले. माध्यम एकच 'शाखेने रुजवलेला अनौपचारिक संपर्क'. आज व्यसनात वेळ घालवण्यापेक्षा त्याचा एक सहकारी सुटीच्या दिवशी आणि काही वेळा मुद्दाम सुटी घेऊन आळंदीच्या मंदिराची सफाई करण्याचे काम करू लागला आहे.

सुवर्णानेही नोकरीच्या निमित्ताने दूध 'टँकरने' पुरवण्याचे कौशल्य प्राप्त केले, माणसे जोडली, अधून मधून गृहपयोगी वस्तूंची प्रदर्शने आयोजित करून आपल्यामधील व्यावसायिक वृत्ती जपून ठेवली. व्यवसाय करण्याची मूळ ओढ त्यांना अस्वस्थ करीत होतीच. या टप्प्यावर दोघांनीही नोकरी सोडली व स्वत:चा ट्रेडिंग व्यवसाय सुरू केला. एकमेकांमधील गुणांचा वापर करीत त्याच भांडवलाच्या आधारावर कंपन्यांना लहान मोठ्या पण नित्य लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा करण्याचा व्यवसाय सुरू केला आणि अगदी दोन तीन वर्षांच्या कालावधीतच उलाढालीच्या आकड्यांना 'कोटींची' सवय लावली. प्रामाणिकपणा, प्रचंड कष्ट यांच्या जोरावर दोघेही जण व्यवसायातील नव्या नव्या आव्हानांना सामोरे जात आहेत, नवीन उद्दिष्टे अंमलात आणत आहेत, संपर्कात येणाऱ्या प्रत्येक चेहऱ्यामागचा माणूस शोधून त्याला आपलेसे करीत आहेत आणि 'हेच तर वर्धिनीनं शिकवलं आहे' असं सहजपणे सांगून वर्धिनीच्या कामाचे मोल ठळकपणे अधोरेखित करीत आहेत.

❖ ❖ ❖

**विदेशीसि ना शिवू । शक्यतो वृत्ती बाणावी ।।**

# मला नोकरी हवीयं
# पण स्वाभिमान सोडून नव्हे...

शिशिर... लहान चणीचा मुलगा घरच्या बेताच्या आर्थिक परिस्थितीमुळे दहावी नंतर पुढचे शिक्षण चालू न करता नोकरीच्या शोधात हिंडत होता. नशिबाने त्याला एका बांधकाम व्यावसायिकाकडे क्लार्कची नोकरी मिळाली. नियमितपणे आणि प्रामाणिकपणे काम करणाऱ्या शिशिरच्या कामावर मालक खूष होते. कामाच्या वेळात मालकांसाठी पान-सिगारेटची पाकिटं आणण्याचे काम त्याला अनेकदा करावे लागत होते. वर्धिनीच्या शाखांमध्ये झालेल्या संस्कारांमुळे व्यसनांच्या बाबतीत त्याचे विचार ठाम होते पण नोकरीच्या कामातील भाग म्हणून काही दिवस त्याने या गोष्टी सहन केल्या. असह्य झाल्यावर मात्र एकदिवस त्याने आपल्या मालकाला सांगितले की आपण मला क्लार्क म्हणून नेमले आहेत. हे काम आणखीन अधिक वेळ आणि आहे त्याच पगारावर करायला सांगितलेत तरी मी करीन पण यापुढे पानं-सिगारेट आणून देण्याचे काम मी करणार नाही. त्याच्या या उत्तराने मालक चिडले आणि म्हणाले 'तुला हे काम जमणार नसेल तर उद्यापासून येऊ नकोस'. ठाम विचारांमुळे शिशिरची हातातील नोकरी गेली आणि शोध मोहीम पुन्हा सुरू झाली. शिशिरच्या कामाचा, प्रामाणिकपणाचा आणि त्याच्या विचारांचा प्रभाव त्या बांधकाम व्यावसायिकाच्या पत्नीवर पडलेला होता. आपल्या पतीच्या मागे लकडा लावून तिने शिशिरला पुन्हा कामावर घेण्याचा आग्रह धरला. सदर मालकाने शिशिरला पुन्हा बोलावून घेतले व उद्यापासून कामाला ये असे सांगितले. शिशिरने त्यांना सांगितले की मला नोकरीची गरज आहे पण मी तुमच्याकडे नोकरी करणार नाही. त्याच्या या ठामपणापुढे त्या मालकांना काही बोलता येईना पण अशा गुणी मुलाचे आपण काहीतरी कल्याण करावे असे त्यांनाही वाटले आणि पुण्यातील वाहन बनवणाऱ्या एका मोठ्या कंपनीत त्यांनी त्याला नोकरी मिळवून दिली. अंगच्या गुणांनी शिशिरने नव्या नोकरीतही आपले स्थान भक्कम केले. नोकरी करून वाणिज्य आणि कायदा विषयातील पदवीपर्यंतचे शिक्षण त्याने पूर्ण केले. मला नोकरी हवीय पण 'स्वाभिमान सोडून नव्हे' या संस्कारांचे मूळ वर्धिनीच्या कामात आहे हे सांगताना त्याच्या कुटुंबियांना अभिमानच वाटतो.

❖ ❖ ❖

**चित्ताचा शुद्ध । शुद्ध तोचि होतो ।**
**जातीचा असो कुण्याही तो ।।**

# सिंहगड संवर्धन प्रकल्प

*('स्व'रूपवर्धिनीचे युवक कार्यकर्ते वर्धिनी व्यतिरिक्त अन्य वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमात सहभागी असतात किंवा असे उपक्रम सुरूही करतात. राजे शिवराय प्रतिष्ठान हे त्यातील एक नाव. राजे शिवराय प्रतिष्ठान आणि वर्धिनीने एक आगळावेगळा उपक्रम हाती घेतला होता त्याचा वृत्तांत.)*

सिंहगड! पुण्यापासूनच जवळ असलेला, पर्यटकांनी सदैव फुललेला, असंख्य ऐतिहासिक घटनांचा साक्षी असलेला, हिंदवी स्वराज्याचे छत्रपति यांच्या पावनस्पर्शाने पावन झालेला असा हा लढवय्या गड! पण आजची ह्याची अवस्था अतिशय केविलवाणी आहे. गडावर जागोजागी इतस्तत: पसरलेले कचऱ्याचे ढिग, ठिकठिकाणी उपहारगृहांनी व्यापलेली जागा आणि त्यावर कळस म्हणजे युवा पिढीचे गलिच्छ वर्तन पाहून कोणाही जागरूक नागरीकाचे हृदय हेलावून जाईल.

पुण्यातील राजे शिवराय प्रतिष्ठान या संस्थेच्या कार्यकर्त्यांना ही गोष्ट खटकली. प्रतिष्ठानने या गोष्टीच्या मुळाशी जायचे ठरविले तेव्हा असे आढळून आले की गडावर येणाऱ्यांना या गडाच्या पावित्र्याची जाणीव नाही. त्यातूनच 'सिंहगडाचे आवाहन' या माहितीपटाची निर्मिती राजे शिवराय प्रतिष्ठानने केली.

'सिंहगडाचे आवाहन' या माहितीपटात सिंहगडाचा संपूर्ण इतिहास, सद्य परिस्थिती व भविष्यातील धोके सादर केले आहेत. संपूर्ण आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेऊन हा माहितीपट बनविण्यात आला आहे.

रविवार दि. ४ जानेवारी २००९ रोजी या माहितीपटाचे अनावरण सुप्रसिद्ध शाहिर श्री. हेमंत मावळे यांच्या हस्ते सिंहगडावर झाले. ४ जानेवारी पासून पुढील दोन महिने दर रविवारी हा माहितीपट सिंहगडावर दारूकोठारात पर्यटकांना मोफत दिवसभर दाखविण्यात आला. आत्तापर्यंत सुमारे ४०,००० नागरीकांनी या माहितीपटाचा लाभ सिंहगडावर घेतला. माहितीपटाच्या आजपर्यंत सुमारे दोनशे सी.डी. विकल्या गेल्या. कित्येक पर्यटक माहितीपट पाहून भारावून गेले.

जर्मनीहून ख्रिस्तोफर निकोलस नावाचा एक पर्यटक गडावर आला होता. माहितीपट बघून तो अतिशय आश्चर्यचकित झाला. तो म्हणाला, ''सरकारच्या कुठल्याही पाठिंब्याशिवाय तुम्ही करीत असलेली ही गोष्ट अतिशय महान आहे.''

'स्व'-रूपवर्धिनीस हार्दिक शुभेच्छा!

**अमृता नर्सिंग होम**

**डॉ. सौ. मनिषा नारकर**
फो. ९४२२४३५४०१
**मु. पो. तळेरे, ता. कणकवली,**
**जिल्हा. सिंधुदुर्ग**

**व्हावया स्वदेश सर्व सिद्ध आत्मशासना ।**
**नव्या पीढीस द्या त्वरे समग्र युद्धशिक्षणा ।।**

विशेष लेख

# विद्यार्थी मित्रांनो..

*शाखा आणि प्रकल्प विभागाच्या संक्रांत उत्सवात प्रमुख अतिथी या नात्याने पुण्याचे तत्कालीन मुख्य आयकर आयुक्त श्री. एम. नरसिमप्पा यांनी व्यक्त केलेले विचार*

विद्यार्थी मित्रांनो,

आपण सादर केलेली विविध क्रीडाप्रकारांची प्रात्यक्षिके मी पाहिली. 'अतिशय उत्तम आणि दिमाखदार' असंच त्याचं वर्णन करावं लागेल. 'स्व'-रूपवर्धिनी ही संकल्पना ज्यांनी जन्माला घातली त्या आपल्या संस्थेच्या संस्थापकांचं मनापासून हार्दिक अभिनंदन करायला हवं असं मला वाटतं. 'स्व'-रूपवर्धिनी ही संस्था नसून ही एक चळवळ आहे असं माझं मत आहे. या चळवळीला पुढे नेणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचंही मनापासून अभिनंदन. भविष्यामध्ये 'स्व'-रूपवर्धिनी ही संपूर्ण देशाच्या दृष्टीने एक रोल मॉडेल म्हणून उदयास येईल असा मला ठाम विश्वास वाटतो. आजची ही देखणी प्रात्यक्षिके सादर करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचं, त्यांना तयार करणाऱ्या प्रशिक्षकांचं/शिक्षकांचं आणि सर्व पालकांचंही मनापासून हार्दिक अभिनंदन.

आपल्या सर्वांच्या समवेत आजची ही संध्याकाळ माझ्या दृष्टीने खूप विशेष आहे. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मी उपस्थित राहिलो खरा पण आपली प्रात्यक्षिके पाहीपर्यंत मला कल्पनाही नव्हती की तुम्ही सर्व लहान मुलं इतकी देखणी आणि धाडसी प्रात्यक्षिके सादर कराल. तुमच्या कौशल्याने मी थक्क झालो आहे.



आज आपल्याला, आपल्या देशाला जर कशाची आवश्यकता असेल तर ती आहे चैतन्याची- राष्ट्रीय चैतन्याची, सामाजिक भानाची, धैर्याची, धाडसाची आणि आत्मविश्वासाची. समाजामध्ये आज अनेक शाळा आणि शैक्षणिक संस्था आहेत पण या साऱ्या व्यावसायिक/धंदेवाईक शिक्षणसंस्था झाल्या आहेत. या संस्थांमधून शिक्षण दिले जात नाही तर या संस्था त्या-त्या संस्थेच्या विश्वस्तांसाठी/पदाधिकाऱ्यांसाठी पैसे कमावण्याचे साधन बनल्या आहेत. आज अनेक ठिकाणी शैक्षणिक संस्थांकडे मोठ-मोठ्या आणि देखण्या इमारती आहेत, फीच्या माध्यमातून जमा होणारे लाखो रुपये आहेत, 'आयात' केलेले तज्ज्ञ शिक्षक आहेत जे लाखो रुपये फी भरणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकवतात पण त्यांच्या ज्ञानाचा, संस्थेकडे उपलब्ध असलेल्या सर्व संसाधनांचा लाभ स्थानिक मुलांना मिळत नाही. आपल्या देशाच्या दृष्टीने हे अतिशय दुर्दैवाचे आहे पण आपल्या संस्थेचे काम पाहिल्यावर मला असे वाटते की कोणत्याही इमारतीशिवाय, सोयी-

**तुझे कर्तव्य तू कर. इतर करोत, न करोत.**

सुविधांशिवाय केवळ शाखेच्या माध्यमातून जे चैतन्य, जो आत्मविश्वास, जे धाडस वर्धिनीने तुमच्यात उत्पन्न केले आहे ते फार मोलाचे आहे आणि त्यासाठी मी तुम्हा सर्वांना अभिवादन करतो.

आपले हे सर्व काम पाहिल्यावर मला असे मनापासून वाटते की, वर्धिनीचे हे काम देशात सर्वत्र पोहोचविले पाहिजे. आज या निमित्ताने मी एक संकल्प केला आहे की वर्धिनीच्या या वाटेने चालत जाऊन आंध्र प्रदेशातील किमान माझ्या गावी वर्धिनीसारखी एक संस्था मी सुरू करेन. आपली प्रात्यक्षिके पाहत असताना आपल्या संस्थेच्या कार्यकर्त्यांशी मी हे बोललो आहे, की आपण काम सुरू कसे केले, कामाची कार्यपद्धती, कामातील अनुभव, केवळ या कामासाठी झोकून देऊन काम करणारे कार्यकर्ते कसे घडले, 'आपल्या देशासाठी सर्व काही प्राधान्याने करायचे' ही भावना विद्यार्थ्यांमध्ये/कार्यकर्त्यांमध्ये कशी रुजवली याची माहिती देणारी एखादी वेबसाईट असावी.

भारत आपला देश आहे. या देशाच्या नावातच सर्व काही आहे 'भा' म्हणजे प्रकाश आणि 'रत' म्हणजे रस. ज्या देशातील लोकांना अंतिम सत्याच्या प्रकाशात रस आहे तो देश म्हणजे 'भारत'. आपल्या पुत्रानेसुद्धा अंतिम सत्याच्या प्रकाशाच्या दिशेने वाटचाल करावी असे वाटत असल्यानेच बहुदा राजा भरताला त्याच्या वडिलांनी हे नाव दिलं असावं. हाच अंतिम सत्याचा प्रकाश आपणा सर्वांना ज्ञान देतो, आपलं प्रबोधन करतो आणि आपल्या सर्वांना कृतीशील करतो. हे ज्या देशात घडतं त्याचं नाव म्हणजे 'भारत'. अशी तेजाची काही किरणं मी येथे पाहिली जी आगीशी खेळत होती. प्रथम तुम्ही सामर्थ्यवान झालं पाहिजे म्हणजे तुम्ही आयुष्यात यशस्वी होता. एकदा तुम्ही शरीरानं समर्थ असलात की मनानं ताकतवान, बुद्धीने प्रखर अशा सर्वच दृष्टीने समर्थ व्हायला तुम्ही सिद्ध होता आणि मग आपल्या आतही डोकावू लागता. तो 'स्व'.

मी कोण आहे? मी म्हणजे केवळ हाडं-मासाचा आणि रक्ताचा सापळा की मी म्हणजे आणखी काही वेगळं आहे? मी म्हणजे फक्त मन आहे का? फक्त बुद्धी म्हणजे मी आहे का? नाही या सर्वांच्या पलीकडे त्या 'स्व'-रूपाचा अर्थ आहे. आपल्या ऋषीमुनींनी सांगून टाकलं आहे की आपण अमृताचे पुत्र आहोत. आपली प्रार्थनाही हेच सांगते की आपण अमर असे देवांचे पुत्र आहोत. ही आपली संस्कृती आहे आणि या संस्कृतीने हे विचार आपल्याला दिले आहेत. मला याचा विशेष आनंद होतो की वर्धिनीमध्ये असे विचार तुमच्या मनामध्ये, हृदयामध्ये रुजवले जात आहेत.

तुम्ही सर्वजण विद्यार्थी आहात. इंग्रजीमध्ये त्याला स्टुडंट म्हणतात. 'Student' मधील 'S' म्हणजे तुम्ही खूप अभ्यास (study) केला पाहिजे, तुम्ही खूप कष्ट घेतले पाहिजेत. मला माहिती आहे की वर्धिनीमध्ये येणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती ही खूप काही चांगली नाही. आर्थिकदृष्ट्या कदाचित तुम्ही गरीब असाल पण चैतन्याच्या बाबतीत तुम्ही नक्कीच गरीब नाही.

तुम्ही चैतन्याच्या बाबतीत श्रीमंत आहात. आपल्या सर्वांमधील चैतन्य एकच आहे हे आपण सर्वांनी लक्षात ठेवायला हवे. पालक कदाचित तुम्हाला महागडे कपडे, महागड्या किमती वस्तू आणून देत नसतील, त्यांना ते परवडत नसेल पण एक गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे की त्यांनी आपल्याला जन्म दिला आहे, आपले पालनपोषण केले आहे आणि म्हणूनच आपल्या देशाची संस्कृती सांगते 'मातृदेवो भव, पितृ देवो भव, आचार्य देवो भव, गुरुर्देवो भव' या सर्वांच्या प्रती आपण नेहमीच ऋणी असलं पाहिजे. आई ही आपली पहिली गुरू मग वडील. त्यानंतर आचार्य, जे आपल्याला शिकवतात आणि गुरू जे आपल्याला योग्य मार्ग दाखवितात. 'अतिथी देवो भव' ही आपल्या संस्कृतीने आपल्याला शिकवलेली आणखी एक गोष्ट. सर्वांमध्ये आपण देव पहावा असे आपली संस्कृती आपल्याला शिकविते. त्यामुळे अतिथीसुद्धा देवच आहे असे समजून आपण त्याची सेवा केली पाहिजे. जो आपल्याकडे तिथी न ठरवता म्हणजे दिवस आणि वेळ न ठरविता अचानक येतो तो अतिथी. आपल्या संस्कृतीने ही जी मूल्ये आपणास दिली आहेत ती आपण टिकवली पाहिजेत. आपल्यात रुजवली पाहिजेत. हे समजणे म्हणजे 'स्व'चा अर्थ समजणे. आपण कोण आहोत हे आपल्याला समजले पाहिजे. आपण अमृताचे पुत्र आहोत. देवांचे चिरंजीव असे पुत्र आहोत. आणि आपल्यामध्ये हे सर्व गुण आहेत. पूर्वीच्या काळी ब्रह्मविद्या हीच फक्त विद्या समजली जात होती. आज 'कमर्शियल विद्येला' विद्या समजले जाते. ब्रह्मविद्या काय होती हे आपण विसरून गेलो आहोत. 'अहं ब्रह्मास्मि'. ऋषी सांगायचे की तुम्हीच ब्रह्म आहात, तुम्ही ब्रह्मदेवाचे पुत्र आहात. आपणच ब्रह्म आहोत किंवा आपण ब्रह्मदेवाची मुले आहोत हे म्हणण्यामागचा विचार आपण समजावून घेऊन तशा वृत्तीने जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणजे सर्वसमावेशक भाव आपल्या मनात जागला पाहिजे. मी सर्वांचा आहे. कोणत्या एका विशिष्ट जातीचा, धर्माचा किंवा भूप्रदेशाचा नाही, तर हे सर्व ब्रह्मांड माझे आहे, असा विचारांचा वारसा आपल्या ऋषीमुनींनी आपल्याला दिलेला आहे. तेव्हा शिक्षण असे घ्या. की ज्यातून तुमचा दृष्टिकोन विशाल होईल. केवळ कौशल्य देणारे शिक्षण नाही, तर ते शिक्षण टिकणारे, चांगले आयुष्य जगायला शिकवणारे असावे.

स्टुडंट शब्दातील 't' म्हणजे ट्रुथ 'सत्य'. आपण सर्वजण सत्यमेव जयते म्हणणारे आणि तसे जगणारे असलो पाहिजे. शेवटी सत्याचाच विजय होतो, सत्यच फक्त टिकू शकते, चमकू शकते असे आपल्याला आपल्या पूर्वजांनी सांगितले आहे. आपली प्रत्येक कृती ही सत्यावर आधारित असली पाहिजे. आपण खरं बोललं पाहिजे आणि आपल्या जगण्यातही खरेपणाच असायला हवा. 'सत्यम' या कंपनीसंबंधीचे वृत्त तुम्ही वाचले असेल, ऐकले असेल. कंपनीचे नाव 'सत्यम्' पण त्याच्या व्यवहारात मात्र 'खोटेपणा' आढळून आला. याचा परिणाम शेवटी काय झाला? ही कंपनी ज्याने सुरू केली, वाढवली, हजारो लोकांना ज्याने रोजगाराची संधी दिली, हजारो कोटी रुपयांची संपत्ती निर्माण

**मानवी जीवनाला जे जे विचार किंवा आचार उपकारक होतील**
**त्या त्या सर्वांना नीति किंवा सद्‌गुण म्हणावे.**

केली ती व्यक्ती आपल्या 'असत्य' व्यवहारांमुळे आज तुरुंगात आहे. शेवटी मूल्यं महत्त्वाची असतात, पैसा नाही हेच 'सत्यम्' व्यवहारातूनही सिद्ध झाले आहे. पैसा माणसांमधील हावरटपणाची / हव्यासाची, वृत्ती वाढवतो आणि ही वृत्तीच सत्यम्च्या प्रवर्तकाला तुरुंगात घेऊन गेली हे आपण विसरता कामा नये. म्हणून तुम्ही मुलांनीसुद्धा सदैव सत्यच बोलले पाहिजे आणि तसेच जगले पाहिजे. सत्य प्रवृत्ती आपण आपल्यात रुजवली पाहिजे आणि आयुष्यभर आपण तसे जगलो पाहिजे. अशा जगण्याने आपल्याला आपल्या खऱ्या रूपाची, 'स्व'-रूपाची ओळख होईल.

स्टुडंट शब्दातील 'u' म्हणजे 'understanding.' शिक्षण तुम्हाला तुमच्यातील समज वाढवायला मदत करेल. जगामधील अनेक प्रश्नांच्या मुळाशी समजुतीचा अभाव हेच कारण आहे असे आपल्याला आढळून येईल. वेगवेगळ्या धर्मांचे मुल्ला, प्रिस्ट, धर्मगुरु असं शिकवतात की तुम्ही 'वेगळे' आहात, इतरांपेक्षा 'वेगळे' आहात. या उलट आपल्या ऋषीमुनींनी आपल्याला शिकवलं आहे की 'एकम् सत्'. सत्य एकच आहे किंवा याच्या उलट म्हणजे एक हेच सत्य आहे. आपणा सर्वांमधील चैतन्य एक आहे हे शाश्वत सत्य आहे. ज्या क्षणी आपण म्हणतो की आम्ही सर्वजण एक आहोत त्याक्षणी आपण एकमेकांवर प्रेम करू लागतो. अशा प्रेमातून सेवाभाव जागा होतो. आई केव्हाही असं म्हणत नाही, की मी माझ्या मुलाची सेवा करीत आहे. ती म्हणते मी माझं माझ्या मुलावरचं प्रेम व्यक्त करीत आहे. ज्या क्षणी आपल्याला हे समजतं की आपण एक आहोत आणि हेच अंतिम सत्य आहे, तेव्हाच त्या 'एकत्वाच्या' भावनेतून प्रेम जन्माला येते. प्रेमातून सेवाभाव जागा होतो. प्रेम भाव जागा झाल्यावर कोणाला सेवा करण्याचे शिकवावे लागत नाही. आपल्या मुलाबाळांची तुम्हाला सेवा करावी लागेल असं आई-वडिलांना शिकवावे लागत नाही.

आपल्या ऋषीमुनींनी आपल्याला शिकवलं आहे 'वसुधैव कुटुंबकम्'. सर्व जग एक कुटुंब आहे असा भाव जागा झाला तर जगात कोठेही दहशतवादाला थारा मिळणार नाही. परंतु दुर्दैवाने धार्मिक पुढारी, मूलतत्त्ववादी पुढारी शिकवतात की तुम्ही सर्वजण भिन्न आहात, वेगळे आहात. याचा परिणाम असा होतो की तुम्ही भांडता. तुम्ही भांडायला लागलात, की त्यातून अशा संकुचित विचार देणाऱ्यांचे एक राज्य निर्माण होते. कदाचित प्रत्यक्षात असे राज्य निर्माण होत नाही पण मानसिक दृष्ट्या ते आपल्यावर राज्य करतात आणि आपल्यामध्ये फूट पाडतात. ब्रिटिशांनी हेच केले. हे सार्वत्रिक सत्य आहे, की तुम्हाला राज्य करायचे असेल, तर लोकांमध्ये तुम्ही फूट पाडा. म्हणून आपल्याला हे माहिती पाहिजे, की आपल्या सर्वांमध्ये चैतन्य एकच आहे आणि विविधतेत एकता आहे. यामुळे आपण आपल्या देशाचे जबाबदार नागरिक बनू शकू. आपला देश महान आहेच. आपण ती महानता कृतीशील करायला हवी. त्यासाठी एकता आणि समजुतदारपणा या दोन्हींची आवश्यकता आहे.

**जन्मजात जातीभेदांचे उच्चाटन म्हणजे जन्मजात म्हणून केवळ गृहीत धरलेल्या उच्चनीचतेचे उच्चाटन.**

स्टुडंट शब्दातील 'd' म्हणजे discipline. आत्ता सांगितलेल्या सर्व गोष्टी मिळवायच्या तर शिस्त हवी. तुमच्या सर्वांमध्ये अशी शिस्त आहे. शिस्तीमुळे यश मिळते. आपल्या देशाला ज्या अनेक गोष्टी भोगाव्या लागल्या त्याचे एकमेव कारण शिस्तीचा अभाव हेच आहे. अगदी अजूनही आपण शिस्तीच्या अभावाचे परिणाम भोगतो आहोत. आपल्याकडे शिस्त असती, तर आज आपण आहोत त्यापेक्षा कितीतरी अधिक प्रभावशाली झालो असतो. अगदी जगातील एक क्रमांकाचे राष्ट्र म्हणून जगात मिरवू शकलो असतो, पण केवळ शिस्तीच्या अभावामुळे आपण मागे पडलो आहोत. मला आनंद आहे की तुम्ही सर्वजणं शिस्तशीर आहात. तुम्ही जे काही मिळवलं आहेत ते तुमच्यातील शिस्तीमुळेच तुम्हाला मिळालं आहे आणि ही मौल्यवान गोष्ट आपण आणखी पुढे नेली पाहिजे.

स्टुडंट शब्दातील 'n' म्हणजे new. प्रत्येक क्षण नवीन असतो. प्रत्येक नव्या क्षणी आपण नाविन्याच्या शोधात राहायला हवे. काहीतरी नवं, काहीतरी अधिक चांगलं, अधिक महान. मी तुमच्या खेळांमध्ये खूप नावीन्य आणि कल्पकता पाहिली आहे. आणि त्यासाठी तुमच्या शिक्षकांचे, प्रशिक्षकांचे आणि ज्यांनी असे नाविन्यपूर्ण खेळ शोधून काढले, त्यामध्ये आणखी नव्या कल्पनांची भर घातली, त्या सर्वांचे अभिनंदन करतो. देशाला नेमकी याच गोष्टीची गरज आहे. तुम्हाला जर मोठा नेता व्हायचं असेल, तुम्हाला आपल्या आयुष्यात काही भरीव मिळवायचे असेल तर तुम्ही कल्पक असायला हवं. तुम्ही सतत नाविन्याच्या शोधात असायला हवं. एखादी गोष्ट नव्या पद्धतीने करण्याचा तुम्ही ध्यास घ्यायला हवा. असे तुम्ही कराल तेव्हा तुम्ही आणि तुमचे कुटुंब इतरांपेक्षा चांगल्या स्थितीत जाल आणि परिणामत: देशही चांगल्या स्थितीत जाईल. म्हणून तुम्ही सतत पुढे जात राहिले पाहिजे. अधिक चांगले करीत राहिले पाहिजे. मी काही नवे करू शकतो हा विश्वास तुमच्या मनात जागला पाहिजे.

स्टुडंट शब्दातील 't' म्हणजे time. भगवान श्रीकृष्णांनी सांगितले आहे, की 'मी काळाच्या रूपानेच अस्तित्वात आहे'. भारतीय संस्कृतीमध्ये काळाला देवाइतके स्थान दिलेले आहे. आपण 'देव' वाया जाऊ देतो का? म्हणून आपण वेळही वाया जाऊ देता कामा नये. वेळ पैशापेक्षाही मौल्यवान आहे. पैसा हरवला तर पुन्हा मिळवता येतो, पण वाया गेलेला वेळ पुन्हा मिळवता येत नाही. म्हणून वेळेला सर्वोच्च प्राधान्याचे स्थान दिलेले आहे. असं म्हणतात की जे वेळेचा सन्मान करतात, त्यांचा सन्मान होतो. जर तुम्ही वेळेचा मान राखलात, जर वेळेचा वापर योग्य केलात, अभ्यास चांगला केलात, खूप काम केलेत, तर समाजही आपला मान राखतो. तुम्ही वेळेचा मान राखा, वेळ तुमचा मान राखेल. आपण नेहमीच आणि चांगल्या कारणांसाठी वेळेचा १००% उपयोग केला पाहिजे. कधीही वेळ वाया जाऊ देऊ नका. तुम्ही असे केलेत, तर तुम्ही नक्कीच आयुष्यात चमकाल. माझ्या मनातील हे विचार मला तुमच्यासमोर व्यक्त करायचे होते.

**कोणतीही जात दुसरीहून मूलत:च श्रेष्ठ वा कनिष्ठ आहे, ही गोष्ट केवळ पोथीत तसे सांगितले आहे म्हणून गृहीत घेता कामा नये.**

माझ्या भाषणाचा समारोप मी काही महत्त्वपूर्ण वचनांनी करणार आहे-

| | |
|---|---|
| आयुष्य हे एक आव्हान आहे, त्याला भिडा | Life is a challenge, meet it. |
| आयुष्य हा एक संघर्ष आहे, त्याचा सामना करा | Life is a struggle, fight it. |
| आयुष्य हे एक दु:ख आहे, त्यावर मात करा. | Life is a sorrow, overcome it. |
| आयुष्य ही एक देणगी आहे, त्याचा स्वीकार करा. | Life is a gift, accept it. |
| आयुष्य हा एक योग आहे, त्याचा उपयोग करा. | Life is a chance, utilize it. |
| आयुष्य हा एक प्रवास आहे, तो पूर्ण करा. | Life is a journey, complete it. |
| आयुष्य हे एक कर्तव्य आहे, ते बजावा. | Life is a duty, perform it. |
| आयुष्य ही एक संधी आहे, ती घ्या. | Life is an opportunity, take it. |
| आयुष्य ही एक समस्या आहे, ती सोडवा. | Life is a problem, solve it. |
| आयुष्य हे एक लक्ष्य आहे, ते जिंका. | Life is a goal, achieve it. |

*नव्या वर्षाच्या तुम्हाला, तुमच्या कुटुंबियांना हार्दिक शुभेच्छा.*

*हे वर्ष तुम्हा सर्वांना अतिशय आनंदाचे, भरभराटीचे आणि यशस्वितेचे जावो. धन्यवाद.*

*With Best Compliments From*

**M/s. Chemtech Specialities**
**&**
**M/s. Chemtech Laboratories**

**Testing-Laboratory for Oils, Fuels, Rubber, Plastics & various other chemicals**

35, Vivek Housing Society, Padmavati, Pune 411009.
Phone - 2436 6994, Telefax - 2436 6996
Email - chemtechlabs@yahoo.com

आघातक शक्ती ही अत्याचार, पण प्रत्याघातक शक्ति ही सदाचार होय.

# संघटनांचा मूलमंत्र

*(रा.स्व. संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. श्रीपती शास्त्री हे वर्षप्रतिपदेच्या दिवशी झालेल्या वर्षारंभ उपासनेच्या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी त्यांनी व्यक्त केलेले विचार)*

वर्षप्रतिपदेच्या या मंगलमय दिवशी काही संकल्प करावे असे अपेक्षितही असते आणि अनेकजण संकल्प करतातही. निसर्गानेच निर्माण केलेली विविध प्रकारची प्रतिकूलता स्वीकारून जगणारे अनेक देश जगाच्या पाठीवर आहेत. सहा महिने सूर्यदर्शनच होत नाही असा प्रदेश आहे, महिनोंमहिने एकच ऋतु असणारे देश आहेत, भिंत बांधून समुद्राचे पाणी अडवून, रहाणारे लोक फुलांची सुंदर शेती करतात आणि त्याच्या निर्यातीवर जगतात असाही देश आहे, आणि गोड्या पाण्याचा साठा जवळ जवळ नाहीच असा देशही खूप मोठी कृषी निर्यात करतो. अशी कितीतरी उदाहरणे आहेत. या पार्श्वभूमीवर आपल्या देशाचा विचार केला तर निसर्गाच्या प्रेमाचा आविष्कार आपल्या देशात जागोजाग पहायला मिळतो. येथील भूमी नुसती विस्तृत नाही तर सुफला आहे, सस्यशामल आहे, ज्या मातीतून सोने उगवते असे वर्णन करावे अशी समृद्ध भूमी आहे. 'रत्नगर्भा वसुंधरा' असं भारतभूमीचं वर्णन आहे. इंग्रजांच्या राजवटीत 'Economic Report of India' या नावाने प्रसिद्ध केलेल्या अहवालात असं म्हटलं आहे की 'India is the bread base of whole of Asia' इंग्रज हे काही भारताचे दोस्त नव्हते हे लक्षात घेतलं तर या अहवालाचे महत्त्व अधिक लक्षात येईल. या अहवालात असं म्हटल आहे की कोणतंही असं खनिज नाही की जे भारताच्या भूमीत मिळत नाही. बाराही महिने वाहणाऱ्या हजारो नद्या येथे आहेत. हे वर्णन वाचल्यावर लक्षात येतं की आदर्श जीवन जगता येईल अशी रचना देवाने भारतभूमी निर्माण करताना केली आहे. अशा या पवित्र संपन्न भूमीमध्ये अत्यंत बुद्धिमान पराक्रमी लोक निर्माण झाले. सामान्य जनजीवनही चांगले रहावे यासाठी ऋषीपरंपरा येथे निर्माण झाली. चोवीस तीर्थंकर येथे होऊन गेले. असा सुंदर, अभिमान वाटावा असा देश देवाने निर्माण केला.

असं असतानाही आपल्या देशाची स्थिती पाहिल्यावर असं वाटतं की देवानं निर्माण केलं आणि (भारतीय) माणसानं ते मातीत मिळवलं. अनेक विसंगतीने भरलेल्या घटना आपल्या देशात पाहायला, अनुभवायला मिळतात. या पार्श्वभूमीवर आम्ही काही ठोस संकल्प करायला हवा. देशाचे हे चित्र बदलण्यासाठी मी काय करू शकतो यासंबंधी विचार प्रत्येकाच्या मनात असायला हवा. चांगला देश कोणता? असा प्रश्न मनात आला की आपल्या देशाची नकळत अन्य देशांशी तुलना मनामध्ये येऊन जाते. जगातील भ्रष्ट देशांच्या यादीत आमच्या देशाचा क्रमांक १७ वा आहे. ज्या ब्रिटनने भारतावर १५० वर्षे राज्य केले, तसेच जगातील अनेक देशांवर राज्य केले तो देश मोठा कोणामुळे झाला? चर्चिल, शेक्सपिअर यांच्यासारखी दिग्गज लोकं होऊन गेले म्हणून नाही तर त्या देशातील सर्वसामान्य माणसाचा (Tom-Dick & Harry) व्यवहार हा आदर्श आहे म्हणून. राष्ट्रघाताची एकही गोष्ट तेथील सामान्य माणूस करीत नाही म्हणून तो देश मोठा होऊ शकला. या राष्ट्रहिताच्या कसोटीवर भारतीय सामान्य माणूस सुधारला पाहिजे हा आपला संकल्प हवा. त्यासाठी त्याच्यासमोर तशी उदाहरणे असायला हवीत. सामान्य माणसाचा व्यवहार हा देशहिताला अनुकूल असायला

**जे आज मनुष्यहितसाधक, ते आचरावे.**

हवा. ही गोष्ट भाषणाने घडणार नाही तर तसे जीवन जगावे लागेल. तशी उदाहरणे सामान्य माणसाच्या समोर असायला हवीत यासाठी मनामध्ये काही संकल्प करण्याचा विचार येतो का हा प्रश्न आहे.

मी संघाचा कार्यकर्ता आहे. श्री. गुरुजींच्या देहांतापूर्वी चार दिवस प्रमुख कार्यकर्त्यांसमोर त्यांनी तीन गोष्टी ठेवल्या. देशसमर्पित आयुष्याच्या साऱ्या अनुभवाच्या गोष्टी म्हणून त्या महत्त्वाच्या आहेत.

**● भारत हे एक अखंड, अभंग आणि अविच्छिन्न राष्ट्र आहे.**

भारत हा एक देश आहे व ते हिंदू राष्ट्र आहे. (भारत म्हणजे अनेक राष्ट्रांचा समूह नाही.) स्ट्रॅके या लेखकाने भारतासंबंधी लिहिताना असं म्हटलं आहे की भारत नावाचा देश कधीही नव्हता. हा अनेक राष्ट्रांचा समूह आहे. त्यांच्यामध्ये कोणतीही एकात्मता नाही. भिन्न भिन्न पद्धती येथे रूढ आहेत. भारत हे एक अखंड, अभंग, अविच्छिन्न राष्ट्र आहे हा पहिला सिद्धांत. याच्याशी कोणतीही तडजोड नाही. या बाबतीत सर्व जगाने एक होऊन आव्हान दिलं तरी आम्ही म्हणू की होय भारत हे एक राष्ट्र आहे, हे हिंदूराष्ट्र आहे.

**● भेद उत्पन्न होणार नाहीत आणि फूट पडणार नाही याची काळजी घ्यायला हवी.**

संघ हे सर्वांत मोठे स्वयंसेवी संघटन आहे. त्याच्यामध्ये भेद उत्पन्न करण्याचे नेहमी प्रयत्न होणार. कोणत्याही प्रलोभनाला बळी पडून किंवा कोणत्याही भेदनीतीला बळी पडून संघटनेमध्ये फूट पडणार नाही याची प्रत्येकाने काळजी घेतली पाहिजे.

**● संस्था / संघटना सांभाळणारा खांदा मजबूत असायला हवा.**

संघ स्थापनेनंतर. अनेक संस्था सुरू झाल्या व आजही नव्या नव्या संस्था सुरू होत आहेत. या संस्था सांभाळण्याचा जो खांदा आहे तो या सर्वांना पेलू शकणारा असला पाहिजे, भक्कम पाहिजे. संघाच्या बाबतीत हा खांदा म्हणजे संघशाखा. खांदा दुबळा झाला, हडकुळा झाला तर त्याला भार पेलणार नाही त्यामुळे मूळ शाखाकाम ताकतीचे झाले पाहिजे याकडे सर्वांचे लक्ष असायला हवे.

श्री. गुरुजींनी संघाच्या प्रमुख कार्यकर्त्यांसमोर या गोष्टी मांडल्या असल्या तरी त्या केवळ संघाला लागू आहेत असे नाही तर कोणतेही सामाजिक काम टिकायचे असेल, प्रभावी व्हायचे असेल तर वरील विचार एका अर्थाने सर्वच सामाजिक संस्थांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. या सर्व गोष्टीचा आपणही विचार करावा.

❖ ❖ ❖

*पृष्ठदाता सूची*

* **श्रीमती गीता तांबे,** पंचरत्न सोसायटी, १३, शीलाविहार कॉलनी, कोथरूड, पुणे ३८ (१ पान)
* **श्रीमती नलिनी आपटे :** रत्नदीप बिल्डिंग, १८०, नवी पेठ, पुणे ३०.(१ पान)
* **ॲड. अतुल के. दीक्षित :** ओम्, मेघस्पर्श, बी-१०६, स.नं. ५७३, बिबवेवाडी, पुणे ३७ (१० पाने)
* **दिलीप जी. काळे अँड असोसिएटस् :**१२२६-बी, शुक्रवार पेठ, सुभाषनगर गल्ली क्र.४, पुणे २ (२ पाने)
* **श्री. विनायक आंबेकर :** बी-१०१, भारतभवन, १३६०, शुक्रवार पेठ, पुणे २ (१ पान)
* **श्री. निरंजन फडणीस :** १०, कण्वश्री अपार्टमेंटस्, माणिकबाग, पुणे ५१ (२ पाने)
* **अनामिक :** (१ पान)

**जे अनुभवांनी टाकाऊ, अडाणी, बुद्धिशून्य ठरते, ते साफ सोडावे.**

# आपल्यातील दडलेला राजहंस शोधा

*(१३ मे २००९ या दिवशी वर्धिनीच्या कामाला ३० वर्षे पूर्ण झाली. त्रिदशकपूर्तीच्या निमित्ताने एका युवक-युवती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. पुणे विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. त्यांचे भाषण त्यांच्याच शब्दात...)*



डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते ओम्कार पूजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन द्वारा ३० वर्षांच्या वर्धिनीच्या कामाचा धावता आढावा उपस्थितांसमोर ठेवण्यात आला. श्री. सुमित डोळे, श्री. सतीश माळी, डॉ. सौ. रोहिणी दिघे आणि प्रा. सौ. छाया सकटे यांनी व्यावसायिक गटातील युवक युवतींच्या वतीने प्रातिनिधिक मनोगते व्यक्त केली. या नंतर डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली.

‘‘सर्वप्रथम ‘स्व’-रूपवर्धिनीची तीन दशकांची वाटचाल, जी आत्ता सर्वांसमोर सादर करण्यात आली, त्या वाटचालीबद्दल मी सर्वांना शुभेच्छा देतो. आर्थिकदृष्टया व सामाजिकदृष्ट्या उपेक्षित अशा विद्यार्थ्यांना घडविण्यात ‘स्व’-रूपवर्धिनीचा खूप मोठा वाटा आहे. ‘स्व’-रूपवर्धिनीचे हे ‘मॉडेल’ सर्व भारतात पसरावे या डॉ. रघुनाथ माशेलकरांच्या अभिप्रायाशी मी पूर्णपणाने सहमत आहे.

परिस्थितीशी झगडणाऱ्या, धडपडणाऱ्या तुम्हा सर्वांमध्ये मी मला स्वत:ला पहातो आहे. परिस्थिती आपल्या हातात नसते परंतु विपरित परिस्थितीवर मात करून पुढे जाणे मात्र आपल्या हातात असते. मुंबईमधील झोपडपट्टीत मी जन्मलो. सभोवताली सतत मारामाऱ्या चालायच्या. या वातावरणातच माझे सर्व बालपण गेले. प्रत्येक वातावरण माणसाला काहीतरी शिकवत असते. कोणाच्याही मदतीची वाट न पाहता स्वत:च्या पायावर उभं रहायला या वातावरणात मी शिकलो. त्या वयात मीही भरपूर मारामाऱ्या केल्या. अशा वातावरणात तुम्हाला टिकायचं असेल तर मारामाऱ्या कराव्या लागतातच. त्यामुळेच की काय पण माझी पाहिली (ambition) महत्त्वाकांक्षा झोपडपट्टीमधील ‘दादा’ होण्याची होती. तिथे जंगलचा कायदा होता. ‘survival of the fittest’ हा तिथला नियम होता. त्या नियमाला आत्मसात करीतच मी मला माझ्या स्वत:च्या पायावर उभे रहायला शिकलो.

मी शिकत होतो, मोठा होत होतो. हळूहळू विचार करायला लागलो. मला असं वाटायला लागलं की हे मारामाऱ्या वगैरे करणं हे काही ठीक नाही. आपल्याला चांगल जगता आले पाहिजे. अगदी हिंदी सिनेमातील संवादात सांगायच तर ‘इज्जतसे रहेना मंगता है’ अस वाटू लागलं.. दोन

**सत्पुरुषांचे इतिहास हे सद्गुणांचे ठसे होत.**

वेळचे जेवण मिळावे अशा माफक अपेक्षा असलेले घरचे, आजुबाजूचे वातावरण होते म्हणून माझी दुसरी महत्त्वाकांक्षा होती 'प्युन' होण्याची.

ज्या आर्थिक / सामाजिक वातावरणात मी वाढत होतो तेथे वेगवेगळे न्यूनगंड (complex) निर्माण होत असतात. त्यातून बाहेर पडून स्वत:चे 'स्व'त्व ओळखता यावे लागते. हे सर्वांनाच जमते असे नाही. कित्येक लोक तर असे वेगवेगळे न्यूनगंड 'complexes' घेऊनच मरतात. 'स्व'-रूपवर्धिनी आपापल्या पद्धतीने आपल्या सर्वांना आपल्यामधील 'स्व'त्व ओळखायला मदत करते आहे. ज्या प्रमाणात आपण आपल्याला स्वत:ला शोधत जातो, त्या प्रमाणात आपण आपल्याला सापडत जातो. आपण आपल्याला ज्या प्रमाणात शोधू शकतो त्या प्रमाणात आपल्याला आयुष्य जगता येते. इथे एक महत्त्वाची गोष्ट आपण लक्षात ठेवावी की **'Unless you go too far, you will never know how far you can go'**

**कोणीही टाकावू नसतो. प्रत्येकात एक राजहंस दडलेला असतो. या राजहंसाचा शोध घेणे हे शिक्षणाचं काम आहे, हे शिक्षकाचं काम आहे.** आज 'स्व'-रूपवर्धिनी तुमच्यामधील राजहंसाचा शोध घेण्याचं काम करीत आहे. प्रत्येकात काही ना काही क्षमता आहेतच. विश्वविख्यात खेळाडू सचिन तेंडूलकर हा शाळेमध्ये कधी हुशार विद्यार्थ्यात गणला जात नव्हता, किंबहुना तो शिक्षणाच्या परिभाषेत 'ढ' विद्यार्थी होता. पण जेव्हा त्याच्यामधील राजहंस त्याला सापडला तेव्हा त्याने विश्वविक्रम केले कारण त्याच्यामधील राजहंस हा क्रीडा विषयातील होता. एखाद्यामध्ये क्रीडा विषयातील राजहंस असेल एखाद्याचा कला क्षेत्रातील असेल. आपल्या-मधील राजहंसाचा शोध लागणं महत्त्वाचं.

मी म्युनिसिपालिटीच्या शाळेत शिकलो. मराठी माध्यमातूनच शिकलो. पुढे मी जागतिक बँकेमध्ये अनेक वर्षे अधिकारी म्हणून काम केलं. पण मी इंग्रजीत कुठेही कमी पडलो नाही. तुम्ही इंग्रजी माध्यमातून शिकलात तर तुम्हाला आपोआप इंग्रजी बोलता येतं आणि तुम्ही मराठी माध्यमातून शिकलात तर असं इंग्रजी बोलता येत नाही असं अजिबात नाही. शाळेत असताना तर मी वर्गात फारसा बोलायचो नाही कारण आपलं मराठी फार अशुद्ध आहे असा माझ्या मनात न्यूनगंड होता. घरी माझे अशिक्षित आई-वडील बोलायचे तेच मराठी मला बोलता यायचं... मला इतरांसारखं मराठी बोलता यायचच नाही. आता मी हे सांगू शकतो की भाषा शुद्ध किंवा अशुद्ध हे it is matter of convenience. भाषेच्या शुद्धाशुद्धतेला सुद्धा कधीकधी जातियतेची एक किनार असते असं मला वाटतं.

माझा जसा पहिला नंबर यायला लागला तसं माझा बाप मला विचारायचा 'तू कोण होणार?' या प्रश्नाला माझे उत्तर गुळमुळीत असायचे. एकदा माझ्या भावाने मला हाच प्रश्न विचारला आणि मी म्हणालो 'मी लेखक होणार'. माझे उत्तर ऐकून माझा भाऊ किंचाळला आणि म्हणाला याला जिंदगीत उपाशी मरावं लागणार. तो असं का म्हणाला ते मला माहिती नाही. कदाचित त्यावेळी लेखकांची आर्थिक स्थिती चांगली नसावी. मी लेखक होणार हे माझ्या वडिलांना कळाल्यावर ते

म्हणाले प्रत्येक जण तुला काय काय हो हे सांगेल. कोणी म्हणेल डॉक्टर हो तर कोणी म्हणेल बॅरिस्टर हो पण तू कोणाचं ऐकू नकोस. तुला जे करायचं आहे तेच तू कर. पण एक गोष्ट लक्षात ठेव की जे करशील त्यात 'टाप' (top) ला जा. माझ्या तथाकथित 'अडाणी' वडिलांनी मला हे 'Search for Excellence' चे सूत्र शिकवले हे मला मुद्दाम सांगावेसे वाटते. पुढे मी अमेरिकेत गेलो. शिकलो. पी.एचडी मिळविली. नंतर भारतात आलो तरी संशोधनाचे काम चालू होतेच. माझी अडाणी आई मला म्हणाली की एवढा 'डाकतर' झालास, आता एवढं कशाला काम करतोस? त्या माझ्या आईला माझे वडील पी.एचडी म्हणजे काय हे समजावून सांगत होते. त्यांनी ज्या सोप्या पद्धतीनं आईला समजावून सांगितल आणि शिक्षणाकडे पाहण्याची जी दृष्टी त्यांनी दिली ती विलक्षण होती. कोणा शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञांकडूनही मी असं आजवर कधी ऐकल नव्हतं. माझे वडील आईला म्हणाले की ही पी.एचडी. ची पदवी असते ना ती ड्रायव्हिंगच्या लायसन्स सारखी असते. एकदा लायसन्स मिळालं तरी गाडी चालवावी लागतेच ना. आपल्याकडे अनेक जण शिक्षणाकडे 'साधन' म्हणून नाही तर 'साध्य' म्हणून पहातात आणि म्हणून पदवी मिळाल्यावर अनेकांना असं वाटते की आपलं शिक्षण संपलं. वास्तविक अशा पदव्या मिळाल्यानंतर खरं शिक्षण सुरू होतं. शाळेच्या जगात अजिबात न वावरलेल्या माझ्या बापाला जगाच्या शाळेत मिळालेली ही दृष्टी विलक्षण होती हे मला इथे आवर्जून सांगावेसे वाटते.

अनेकजण असा प्रश्न विचारतात की तुमच्या यशाच रहस्य काय? यशाचं असं रहस्य काही नसतं किंवा त्याचा फॉर्म्युलाही नसतो पण काही ठोकताळे असतात. काही गोष्टी आवर्जून करायच्या असतात तर काही गोष्टी कटाक्षाने टाळायच्या असतात. त्याबाबतीत माझी एक अष्टसूत्री आहे ती मला इथे उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना आवर्जून सांगायची आहे... त्यावर विचार करून त्या आत्मसात करण्याचा प्रयत्न तुम्ही करावा.

१. तुमचं निश्चित असं ध्येय असलं पाहिजे आणि ते ध्येय उच्चच असलं पाहिजे.

२. जे ध्येय गाठायचं तुम्ही ठरवलं आहे त्याच्या परिपूर्तीसाठी तुमच्याकडे एक झपाटलेपणं असलं पाहिजे. एखाद्या ठरवलेल्या गोष्टीच्या मागे वेड लागल्यासारखं लागणं याच्यासारखी दुसरी शहाणपणाची गोष्ट नाही. ध्येय ही काही गाजराची पुंगी नाही. वाजली तर वाजली नाही तर मोडून खाल्ली.

३. ध्येयपूर्तीसाठी दूर्दम्य इच्छाशक्ती असायला हवी. आपणचं ठरवलेलं ध्येय गाठण्यासाठी कठोर परिश्रम करण्याची तयारी हवी. कठोर परिश्रमाला पूर्वीच्या काळात पर्याय नव्हता, आजच्या काळात नाही आणि उद्याही असण्याची सुतराम शक्यता नाही. थॉमस एडिसन असं म्हणाले होते 'Even for a genius person, it is 1% inspiration and 99% perspiration' अत्यंत प्रतिभाशाली व्यक्तीच्या यशामध्ये प्रतिभेचा भाग एखादा टक्का असतो आणि उरलेल्या ९९ टक्के भाग हा त्याने गाळलेल्या घामाचा असतो; परिश्रमाचा असतो. त्यामुळे कठोर परिश्रमाला पर्याय नाही.

४. चौथं सूत्र 'Time Management'चं

**कार्य करण्यास प्रारंभ केला की पुढचा मार्ग हळूहळू दिसू लागतो.**

आहे. आजच्या युवा पिढीमध्ये एक शब्द प्रचलित आहे. तो आहे 'T.P.' म्हणजे टाईमपास. कुठल्याही भाषेतल्या कुठल्याही शब्दाचा वाटत नाही इतका तिटकारा मला या शब्दाचा येतो. Time is not meant for passing. आणि ज्यांना हे कळत नाही अशा व्यक्ती आयुष्याच्या परीक्षेत नापासच होतात हे सांगण्यासाठी कुठल्याही भविष्यवेत्त्याची गरज नाही. त्यामुळे वेळेचं नियोजन आपण करायला हवं. शक्य तितक्या लवकर वेळेचं नियोजन करायला शिकायला हवं. शाळा-महाविद्यालयात वेळा-पत्रकामुळे आपल्याला नियोजनाचा अर्थ कळलेला असतो. पण हे वेळापत्रक म्हणजे नियोजन नाही. आपल्या चोवीस तासांचं आपल्याला नियोजन करता यायला हवं. तुमचे अग्रक्रम तुम्ही ठरवून घ्या आणि त्याप्रमाणे तुमच्या वेळेचं नियोजन करायला शिका.

५. कधीही शॉर्टकट च्या मागे लागू नका. शॉर्टकट हा नेहमीच लाँग कट ठरतो. तुम्हाला चांगल इंग्रजी बोलायला शिकायचं असेल तर त्यासाठी आवश्यक ते सर्व परिश्रम करा. शॉर्टकटनी शिकायचा प्रयत्न केलात तर तुमचं पितळ उघडं पडल्याशिवाय रहाणार नाही.

६. जे जे उत्तम आहे ते ते मिळवण्याचा प्रयत्न करा, त्याचा ध्यास धरा. तुम्ही ज्या क्षेत्रात असाल त्या क्षेत्रातील उत्तमातील उत्तम शिक्षण / प्रशिक्षण मिळवण्याचा तुम्ही प्रयत्न करा. तिथे कॉम्प्रमाईज करायचा नाही. जिथे मिळेल तिथे जाऊन ते शिक्षण मिळवायचं आणि त्यासाठी कुठल्याही प्रकारची तडजोड करायची नाही.

७. हे सूत्र आहे आई-वडिलांसंबंधी. तरुण वयामध्ये मुलांना सारखं वाटत असतं की आपले आई-वडील फार कटकट करतात, पण हे कधीही विसरू नका की आईवडील हे नेहमी तुमच्याच बाजूचे असतात. They are part of your team. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचं एक फार छान वाक्य आहे. ते म्हणतात आपल्या आईवडिलांच जे स्थान असतं ते आपल्या घरातील छतासारखं असतं. ते जेव्हा असतं तेव्हा त्याचं 'असणं' आपण गृहीत धरलेलं असतं. पण जेव्हा ते दूर होतं तेव्हा आपल्याला समजतं की जगामध्ये आपण किती उघड्यावर पडलो आहोत. इतकी वेळ येईपर्यंत थांबू नका. तुमच्या आईवडिलांचे स्थान हे तुम्ही वेळीच ओळखा. ते सांगतात ते तुम्ही शांतपणे ऐकून घ्या आणि तुमच्या सत्सतविवेक बुद्धिला स्मरून निर्णय करायला शिका. पालकांनाही मला सांगावसं वाटतं की खूप मोठ्या प्रमाणात पालक आपल्या अपुऱ्या राहिलेल्या इच्छा आकांक्षा आपल्या मुलांवर लादण्याचा प्रयत्न करतात. त्यांनी ते करू नये. तुमच्या मुलातही एक राजहंस दडलेला आहे तो राजहंस त्याला सापडावा यासाठी काय मदत करता येईल याचा विचार पालकांनी करावा.

८. आठवे सूत्र आहे ते सामाजिकतेसंबंधी म्हणजे थोडक्यात ज्यासाठी 'स्व'-रूपवर्धिनी काम करीत आहे त्यासंबंधी. दुर्देवाने मी असं पहातो की आजच्या तरूण मुला-मुलींमध्ये, विशेषत: आय.टी.क्षेत्रातील मुलामुलींमध्ये; त्यांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रातील लेटेस्ट काय आहे ते माहिती असतं पण पायाखाली काय जळतं आहे हे त्यांना माहिती असतं नाही. आपल्या कुटुंबात काय चाललं आहे, घरात काय समस्या आहेत हे त्यांना माहिती

**ऐतिहासिक सत्पुरुषांचे उत्सव तरुणांना सच्छिक्षण देणारे ते शिक्षक आहेत व सत्पुरुषांच्या कृत्यांचे ते जिवंत इतिहास आहेत, म्हणून करावेत.**

नसतं. ज्या समाजात ते रहातात त्या समाजाच्या काय समस्या आहेत ह्याची त्यांना जाणीव नसते. किंबहुना आपण समाजाचं काही देण लागतो हेच ते विसरून गेलेले असतात. आपण जगत असताना अनेक गोष्टी आपण समाजाकडून घेत असतो किंबहुना काहीवेळा त्या ओरबाडून घेत असतो. आपण सुस्थितीत पोहोचल्यावर त्यातील काही गोष्टी तरी, अंशत: का होईना त्या समाजाला परत द्यायच्या आहेत याचे भान देण्याचा प्रयत्न 'स्व'-रूपवर्धिनी करीत आहे पण समाजात मात्र त्याचा फार मोठ्या प्रमाणावर विसर पडताना दिसतो आहे. असं भान हरवलेल्या मुला-मुलींना मी एक वेगळं नाव दिलं आहे. मी त्यांना 'High I.Q. Morons' 'उच्च बुद्ध्यांक असलेले निर्बुद्ध' असचं म्हणतो. तुम्ही कितीही बुद्धिमान असलात आणि तुमची बुद्धी तुम्ही फक्त तुमच्यापुरतीच ठेवलीत आणि समाजाला काही देण्याची, अंशत: परत करण्याची वृत्ती आणि तयारी तुमच्यामध्ये नसेल तर तुमच्या आयुष्याला काहीही अर्थ नाही. तो अर्थ प्राप्त करून देण्याचा प्रयत्न 'स्व'-रूपवर्धिनी करते आहे म्हणून मला त्याचं विशेष कौतूक वाटतं.

या आठ मुद्यांशिवाय आणखी एक मुद्दा इथे मांडावा असं वाटतं आणि तो मुद्दा आहे मानसिकतेचा. 'You are what you are'तुमचा जो ॲटिट्युड आहे, तुमची जी मानसिकता आहे त्यातून तूम्ही काय होणार आहात ते ठरतं 'Attitude is the most important thing in life' आपण शाळा-महाविद्यालयांमधे असताना, समाजात वावरताना, घरामध्ये असताना अनेक गोष्टी आपल्या डोक्यामध्ये शिरत असतात. एक स्थिती आयुष्यात अशी येते जेव्हा हे सर्व संस्कार पुन: एकदा स्वत:शीच तपासून पहावे लागतात. यातील काही संस्कार हे तुम्ही फार लहान असताना किंवा काळ वेगळा असताना योग्य असतील पण सध्याच्या काळात योग्य नसतील आणि काही वेगळ्या संस्कारांची भविष्यामध्ये गरज असेल तेव्हा हे सगळे संस्कार पुन: एकदा आपण स्वत:शी तपासून पाहिले पाहिजेत. त्याची काही उदाहरणे देतो. त्यातील काही उदाहरणे तुम्हाला आवडतील, काही आवडणार नाहीत.

उदा: ❃ 'साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी' साध्या रहाणीचा आणि उच्च विचारसरणीचा काहीही संबंध नाही. साधी रहाणी असली की आपोआप विचारसरणी उच्च होते असं नाही. तसंच विचारसरणी उच्च रहाण्यासाठी रहाणी साधी ठेवावी लागते असेही नाही. या दोन्ही गोष्टी आपापल्या जागी बरोबर आहेत.

❃ लहान वयातील मुलींची एक फार आवडती कविता आहे 'लहान माझी बाहुली, मोठी तिची सावली' या कवितेत शेवटी म्हटलं आहे की, 'आडाचं पाणी काढायला गेली, धपकन पडली त्यात आणि पडले दोन दात' तात्पर्य काय कुणी हे उपद्व्याप सांगितले. गप्प बसावं. असा संदेश जाणं बरोबर आहे का?

❃ 'ये रे ये रे पावसा, तुला देतो पैसा' या कवितेत पावसाला बोलवायचं आणि तो आला की त्याला खोटा पैसा द्यायचा. या गोष्टीतून कारकून तयार होतात, उद्योजक तयार होत नाहीत. इथे प्रश्न येतो तो मानसिकतेचा आणि अशा मानसिकतेतूनच आपण काय होणार हे ठरतं.

आपल्याकडच्या काही म्हणी पहा-

**भरतभूमीला मातृस्थानी मानण्याच्या अधिकाराचा अभिषेक एकट्या आम्हा भारतीयांवरच जगच्चालकाने केला आहे.**

✻ 'ठेविले अनंते तैसेचि रहावे, चित्ती असू द्यावे समाधान' हे समाधान असू शकतं का? तुम्हाला समाधान हवं असेल तर ते परिवर्तनाचं हवं.

✻ 'अंथरूण पाहून पाय पसरावेत' तुम्ही जर अंथरूण पाहून पाय पसरणार असाल तर इतर लोक त्यांचे पाय तुमच्या अंथरूणात पसरवल्याशिवाय रहाणार नाहीत. म्हणून विचार करायचाच तर अंथरूण मोठे करण्याचा करायला हवा. जे लोक पूर्वी गिरगावात रहात होते ते पुढे दादरला, दादरहून ठाणे, ठाण्याहून डोंबिवली असं करत करत बदलापूर पर्यंत गेले आहेत. असं का घडलं? कारण आम्ही अंथरूण मोठं करायचा विचार करीत नाही. दात कोरून पोट भरता येत नाही हे सांगायला पाहिजे.

✻ 'लुळ्यापांगळ्या श्रीमंतीपेक्षा धट्टीकट्टी गरीबी बरी' गरीब रहाण्यात कसलही भूषण नाही. ही गरीबी मी अनुभवली आहे, तुम्ही अनुभवली आहे. असतं का या गरीबीत काही भूषण? श्रीमंतीसुद्धा आपोआप लुळीपांगळी होत नाही. 'तेलगी'च्या मार्गाने गेलात तर ती लुळीपांगळी होईल, अन्यथा नाही. त्यामुळे स्वपरिश्रमानं श्रीमंती मिळवण्यामध्ये आणि त्याचा उपभोग तुमच्या आयुष्यात करण्यामध्ये काहीही गैर नाही.

या सर्व गोष्टीतून एकच गोष्ट मला सांगायची आहे की दारिद्र्यापेक्षा भयंकर अशी एकच गोष्ट आहे ती म्हणजे 'मनोदारिद्र्य'. जो पर्यंत तुम्ही मनोदारिद्र्यातून बाहेर येत नाही तोपर्यंत तुम्ही तुमचं दारिद्र्य दूर करू शकत नाही. त्यामुळे दारिद्र्य दूर करण्याचा सर्वात योग्य मार्ग आहे तो मानसिकता बदलण्याचा आणि ते बदलत असताना स्वतःला शोधण्याचा. आणि नेमकं तेच काम वेगवेगळ्या माध्यमातून 'स्व'-रूपवर्धिनी करीत आहे. 'स्व'-रूपवर्धिनीच्या या ३० वर्षांच्या आश्वासक वाटचालीबद्दल संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी, सर्व कार्यकर्ते आणि विद्यार्थ्यांचं मी पुनः एकदा अभिनंदन करतो आणि आगामी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देतो.''

❖ ❖ ❖

'स्व'-रूपवर्धिनीस हार्दिक शुभेच्छा!

**निरामय योग निकित्सा केंद्र**

❖ ❖ ❖

सहवास कॉर्नर बस स्टॉप समोर,
कर्वेनगर, पुणे ४११ ०५२
**श्री. केदार पारगावकर**
फो : ९८८१२०२०७०

**सह्याद्री इंजिनिअर्स**

❖ ❖ ❖

सिव्हील काँट्रॅक्टर्स अँड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस,
७५१, कसबा पेठ, पुणे ४११ ०११.
**श्री. पराग लकडे**
फो : ९४२२००११७४

**ही आमची भारतभूमी वात्सल्याची पुतळी आहे.**

# यशासाठी ध्येयासक्ती हवी !

*(गुणगौरव कार्यक्रमाला प्रमुख अतिथी या नात्याने महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष श्री. रविंद्र वंजारवाडकर हे उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी मांडलेले विचार त्यांच्याच शब्दात....)*

विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड ऊर्जा असते. या ऊर्जेला योग्य दिशा व मार्गदर्शन मिळण्याची आवश्यकता असते. असे घडले की त्याचे सुपरिणाम समाजात दिसतात. एका महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून पावसाचे पाणी अडविण्यासाठी बंधारा बांधला. या बंधाऱ्यामुळे या गावाला आता बाराही महिने पाणी उपलब्ध झाले आहे. या गावाची शेती फुलली आहे. तरुणांच्या ऊर्जेतून निर्माण झालेल्या बंधाऱ्यातून आज या गावाच्या विकासाला प्रोत्साहन मिळाले आहे.

आज या कार्यक्रमात हुशार आणि गुणी मुलामुलींचा गौरव झाला. आयुष्याच्या प्रत्येक क्षणी परीक्षा द्यावी लागते त्यामुळे एकदा मिळालेले यश हे पुरेसे नाही याची जाणीव आपण मनात ठेवायला हवी.

आज शहरे, गावं वेगाने बदलत आहेत, विज्ञान-तंत्रज्ञान बदलते आहे, सेवा-उद्योग क्षेत्रात बदल होत आहेत. त्यामुळे समाजजीवनातही बदल होणे अपरिहार्य आहे आणि त्याचे परिणाम व्यक्ती-जीवनावरही होतात. अशा परिस्थितीत आपण काय करायचं? बदलांच्या लाटांवर स्वार व्हायचं की आपल्या संस्कृतीवर/संस्कारांवर ठाम राहायचं? तुम्हीच या होणाऱ्या बदलांचे शिल्पकार असाल पण त्यासाठी काही गोष्टी जाणीवपूर्वक कराव्या लागतील. पहिली गोष्ट स्वत:ला समजून घ्यावं लागेल. आपल्या शरीरामध्ये जी षटचक्रे आहेत असे आपल्याकडे मानले जाते त्या सहा चक्राच्या ठायी (मूलाधार चक्र, स्वाधिष्ठान चक्र, मणीपूर चक्र, अनाहत चक्र, आज्ञाचक्र आण सहस्त्राधार चक्र) असलेल्या शक्तीचे जागरण करावे लागेल. संयम, सम्यक दृष्टी, निर्णयक्षमता अशा गुणांची जोपासना करावी लागेल. प्रत्येकाला यशस्वी होताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागतेच पण त्याहीपेक्षा भीषण परिस्थितीत वनवासी समाज जगतो. त्या समाजाचे प्रश्न जाणून घ्यायला हवेत. एकूणच आपल्या समाजाचे वेगवेगळे प्रश्न समजावून घ्यायला हवेत. देश सामर्थ्यशाली होणार, पण कसा? तर देश सामर्थ्यशाली करण्यात प्रत्येकाचा सहभाग असायला हवा. अत्यंत प्रतिकूल वातावरणातही काम करण्याची क्षमता आपण वाढवली पाहिजे. यशस्वितेच्या नव्या वाटा आम्ही कोरल्या पाहिजेत. आपण स्वत: परिवर्तनाचे कारण बनू शकलो पाहिजे अशी आपल्याला आपली क्षमता विकसित करावी लागेल त्यासाठी तनमनधन पूर्वक काम आपल्या प्रत्येकाला करावे लागेल आणि त्यासाठी आपल्यामध्ये ध्येयासक्ती (Passion) असायला हवी.

❖ ❖ ❖

**सिंधू व ब्रह्मपुत्रा, गंगा नि यमुना, नर्मदा नि गोदा, कृष्णा नि कावेरी**
**या तरंगिणींनी संपन्न असलेल्या भूमातेला आमचा नमस्कार असो.**

# संस्कारांचे मोल

श्री. राघवेंद्र मेहता, उपाध्यक्ष-'स्व'-रूपवर्धिनी

आपल्या देशाला म्हणजे भारतमातेला फार मोठी वैभवशाली व ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. भिन्न भाषा, भिन्न धर्म, भिन्न पंथ, भिन्न विचार, भिन्न संप्रदाय यांनी भारतीय संस्कृती सजलेली आहे. भारतीय संस्कृती म्हणजे वेदमान्य संस्कृती, व्यासमान्य संस्कृती. जगातील अठ्ठेचाळीस संस्कृती काळाच्या उदरात गडप झाल्या परंतु शेकडो वर्षे परकियांचे प्रहार झेलूनही जीवित असलेली एकमेव संस्कृती म्हणजे भारतीय संस्कृती. संस्कृती म्हणजे विचार प्रणाली (Way of thinking) जीवनप्रणाली (Way of life) आणि भक्ती प्रणाली (Way of worship). संस्कृती म्हटली की जोडीला संस्कार आलेच. संस्कृती आणि संस्कार हे दोन्ही शब्द सम + कृ, म्हणजे चांगले कृत्य या अर्थाने तयार झाले आहेत.

एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करताना व झेप घेताना आपल्या संस्कृतीचा विसर पडून आपण पाश्चात्य संस्कृतीकडे वळतो की काय याची शंका वाटू लागली आहे. माणसं संकुचित वृत्तीची आणि दुसऱ्यांच्या हक्कांवर गदा आणून स्वत:च्या सुखाकडे जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. सुख प्रत्येकाला हवेच असते आणि दु:ख कोणालाच नको असते. पण सुख कशात आहे, माणसाचे अंतिम ध्येय काय आहे, त्यासाठी साधन काय आहे व सुखाचा मार्ग कोणता याचे सुरेख विवेचन ह.भ.प. किसन महाराज साखरे यांनी 'ज्ञानेश्वरीमधील योगत्रयी' (अर्थात कर्मयोग, भक्तियोग व ज्ञानयोग) या त्यांच्या पुस्तकात केले आहे. विचार व आचारांची सांगड ही आजची गरज आहे. विज्ञानाचे फायदे व दुष्परिणाम यांची चढाओढ अनुभवत असताना सामान्य माणसाला अध्यात्मिक अधिष्ठानाची व मन:शांतीची पूर्वी होती त्यापेक्षाही आज जास्त गरज आहे. षड्रिपूंवर मात करण्यासाठी या अधिष्ठानाची आणि मन:शांतीची गरज आज तीव्रतेने भासते आहे. अध्यात्मिक अधिष्ठानाचे आणि मन:शांतीचे बीज लहानपणापासूनच जर रुजले तर भेडसावणाऱ्या अनेक समस्या बऱ्याच प्रमाणात कमी होतील.

नेमकी हीच गरज लक्षात घेऊन 'स्व'रूपवर्धिनीची स्थापना १९७९ साली कै. किशाभाऊ पटवर्धन, पुरुषोत्तमभाई श्रॉफ, श्रीकांत सामळ व अन्य मंडळींनी केली. सुरुवातीच्या काळात अनंत अडचणींना तोंड देत देत वर्धिनी पुढे नावारूपाला आली. पुण्याच्या वेगवेगळ्या भागामध्ये कमी उत्पन्न गटातील मुला-मुलींना तेरा शाखांमधून केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्यामध्ये चांगले संस्कार रुजवून आदर्श नागरिक बनण्याचे, सामाजिक बांधिलकीचे धडे कृती कार्यक्रमातून दिले जातात. याची प्रचीती लिखाणातून वर्णन व अनुभव सांगून करण्यापेक्षा या शाखांना प्रत्यक्ष भेट दिल्यानंतरच येईल. संस्थेच्या प्रार्थनेत म्हटल्या-प्रमाणे 'करी आमुची मायभूमी महा' म्हणजे आमचा देश मोठा झाला पाहिजे असा विचार रुजविणारे शिक्षण भावी पिढीला येथे दिले जाते. वर्षभर वेगवेगळी व्याख्याने, शिबिरे, साहस सहली, गटकार्ये, व्यायाम व खेळ अशा अनेक कार्यक्रमाद्वारे येथील मुलामुलींची मनं आणि मनगटं मजबूत करण्याचा प्रयत्न येथे

**जे जगात अन्यत्र कोठे नाही, ते मात्र या आमच्या मातृभूमीत परमेश्वराच्या कृपेने लाभलेले आहे.**

कसोशीने चालतो. या मुख्य कामाबरोबरच फिरती प्रयोगशाळा, स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन केंद्र, स्वयंअध्ययन केंद्र, गरजू महिलांसाठी चालणारे उद्योग शिक्षण केंद्र, बालवाडी, आरोग्यकेंद्र, आजोळ, बचत गट अशा अनेक प्रकल्पांच्या माध्यमातून समाजाच्या विविध गरजू घटकांपर्यंत संस्थेचे काम पोहोचले आहे.

या सर्व धडपडीतून संस्थेच्या संपर्कात आलेल्या विद्यार्थ्यांपैकी अनेक जण आज वकील, डॉक्टर, न्यायाधीश, शासकीय अधिकारी, खाजगी उद्योगक्षेत्रातील अधिकारी, सैन्यदलातील-पोलिसदलातील अधिकारी, शिक्षक-प्राध्यापक अशा पदांवर काम करीत आहेत. काही जण स्वत:चा व्यवसाय सुरू करून देशाच्या संपत्तीत भर घालीत आहेत आणि अनेक कुटुंबांचे आधार बनले आहेत तर काही जण विदेशातही नोकरी व्यवसायासाठी गेले आहेत. सुसंस्कार लाभलेले हे विद्यार्थी ज्या-ज्या वेळी नैसर्गिक किंवा अन्य संकटे येतात त्यावेळी मदतीसाठी धावून जातात, मग ते संकट लातूरच्या भूकंपाचे असो, नागपट्टणमला धडकलेल्या त्सुनामीचे असो किंवा कोठेवाडीच्या अत्याचारपीडित समाजावरचे असो.

थोडक्यात संस्कृती-संस्काराचे धडे मिळाल्यास एकविसाव्या शतकात देखील विध्वंस, भ्रष्टाचार, अनीती इत्यादी षडरिपूंवर मात करून आपण मन:शांतीकडे वाटचाल करू शकतो व आपल्या भारतीय संस्कृतीचे जतन करून ऱ्हास थोपवू शकतो असा विश्वास वाटतो.


With Best Compliments From

**S.S. ENTERPRISES**

*DISTRIBUTOR OF CO2 WELDING WIRE & ELECTRODES & CONSUMABLES*

*Dealer of :*

***FILLER WIRE, S.S. WIRE,***
***FLUX COREWIRE GRINDING WHEEL, SAFETY EQUIPMENTS***

*Manufacturer of :*

***HANDGLOVES COTTAN, NETED***

*Office :*

***SHOP NO. 21, SECTOR NO. 7, OMAKAR IND. COMPLEX,***
***PCNTDA BHOSARI, PUNE -411 026***
***E-mail : datta.shedge@rediffmail.com***

*Godown :*

***GALA NO. 2, GANGABHAU COMPLEX CHIMBALIGAON,***
***TAL. KHED, DIST.- PUNE 412 105***


**देशभूमीची खरी चारुता तिच्या स्वत:च्या महत्त्वाने जितकी प्राप्त होते**
**तिच्या शतपट अधिक रीतीने त्या देशभूचे पुत्रांचे कृतीवरून ठरत असते.**

# भविष्यातील संधी आणि 'स्व'-रूपवर्धिनीची वाटचाल

**श्री. पुरुषोत्तमभाई श्रॉफ (सन्माननीय पूर्वअध्यक्ष)**

आजची शिक्षित तरुण पिढी आत्मविश्वासाने जगातील अनेक देशांमध्ये काम करीत आहे. त्यामुळे भारतातील या बौद्धिक संपदेकडे साऱ्या जगाचे लक्ष लागलेले आहे. लोकसंख्येची प्रचंड वाढ ही एका दृष्टीने त्या देशाची समस्या बनते. पण भारताच्या दृष्टीने तो एक हुकुमाचा पत्ता होईल अशी शक्यता आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी म्हटले होते की आपल्या देशात तरुणांची संख्या इतकी वाढत आहे की पाश्चात्य जगाने त्याचा धसका घेतला आहे.

इ.स. २०२० पर्यंत जगात सुमारे ४७ मिलियन कामगारांचा तुटवडा पडणार आहे असा अंदाज आहे. ही दरी भारतीय तरुण भरून काढतील अशी त्यांच्यामध्ये क्षमता आहे. त्यासाठी त्यावेळच्या तरुण पिढीला म्हणजे आजच्या काळातील उमलत्या वयातील मुलांना चांगले शिक्षण आणि संस्कार देण्याचे कसून प्रयत्न करावे लागतील. हेच काम गेल्या तीस वर्षांपासून 'स्व'-रूपवर्धिनी करीत आहे.

हर्बल विद्यापीठाचे लोकसंख्या विषयाचे विख्यात अभ्यासक (Demographer) प्रोफेसर डेव्हिड ह्यांनी लोकसंख्येचे परिवर्तन व आर्थिक चमत्कार असा एक अभ्यासपूर्ण प्रबंध लिहिला आहे. त्यामध्ये त्यांनी इ.स. १९६० ते २००० या कालावधीतील जन्म-मृत्यू दराचा आढावा घेऊन असे सप्रमाण सिद्ध केले आहे की पाश्चात्य देशांच्या तुलनेत भारतातील 'काम करण्यास योग्य' अशा तरुणांची संख्या (Employable) ही चौपटीने वाढत आहे. त्यांच्या निष्कर्षानुसार ही तरुण पिढी खूपच कार्यक्षम असेल व त्यांची संपत्ती निर्मितीची क्षमताही खूप असेल. त्यांची सामुदायिक सृजनता व कल्पकता (Cumulative Creativity), व त्यातून निर्माण होणारी विपुल समृद्धी ह्याचा आलेख मांडताना पाश्चात्य अर्थतज्ज्ञ चकित व दिङ्मुख झाले आहेत. हे प्रोफेसर ब्ल्युम यांचे भाकित आहे. ही सर्व भाकिते, अभ्यासपूर्ण निष्कर्ष, सुखावणारे असले तरी हे प्रत्यक्ष घडण्यासाठी सुसंस्कारी सुविद्य व सशक्त तरुण पिढी घडवावी लागेल. तो पर्यंत अशी 'संपदा' निर्माण होणार नाही.

कोणत्याही कारणाने जर आपले तरुण ज्ञानवंचित राहिले तर ही जागतिक संधी आपल्याला मिळणार नाही. अशी एक संधी ब्राझील व दक्षिण अमेरिकेने नुकतीच घालवली आहे व त्यामुळे त्यांच्यावर राष्ट्रीय संकटे आली.

अशिक्षित, अकुशल संख्यावाढ हे फार मोठे संकट आहे हे आपण विसरून चालणार नाही. इ.स. २०२० चे सुमारास भारतीय तरुणांचे सरासरी आयुर्मान २९ वर्षे असेल तर त्यावेळी चिनी व्यक्ती सरासरी ६७ वर्षांची, अमेरिकन किंवा युरोपियन व्यक्ती ४५ वर्षांची आणि जपानी व्यक्ती सरासरी ६८ वर्षांची असेल. ह्या स्थितीचा आपल्याला निश्चित फायदा होऊ शकतो. आपल्या मानवसंपदेच्या बळावर म्हणजेच उद्योजक, कारखानदार उच्चशिक्षित (एम.बी.ए., शास्त्रज्ञ, इंजिनिअर्स, आय.टी. क्षेत्रातील उच्चशिक्षित, यांच्या जोरावर) आपण आय.टी/बि.पी.ओ. या क्षेत्रात

**तत्त्वज्ञानाची भागीरथी या भूमीच्या चरणकमलापासून उगम पावली आहे.**

वैश्विक नेतृत्व करीत आहोत. यापुढील तरुण पिढी अशीच उच्चशिक्षित घडवावी लागेल. अशी तोला-मोलाची माणसे घडवायची असतील तर सर्वांनाच अथक प्रयत्न करावे लागतील. थोडक्यात सर्वसामान्य नोकरी-व्यवसायाच्या संधीपासून ते जागतिक पातळीवरील ही गरज भागवू शकणारी सुसंस्कारीत, समर्थ तरुण पिढी घडविण्याचे काम करावे लागणार आहे. या दिशेने वर्धिनीही काम करीत आहे. विस्ताराच्या योजनांना आकार देण्याचा प्रयत्न करीत आहे.

चऱ्होली येथील एक एकर जागेत गरजू व गुणी महिलांसाठी/मुलींसाठी प्रस्तावित हिरा-वल्लभ संकुलात एक बहुउद्देशिय व्यवसाय प्रशिक्षण केंद्र उभे करण्याच्या टप्यावर वर्धिनी आली आहे. या प्रस्तावित संकुलातील इमारतीचा आराखडा तयार होत आला आहे व येत्या एक-दीड वर्षात प्रत्यक्ष इमारत उभी राहील असा विश्वास आहे. या विस्तार योजनेसाठी गरज आहे जवळपास ३.०० कोटी रुपयांची. या संकल्पित विस्ताराबरोबरच चऱ्होली येथेच असलेल्या सहा एकर जागेवर शिबिर संकुल उभे करायचे आहे. या जागेचे सपाटीकरण, कुंपण व अन्य प्राथमिक विकास कामांना वर्ष २०१० मध्येच गती देण्याचा वर्धिनीचा संकल्प आहे. या संकुलामध्ये शिबिर व्यवस्थेबरोबरच ग्रामीण शहरी तरुणांसाठी बहुउद्देशिय व्यवसाय प्रशिक्षण संकुल उभे करण्याचा मानस आहे. याही कामाला मोठ्या प्रमाणावर निधी लागणार आहे. आपल्या सक्रीय सहकार्याच्या बळावर विस्ताराच्या या योजनाही प्रत्यक्षात येतील असा विश्वास आहे.


With Best Compliments From

**THE POONA MOTOR GOODS TRANSPORT**

* Fleet-Owners & Transport Contractors
* Full load and part load service for Pune to Bombay & Vice Versa
* Full truck load service for Maharashtra & Gujrath State

❖ ❖ ❖

*Head Office : 780, Sadashiv Peth, Pune 411 030.*
*Phone : 24473222, 24477621, 24476914*

❖ *Branch* ❖
*137, Transportnagar, Sector 23, Nigdi, Pune 44.*
*Phone : 27656925, 27656935*
*13 B, Sadashiv Cross Lane, Kandewadi, Girgaon, Mumbai 4,*
*Phone : 23822538, 23862210*
*Ramraj Yadav Chal, Gala No. 2, 90 Ft. D.P. Road, Sakinaka,*
*Near Ganesh Temple, Andheri, Mumbai 400 072*
*Phone : 28513018*


या जगात नेभळ्याचा निभाव लागणार नाही.

# बोध इतिहासाचा, वेध भविष्याचा

**श्री. रमेश जोशी, (सहकार्याध्यक्ष, 'स्व'-रूपवर्धिनी)**

२६ नोव्हेंबर २००८, मुंबईवर हल्ला झाला तो हा दिवस. हा हल्ला नक्की कशावर होता? मुंबईवर होता? ताज हॉटेलवर होता? ओबेरोय हॉटेलवर होता की छ. शिवाजी स्थानकावर होता? तो होता भारतीयांच्या मनोधैर्यावर, भारतीयांच्या कर्तृत्वावर, भारतीय लोकशाहीवर आणि भारतीयत्वावर.

हा काय पहिलाच हल्ला होता? शक आणि हूणांच्या नंतर ख्रिस्तपूर्व ३०० वर्षांपूर्वी अलेक्झांडरने सिंधू तटापर्यंत धडक मारली होती. त्यानंतर आले मुस्लिम आक्रमक. सन १२०० नंतर महंमद गझनीने तर सोरटी सोमनाथ ११ वेळा लुटले. घोरी, तुघलक, गुलाम, खिलजी, लोधी हे एकामागोमाग आले. नाही कोणी त्यांना रोखले, नाही कोणी ते जेथून येतात त्या वाटा बंद करायचे धाडस दाखवले.

उझबेकिस्तानमधल्या फरहानहून मोगल बाबर आला. त्याने लोधीचा पराभव केला आणि दिल्लीवर कब्जा केला. मोगल साम्राज्य सुमारे २०० वर्षे टिकले. इ.स. १५०० नंतर पोर्तुगीज आले, डच आले पण त्यांना राज्य करण्यात स्वारस्य नव्हते. १६४४ च्या आसपास फ्रेंच आणि ब्रिटिश आले. सुरुवातीला त्यांनाही फक्त व्यापारात स्वारस्य होते.

१७५६ साली रॉबर्ट क्लाईव्हने सिराज उद्दौलाचा मुर्शिदाबादच्या लढाईत पराभव केला आणि ब्रिटिश सैन्य शहरात घुसले. मुर्शिदाबादच्या वैभवाने क्लाईव्हचे डोळेच दिपले. तो लिहितो की इतके श्रीमंत शहर मी आजवर पाहिलेले नाही. लंडन आणि पॅरिस ही शहरे मुर्शिदाबादच्या जवळपाससुद्धा पोहोचत नाहीत. मग लखनौ, दिल्ली ही नगरे किती श्रीमंत आणि संपन्न असतील. सतत दहा दिवस गोरी फलटण मुर्शिदाबाद लुटत होती. १७६५ साली ब्रिटिशांनी अयोध्या आणि लखनौवर कब्जा केला व तीही नगरे लुटली.

१८१८ साली मराठी साम्राज्याचे पतन झाले. ब्रिटिशांनी समोर दिसेल त्याची लूट सुरू केली. त्यांनी चहा कॉफीचे मळे ताब्यात घेतले, सर्व प्रकारचे उत्पादन बंद पाडले, विणकरांचे अंगठे कापून काढले, सर्व प्रकारच्या उत्पादनांवर जबर कर बसवला. भारतात अंधार पसरला.

अंधार पसरला असे म्हणण्यापेक्षा उजाडायला सुरुवात अजून व्हायची होती. चंद्रगुप्त, अशोक, शिवाजी महाराज यांचा काळ सोडला तर बहुतेक शासक स्वत:पुरते पाहणारेच होते. प्रजेला कोणतेही हक्क नव्हते की कशाचीही शाश्वती नव्हती. कोणत्याही कामाला, कौशल्याला, श्रमाला किंमत असते हे ठाऊकच नव्हते. समाजाने, काही ध्येये अथवा उद्दिष्टे ठेवून राज्य केले असे इतिहासात अभावानेच आढळते. प्रजेसाठी काही सुधारणा केल्या. रस्ते आखले, व्यापार वाढावा म्हणून प्रयत्न केले. शिक्षणाच्या सोयी केल्या, निदान काशीतील शिक्षण आपल्या राज्यात आणले, शेतीत सुधारणा केल्या. काही कायदे केले व कायद्याचे राज्य केले हे पेशवाईतसुद्धा घडले नाही.

महाराष्ट्रात राघोबादादा, शिंदे, होळकर, पवार,

**राजकीय स्वातंत्र्य हे राष्ट्राचे मानसिक शिक्षणावर व शारीरिक सैनिक शिक्षणावर अवलंबून असते.**

दाभाडे, यांच्या टोळ्या कोणाला किती अधिक मिळाले यावरून मारामाऱ्या करीत होत्या. पानितपच्या वाताहतीवरून सुद्धा आमचे राज्यकर्ते काही शिकले नाहीत आणि मग १८१८ साली साम्राज्य लयाला गेले.

या साऱ्या घटना प्रजा सतत पाहत होती. पण या भांडणात आपण पडावे असे काही प्रजेला वाटले नाही आणि त्यामुळे हा राजा आपला आहे ही भावनाच प्रजेच्या मनातून नाहीशी झाली. अन्याय कोणीतरी करणारच, कर कोणालातरी द्यायचेच, तर तुम्हाला देऊ अशीच भावना प्रजेत निर्माण झाली. सोमनाथ ११ वेळा लुटले गेले पण राज्य करणाऱ्यांना ते लुटले जातेय याचे काही वाटले नाही. प्रजा मुकाट्याने संपत्ती निर्माण करत राहिली, कर भरत राहिली, सोमनाथाच्या चरणांवर अर्पण करीत राहिली आणि गझनीचा महंमद ते नेमाने लुटत राहिला. लुटत होता पण परत जात होता. मोगल आले. त्यांनीही लुटले पण संपत्ती येथेच राहिली. ब्रिटिश आले. येथेच राहिले पण त्यांनी संपत्ती मात्र लुटून लंडनला पाठवली.

१७५७ मध्ये भारतात खरोखर सोन्याचा धूर निघत होता. जागतिक बाजारातील भारताचा हिस्सा तेव्हा होता २३ %, ब्रिटनचा होता १.७% तर संपूर्ण युरोपचा होता ६.७%.

१८५७ च्या स्वातंत्र्यसमरापासून प्रजा शहाणी व्हायला लागली. कुठेतरी आत्मपरीक्षण सुरू झाले. प्रजेचे डोळे उघडण्याचे काम राजाराम मोहन रॉय, लोकहितवादी देशमुख, आगरकर, महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे ही मंडळी करायला लागली. १९०५ साली सावरकरांनी परदेशी मालाची पुण्यात होळी केली. १८८० च्या आसपास केव्हातरी जमशेतजी टाटांनी 'जो देश पोलादाची निर्मिती करेल त्या देशाकडे सोने आकर्षित होईल', या कार्लाईल यांच्या वाक्याने प्रेरीत होऊन पोलाद तयार करण्याचा संकल्प सोडला.

१९०५ साली ब्रिटिश राजपुत्राचे भारतात स्वागत करण्यासाठी मुंबईच्या किनाऱ्यावर कमान बांधली जात होती. त्याचे नाव गेटवे ऑफ इंडिया. हा राजकुमार गेटवेमधून आत आला की त्याला भारताची सुप्त ताकद दिसायला हवी या एका महत्त्वाकांक्षेने टाटांनी 'ताज' या नावाचे हॉटेल तिथेच त्या कमानीसमोर घडवले. १९०३ साली त्याचे उद्‌घाटन झाले. तो काही योगायोग नव्हता. १९०८ साली जमशेदपूरला टाटांनी लोखंड तयार केले व १९१२ साली पोलादाची निर्मिती सुरू झाली.

या साऱ्या घटनांमुळे जनतेचा आत्मसन्मान जागा झाला. १९१२ साली किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड ही कंपनी स्थापन झाली. वालचंद हिराचंद यांची हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनी याच काळातली. हिंदुस्थान एरोनोटिक्स, हिंदुस्थान रायफल्स, सिंदिया शिपिंग त्यानंतरच्या. मुंबई, अहमदाबाद येथे कापड गिरण्या स्थापन झाल्या. स्वतंत्र भारताला स्वातंत्र्यानंतर काय लागेल याचा पूर्ण विचार करून उत्पादन चालू झाले. आपण राजे आहोत आणि शासक आपले नोकर आहेत याचे त्यांना भान आले ते या काळात.

आणि मग १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले तर २६ जानेवारी १९५० साली भारताची घटना अस्तित्वात आली. प्रजेला मुलभूत हक्क मिळाले. गणतंत्राची घोषणा झाली. मतदार राजा कामाला लागला. सहा दशकात राष्ट्र एक उभरती महाशक्ती म्हणून उभे राहिले. राष्ट्राचे अन्नधान्याचे परावलंबित्व

**स्वातंत्र्य हे निसर्गदत्त आहे.**

पूर्ण नष्ट झाले. दूध उत्पादनात देशाने जगात प्रथम क्रमांक तर गहू व तांदूळ उत्पादनात दुसरा क्रमांक मिळविला. रिमोट सेन्सिंग उपकरणात, आयटी सर्व्हिस क्षेत्रात पहिला क्रमांक मिळविला. नवेनवे तंत्रज्ञान भारतीयांनी शोधून काढले. बंधने कमी झाल्याबरोबर निर्यात प्रचंड वाढली. परदेशात जाऊन तेथील उद्योग भारतीय उद्योजकांनी विकत घेतले. भारताची पत भरपूर वाढवली. १९८० साली जागतिक व्यापारात भारताचा हिस्सा जो १% आला होता तो २००८ साली २% झाला. अब्दुल कलामांचं २०२० साली महासत्ता बनण्याचे स्वप्न साकार करायचे असेल तर जागतिक व्यापारातील भारताचा वाटा पुन्हा किमान २३% व्हायला हवा.

ही सारी चांगली बाजू आपण पाहिली. पण या स्वप्नाला सुरुंग लागू शकतात. हे होऊ नये म्हणून प्रत्येक भारतीयाने खालील प्रकारची काळजी घ्यायला हवी.

- आपण ज्या उमेदवारांना निवडून देतो त्यांची निवड तपासून पाहायला हवी. त्यांच्यावर वचक ठेवता आला पाहिजे. गैर काम करण्याची त्यांना भीती वाटली पाहिजे.
- आपण जे कर भरतो त्याचा विनियोग कसा होतो यावर आपण लक्ष ठेवायला हवे. अण्णा हजारेंनी मिळवून दिलेल्या माहितीच्या अधिकाराचा वापर करायला शिकले पाहिजे.
- लाचलुचपत आणि पैशाचा अपहार हे दोन मोठे रोग आपल्याकडे अनेकांना जडले आहेत. एकट्या स्विस बँकेत भारतातील राजकीय पुढारी, सरकारी अधिकारी, व्यापारी आणि उद्योजक यांनी लपवून ठेवलेले १५९६ कोटी डॉलर्स जमा आहेत. ते देशाच्या कोषात जमा व्हायला हवेत आणि त्यावरचा करही जमा व्हायला हवा. आजही सुमारे ४०% भारतीय फक्त एकाच वेळी जेवू शकतात. शेतकरी आत्महत्या करतात. जनावराप्रमाणे स्वत:ला विकून घ्यायला तयार होतात.
  या पार्श्वभूमीवर काही प्रकरणातील पैसा कुठे जातो? चारा कोण खातो? तेलगी तुरुंगात जातो पण त्याने चोरलेला पैसा कोणाच्या खिशात जातो? याची उत्तरे मतदारांनी शासनाला द्यायला भाग पाडले पाहिजे.
- दंगेधोपे, भाषिक वाद, धार्मिक चळवळी यात होणारा सार्वजनिक संपत्तीचा नाश टाळला पाहिजे. सार्वजनिक शिस्त पाळली पाहिजे. नियोजनाप्रमाणे खर्च झाला तर त्याचा फायदा मिळतो नाहीतर धरणे बांधून तयार पण कालवे नाहीत, रस्ता तयार पण पूल नाही अशा गोष्टी टाळायला हव्यात.

थोडक्यात प्रत्येकाने सतत सावध असायला हवे. स्वातंत्र्य टिकवायला जशी सावधानतेची गरज आहे तशीच जबाबदारीने वागण्याची सुद्धा. शिस्त अंगी बाणवावी लागेल. नुसत्या घोषणा देऊन आपला देश महान होणार नाही हे आपण सर्वचजण लक्षात ठेवू या.

❖ ❖ ❖

**कधीही मरण न येण्याचे एक साधन म्हणजे स्वदेश स्वातंत्र्यास्तव तत्काल मरण हे होय!**

# । जय अरुणाचल - जय शिवराय।

(ज्ञानेश पुरंदरे-सहकार्यवाह 'स्व'-रूपवर्धिनी)

आयुष्यात काही भव्य-दिव्य सुयोग अचानक घडतात. दिनांक २८ मे ते ११ जून या कालावधीत ज्ञानप्रबोधिनीच्या शिक्षक-कार्यकर्त्यांबरोबर अरुणाचल प्रदेशाच्या प्रवासाचा योग आला. निमित्त होते तवांग युद्ध स्मारक केंद्रातील छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रमाचे. दिनांक ३ जून रोजी तवांगला १९० माऊंटन ब्रिगेडमध्ये लष्करी शिस्तीत हा अत्यंत दिमाखदार सोहळा संपन्न झाला. येथील मराठा लाईट इन्फ्रंट्रीमधून लष्करी अधिकारी ते लष्कर प्रमुख असा गौरवास्पद टप्पा गाठणारे अरुणाचलचे सन्माननीय राज्यपाल जन. (नि.) जे.जे. सिंग यांच्या शुभहस्ते पुतळ्याचे अनावरण झाले. या प्रसंगी मा. मुख्यमंत्री, तसेच कर्नल (नि.) संभाजी पाटील आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन तवांगचे कमांडींग ऑफिसर ब्रिगेडियर अशोक आम्ब्रे यांनी केले होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने शिवचरित्रावरील एका उत्कृष्ठ प्रदर्शनीची रचना प्रबोधिनीतर्फे करण्यात आली होती. स्फूर्तीदायी पोवाडे आणि शिवचरित्रावरील ओघवत्या भाषणांनी वातावरण भारून गेले. शिवराय हे रयतेचे राजे होते हे डोळ्यांसमोर ठेवून लष्करानेही जनतेच्या मनात आपल्या व्यवहाराने कायमचे स्थान निर्माण करावे असे आवाहान मा. राज्यपालांनी केले. अरुणाचलचा निसर्ग बाराही महिने हिरावाईने नटलेला आसतो. हजारो फूट उंचीचे पर्वत, काळ्याकभिन्न काळदऱ्या, प्रचंड धबधबे आणि BRO चे रस्ते हे सारेच केवळ विलोभनीय. ४ जूनला १५,५०० फूटांवर 'बूमला'




येथे भारत-चीन सरहद्दीपर्यंत प्रवास झाला. गोठवणाऱ्या हिमाच्छादित शिखरांवर मातृभूमीच्या रक्षणासाठी बोफोर्स तोफा रोवून अहोरात्र सिद्ध असणारे भारतीय जवान पाहून ऊर अभिमानाने भरून आला.

तवांगमधील ६०० वर्षे प्राचीन अशी बौद्ध मॉनेस्टरी व पद्मश्री लामा थुपटेन फुंगसोक यांचे मंजूश्री विद्यापीठ यांनाही सविस्तर भेटी झाल्या. मा. विजय स्वामी यांनी अरुणाचलच्या लोकजीवनाचा सविस्तर परिचय करून दिला. परतीच्या प्रवासात टैंगा व्हॅलीमध्ये १७ मराठा रेजिमेंटने आवर्जून थांबवून घेतले. तेथेही जवानांसाठी व त्यांच्या परिवारासाठी पोवाडे व शिवचरित्र कथनाचा जोरदार कार्यक्रम झाला.

गुवाहाटी संघ कार्यालयात ६० वर्षांपासून पूर्वांचलात काम करणाऱ्या पितामह मधूजी लिमये यांची भेट झाली. ८६ वर्षीय ऋषीतुल्य मधूजी विशीच्या तरुणाच्या उमेदीने आमच्याशी वार्तालाप करीत होते. ही भेट खूपच प्रेरणादायी ठरली.

**वाची वीराचा शुष्क काथ्याकूट सोडून देऊन कृतीशूर व्हा!**



गुवाहाटीमधील जगप्रसिद्ध कामाख्या देवीचे शक्तीपीठ, विवेकानंद केंद्राचे सांस्कृतिक भवन, विराट ब्रह्मपुत्रेतील सर्वात छोटे बेट असलेले उमानंद मंदिर, सेनापती लाचित बडफुकनची शौर्यभूमी व सर्व पूर्वांचलाचे सर्वांगाने दर्शन घडविणारे शंकरदेव कलाकेंद्र ह्या सर्व भेटी चिरस्मरणीय राहतील.

आसाममधून उदालगुडीमार्गे महामार्गावरून प्रवास करताना कैक किलोमीटर बांग्लादेशी घुसखोरांच्या वस्त्याच वस्त्या लक्ष वेधून घेतात. या पट्ट्यात सतत संघर्ष घडत असतो. आजपर्यंत सुमारे चार कोटी बांग्लादेशी घुसखोर आसाममार्गे देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले आहेत. कोलकाता, दिल्ली, मुंबई येथेही ते बहुसंख्येने राहतात.

अरुणाचल प्रदेशाने मात्र घुसखोरीची ही आपत्ती जाणीवपूर्वक दूर केली आहे. तेथील प्रांतिक कायद्याप्रमाणे बाहेरील कोणीही व्यक्ती तेथे एक इंचही भूभाग खरेदी करू शकत नाही. सर्व भूमी एकतर स्थानिक भूमीपुत्रांची किंवा सरकारी वनखाते अथवा लष्कराची. मिशनऱ्यांच्या शाळांमुळे वाढत्या ख्रिस्तीकरणाचे भय इथेही आहे; पण विवेकानंद केंद्र व कल्याण आश्रमाच्या निवासी शाळांची श्रृंखला भक्कमपणे त्याला तोंड देत आहे. अरुणाचलात प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था खूप चांगली आहे. पर्वतराजीतील छोट्या-मोठ्या सर्व गावातील मुले-मुली जवळच्या सरकारी निवासी शाळेत शिकतात. १०वी पर्यंत अडचण नाही, पण उच्च शिक्षणाची व्यवस्था अवघ्या तीन ठिकाणीच आहे.

प्रवास खूपच सुंदर होता. आसामचा हमरस्ता सोडून गाडी घनदाट जंगलातून सीमेवरील भालुकपोंग चेकपोस्टवर गाडी पोहोचली. गावाचं नाव भालुकपोंग. बहुतेक अस्वलांचं साम्राज्य असावं. सूर्यास्त तेथेच झाला. अंधारात गाडी पुढे निघाली. धुक्यात हरवत जाणारा नागासारखा सळसळता रस्ता, धोधो पाऊस व अंधारलेल्या डोंगरदऱ्या.... अंगावर काटा उभा राहत होता.

सकाळी थंड वातावरणात पुढचा प्रवास सुरू झाला. चीन युद्धात शहीद झालेल्या जवानांची युद्धस्मारके अत्यंत नेटकेपणाने उभी केली आहेत. उंच उंच जात गाडी 'सेला पास' पर्यंत आली. उंची १२००० फूट होती. समोर खिंडीतील ढगांमध्ये घुसण्यासाठी आपण धावू लागतो खरे, पण पाच-सहा ढांगातच आपला जागच्या जागी स्टॅच्यू बनतो. ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे प्रचंड धाप लागते व गती शून्यावर येते. आपण कधीही विसरणार नाही असे आहेत इथले रस्ते. त्या प्रचंड चढ उतारांवर नागमोडी वळणाचे अत्यंत नेत्रदिपक व अतिदुर्गम रस्ते बांधणाऱ्या Border Road Organisation च्या धाडसी कर्मवीरांना मानाचा मुजरा. यांना जर वेळोवेळी अर्थबळ मिळाले तर हे सुद्धा चीन्यांसारखे सहा पदरी महामार्ग सीमेपर्यंत नेऊन भिडवतील. चिन्यांनी तर कमाल केली आहे.

**जुन्या समाजघातक रुढी मोडण्याचे प्रत्यक्ष कार्य गणेशोत्सवात व्हावे.**



लँड स्लाईड झाली तरी वाहून न जाणारे लोखंडी रस्ते त्यांनी बांधलेत.

सायंकाळी गाडी जसवंतगढला पोहोचली. आपल्या अतुलनीय साहसाने चीन्यांशी ७२ तास सलग युद्ध करून वीरगती प्राप्त झालेले गढवाल रेडिमेंटचे सुभेदार जसवंतसिंग यांचे हे स्मारक. तटबंदीस्वरूप बांधणी केलेल्या या स्मारकाला या मार्गावरील सर्वजण आवर्जून भेट देतात.

शत्रूच्या बंदुका हिसकावून कड्याच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत धावत गोळीबार करत सुभेदार जसवंतसिंगांनी खूप जवान लढताहेत असा आभास निर्माण करून चिन्यांना ३ दिवस रोखून धरले. सेला व नूरा या स्थानिक बहिणींनी त्यांना खूप मदत केली. सर्व दारूगोळा अखेर संपला व चिन्यांनी सुभेदार जसवंतसिंगांना कैद करून झाडाला बांधले. संगिनीने शरीरावर अनेक ठिकाणी भोकसून लष्करी माहिती मिळविण्यासाठी जंग जंग पछाडले. पण प्रत्येक वेळी सरदार जसवंतसिंहाच्या मुखातून एकच गर्जना उठली 'जयहिंद'. शेवटी चिन्यांनी त्यांचे मस्तक धडावेगळे केले व ते चीनला घेऊन गेले. बाबा जसवंतसिंहाना वीरगती प्राप्त झाली. पण नंतर अनेकदा त्यांचा वावर त्या क्षेत्रात अनेकांना जाणवला आहे. कठीण प्रसंगी बाबा मदतीला धावतातच अशी तेथील सैनिकांची व स्थानिक जनतेची श्रद्धा आहे.

चीन युद्धात अत्यंत प्रतिकूलतेत आपली भारतीय सेना लढली. मराठा रेजिमेंटस्‌नी तर शौर्याची परिसीमा केली.

या दौऱ्यादरम्यान भेटलेली माणसं, चिरकाल स्मरणात राहतील. मंजूश्री विद्यापीठसारखे अनाथ-उपेक्षितांच्या शिक्षणासाठी उभे केलेले भव्य ज्ञानमंदिर हे लामा कु. पटेन फुंगसोफ यांचे सजीव स्मारकच म्हणावे लागेल. लामाकींनी बौद्ध तत्त्वज्ञानात पी.एचडी. संपादन केली. 'देश हा देव मानून त्याची सेवा करा' हा स्वामीजींचा संदेश मनी साठवून मॉनेस्ट्रीचे पारंपारिक काम सोडून अनाथांचे नाथ बनण्यात त्यांचे थोरपण आहे. अत्यंत उत्साही हसरा-खेळता इथला शिक्षक-कार्यकर्तावर्ग इथे पूर्णवेळ राहून त्या अनाथ जीवांशी पूर्णपणे समरस झालेला आपणाला दिसतो.

येथील अत्यंत सुंदर चित्रे पाहून आम्ही सर्वजण सहजच उद्गारलो, ''काय सुंदर हात आहे'' पण तरुण मुख्यध्यापकांनी आम्हाला सांगितले की हात नसलेल्या कलाकाराची ही अदाकारी आहे आणि खरेच दोन्ही हात कोपरापासून नसलेल्या निपेनने एक




**जो सैनिक झुंजतो तोच वीर. जो कार्य करतो तो कार्यकर्ता.**

सुंदर पोपटाची जोडी कागदावर रेखाटून दाखविली. निमा नावाच्या विद्यार्थ्याला तर खांद्यापासून हात नव्हते. त्याने तर पायात पेन्सिल घेऊन हिमालयातील एका उत्तुंग शिखराचे निसर्गचित्र काढून सर्वांना अवाक केले. त्या भारलेल्या वातावरणात विद्यार्थिनींनी म्हटलेली देवी मंजुश्रीची (सरस्वती) प्रार्थना अजूनही कानात रुंजी घालते. अथक कर्मयोगात गढलेले लामाजी आपल्या सहयोगाच्या प्रतिक्षेत आहेत. आपल्या उन्हाळी हिवाळी सुट्ट्या आपण मंजुश्री विद्यापीठासाठी उपयोगात आणू शकतो का?

१९० माऊंट ब्रिगेडमधील सर्व लष्करी अधिकारी त्यांच्या अत्यंत शिस्तबद्ध व गतिमान कार्यपद्धतीने आपले लक्ष वेधून घेतात. केवळ एक तासाचा आनावरण सोहळा. पण या सर्वांनी दिवस-रात्र खपून तो अविस्मरणीय बनविला. कमालीची स्वच्छता, आकर्षक लँडस्केपिंग, भारदस्त मिलिटरी बँड, रेजिमेंट्सचे फडफडणारे ध्वज, भरजरी कनातींचे तंबू, रेड कार्पेट स्वागतपथ, चकचकीत भाड्यांनी शोभायमान चहा-पान व्यवस्था, सर्वांची नियोजित रंगीत तालीम हे सारे काही केवळ अद्वितीय, अनुपम असेच! या साऱ्याच्या खोलात शिरल्यावर उमगू लागते की आपण 'सिव्हिलीयन' इतके सुरक्षित का राहिले आहोत ते!


*With Best Compliments From*

**Galaxy Engineers**

***MANUFACTURERS OF STAINLESS STEEL,***
***HOTEL KITCHEN EQUIPMENTS,***
***EXHAUST SYSTEM, REFRIGERATION,***
***DINING TABLES & CHAIRS,***
***S.S. RAILING AND ALL TYPES OF S.S. FABRICATION***

**SHOAIB MEMON : 9822969707**

35/36, Wellesley Rd, Near Maldhakka,
Next to Indian Oil, Pune 411001. (M.S.) India
Tel.: 26128729 / 26128745, Fax: 91 - 20 - 26128729
Visit us at: www.galaxykitchenequipments.com


**जातीच्या उच्चनीचतेवर माझा विश्वास नाही.**

# विश्वव्यापार संघटना (WTO) ७ वी मंत्रीपरिषद, जिनिव्हा

*२९ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत जिनिव्हा येथे संपन्न झालेल्या या ७व्या मंत्री परिषदेला वर्धिनीचे सहकार्याध्यक्ष श्री. शिरीष पटवर्धन हे श्रमसेवा न्यासाच्या वतीने उपस्थित राहिले होते. या परिषदेच्या संदर्भातील त्यांचे अनुभव खाली देत आहोत.*

विश्वव्यापार संघटनेच्या (WTO) ७ व्या मंत्रीपरिषदेला जिनिव्हाला जाण्यासाठी व्हिसा केवळ चार दिवस आधी आल्यामुळे घाईघाईतच तयारी करून जिन्हिवा येथे पोहोचलो. पुण्यातील श्रमसेवा न्यासाच्या वतीने माझ्याबरोबरच ॲड. श्री. विद्याधर कुलकर्णी हेसुद्धा या परिषदेला उपस्थित होते. स्वदेशी जागरण मंच/फौंडेशन, भारतीय मजदूर संघ या संस्थांचे प्रतिनिधी मिळून आमचा सात जणांचा गट होता. जागतिक पातळीवर चालणाऱ्या या परिषदेच्या कामकाजाविषयी जाणून घेण्याची खूप उत्सुकता होती.

विश्व व्यापार संघटनेची स्थापना कागदोपत्री जरी सर्व देशांच्या फायद्यासाठी, व्यापारउदीम वाढविण्यासाठी, जगातील सर्व देशांत नियमांचा सारखेपणा आणण्याच्या उद्दिष्टांसाठी केल्याचे दाखविले जात असले तरी प्रत्यक्षात जगातील विकसित देशांनी, विशेषत: अमेरिकेसारख्या देशाने, 'World Governance' चे आपले स्वप्नं साकारण्यासाठी वापरलेले हे माध्यम आहे ही गोष्ट आता हळू हळू जगातील सर्व देशांच्या, विशेषत: विकसनशील देशांच्या लक्षात येते आहे. दोहा येथे झालेल्या मंत्रीपरिषदेत भारताने घेतलेल्या ठाम भूमिकेमुळे नंतरच्या सर्व परिषदांची दिशाच बदलली. शेती हे जगातील अनेक देशांचे व्यापारासाठी नव्हे तर 'जगण्यासाठीचे' माध्यम आहे आणि अमेरिकेसारख्या विकसित देशांसाठी ते 'व्यापाराचे' माध्यम आहे. त्यामुळेच शेती आणि शेतीवरच्या सवलती हा सर्वांत महत्त्वाचा कळीचा मुद्दा आहे. विकसित देश शेतीवरच्या सवलती (सबसिडी) कमी करण्याबाबत आग्रही आहेत पण त्याच वेळी स्वत:च्या देशात शेती उद्योगाला दिल्या जाणाऱ्या सवलतीचे मात्र रक्षण करीत आहेत. यासाठी वेगवेगळ्या युक्त्या-क्लुप्त्या ते वापरत आहेत, (उदा. 'ग्रीन बॉक्स', 'ब्ल्यू बॉक्स') या पार्श्वभूमीवर भारताचे तत्कालिन व्यापारमंत्री कै. मुरोसली मारन यांनी घेतलेल्या ठाम भूमिकेमुळे शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यात काही प्रमाणात बळकटी आली. त्यांच्या नंतर श्री. कमलनाथ यांच्यापर्यंत प्रत्येक केंद्रीय व्यापार मंत्र्याने भारताची भूमिका कायम ठेवली. दोहा परिषदेनंतर भारत, ब्राझील, चीन आणि रशिया या देशांचा **'BRIC'** या नावाने एक गट उभा राहिला आणि या गटाचे नेतृत्व जगातील अनेक विकसनशील देशांनी स्विकारायला सुरुवात केली. यातूनच जी-२०, जी-३३ असा विकसनशील देशांचा एक मजबूत गट उभा राहिला.

या सर्व परिषदांमधून सरकारी पातळीबरोबरच परिषदांना गेलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनीही महत्त्वाची भूमिका बजावली होती. या पार्श्वभूमीवर दर दोन वर्षांनी होणारी ही परिषद जिन्हिवा येथे तब्बल चार वर्षांनी घेण्यात आली. त्याचे आयोजन करताना

**सत्कृत्ये ही मर्त्य जगात अमरत्व देणारी अपूर्व रसायने आहेत.**

मात्र अनेक बदल जाणीवपूर्वक केले असावेत असे जाणवले. (१) नेहमी चार ते पाच दिवस चालणारी ही परिषद या वेळी फक्त दोन दिवसांसाठी आयोजित करण्यात आली. (२) आजपर्यंत नोंदणी असलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींच्या संख्येवर आयोजकांमार्फत फार मर्यादा घालण्यात आली नव्हती. यावेळी मात्र स्वयंसेवी संस्थांना १ ते २ प्रतिनिधीनाच परवानगी देण्याचे आयोजकांचे धोरण होते. (३) शेती आणि शेतीवरच्या सवलती हा विषय अनिर्णयित अवस्थेत आहे आणि २०१० पर्यंत त्यावर एकमताने निर्णय घेणे आवश्यक असतानाही हा विषय परिषदेच्या विषयपत्रिकेवर नव्हता किंबहुना कोणतीच चर्चा (negotiations) या परिषदेत होणार नसल्याचे आयोजकांकडून सांगितले जात होते. (४) ज्या ठिकाणी मंत्रीपरिषद होते तेथेच स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींची व्यवस्था आजवर होत होती. या वेळी स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींची व्यवस्था दुसऱ्या इमारतीत करण्यात आली. (५) मंत्रीपरिषदेत चालणाऱ्या चर्चा/सत्रे ऐकण्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या मोजक्याच प्रतिनिधींना बसण्याची परवानगी देण्याचे विश्वव्यापार संघटनेने धोरण राबविले. जागेची कमतरता ही लंगडी सबब त्यासाठी सांगण्यात आली. (६) आजच्या काळात मंदीसारखे जे अनेक प्रश्न आहेत त्याचे कारण दुसरे तिसरे काही नसून पर्यावरणाचा असमतोल हेच आहे हे भासवण्याचा प्रयत्न तेथे प्रसिद्ध झालेल्या जवळपास सर्व प्रचार साहित्यातून केल्याचे जाणवले. प्रलंबित असलेल्या अनेक प्रश्नांकडून लक्ष दुसरीकडे वेधण्याचा हा प्रयत्न असावा अशी शंका मनात येऊन गेली.

भारताचे विद्यमान व्यापारमंत्री श्री. आनंद शर्मा या परिषदेला उपस्थित होते. भारतातून आलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींबरोबर त्यांची एखादी अनौपचारिक भेट व्हावी असा प्रयत्न झाला पण त्याला त्यांनी 'मी स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींना येथे भेटायला आलो नाही' असे सांगून नकार दिला. परिषदेच्या शेवटच्या दिवशी त्यांची एक पत्रकार परिषद झाली. नेमके दोन दिवसात काय झाले? भारताची भूमिका कायम आहे ना? अशा अनेक गोष्टी जाणून घेण्यासाठी पत्रकारांप्रमाणेच अनेक स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी या परिषदेला उपस्थित होते. पण या पत्रकार परिषदेतही कोणत्याच प्रश्नाला त्यांनी समाधानकारक आणि मोकळेपणाने उत्तरे दिली नाहीत. त्यांच्या या भूमिकेमुळे भारताची भूमिका बदलली नाही ना अशी शंका अनेकांना चाटून गेली. शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधी एका विदेशी पत्रकाराने विचारलेल्या प्रश्नावर त्यांनी दिलेले उत्तर संतापजनक होते. अर्थात हा प्रश्न चुकीचा विचारला गेल्याने मिळालेल्या संधीचा त्यांनी उपयोग करीत शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न मोठा असल्याचे सांगण्याचा प्रयत्न जाणूनबुजून 'sponsored NGOs' कडून होतो आहे असे सांगितले. त्यांच्या या उत्तराने उपस्थित भारतीयांना संताप येणे स्वाभाविक होते.

या तीन दिवसांच्या कालावधीत वेगवेगळ्या गटांच्या कार्यक्रमांना, पत्रकार परिषदांना उपस्थित राहता आले त्यामुळे जगातील वेगवेगळ्या देशातील (विशेषत: विकसनशील देशातील लोकांना) या करारामुळे काय सोसावे लागत आहे हे प्रत्यक्ष ऐकता आले. त्या देशातील प्रतिनिधीबरोबर अनौपचारिक

**राष्ट्रीयत्वाचा पाया म्हणजे राष्ट्रीय विभूतींचे इतिहास होत.**

गप्पा मारता आल्या. घाना आणि फिलिपाईन्स या देशातील प्रतिनिधींनी करारामुळे आता काय काय सोसावे लागत आहे हे एका चर्चासत्रामध्ये सांगितले. करारातील आयाती संबंधीच्या तरतुदीमुळे या देशातील शेती आणि उद्योग कसे संकटात सापडले आहेत हे ऐकताना आपल्या देशातील शेतकऱ्यांच्या समस्या डोळ्यासमोर उभ्या राहिल्या. आफ्रिकन देशांच्या प्रतिनिधींनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेमुळे आणि वाटलेल्या माहितीपत्रकांमुळे अफ्रिकेतील अत्यंत मागास देशांच्या प्रश्नाच्या मुळाशी हा करार कसा संबंधित आहे, विकसित देश वर्ल्ड बँक आणि आय.एम.एफ. या वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांचा उपयोग अशा अडचणीत आलेल्या देशांना आणखीन दबवण्यासाठी कसा करतात हे समजले. 'बनाना कंट्रीज' या टोपणनावाने ओळखल्या जाणाऱ्या अफ्रिकेतील काही देशांच्या प्रतिनिधींमुळे हे सर्व देश कर्जबाजारी का आणि कसे झाले हे समजले आणि विकसित देशांच्या, वर्ल्ड बँकेसारख्या वित्तीय संस्थांच्या जीवघेण्या धोरणांची चीड आली.

**वर्धिनीसारख्या संस्थांचे काम महत्त्वाचे आहे. ते करायलाही हवे आणि वाढायलाही हवे. तरीसुद्धा या पुढच्या काळात जगातील विकसित देशांशी सतत टक्कर द्यावी लागणार असल्याने 'आर्थिक बळाच्या आणि विश्वव्यापार संघटना वर्ल्डबँक यासारख्या माध्यमांच्या द्वारा' जगाला लुटण्याचे, गुलाम करण्याचे विकसित देशांचे डावपेच ओळखावे लागतील. त्यासाठी अशा चालणाऱ्या विषयांचा अभ्यास करावा लागेल आणि कामाचे क्षेत्र कोणतेही असले तरी जागरूकपणे या लढाईसाठी आपापल्या क्षेत्रातून ही लढाई लढू शकणारे आणि जिंकू शकणारे सैनिक उभे करावे लागतील याची जाणीव या मंत्रीपरिषदेला जाण्यामुळे निर्माण होऊ शकली.**

*With Best Compliments From*

DONATE GENEROUSLY FOR : VANAVASI WELFARE

TO

**SHREE SUNDERNARAYAN**

**GANESH SANSKAR KENDRA**

DEOBANDH, TALUKA KHODALA, DIST. THANE

❖ INSERTED BY ❖

**S. R. PUSALKAR & CO.**

MUMBAI

**रावणाचा निहन्ता श्रीराम जोपर्यंत हिदुस्थानात आहे**
**तोपर्यंत हिंदुस्थानची उन्नति सहजलब्ध राहणारी आहे.**

# ग्रहणांचा अभ्यास कशासाठी?

**श्री. सुनील कुलकर्णी**

माणसाला फार प्राचीन काळापासून निसर्गात दिसणाऱ्या अनेक गोष्टींबद्दल कुतुहल वाटत आले आहे. निसर्गातील ही कोडी उलगडण्याचा त्याचा प्रयत्न सतत चालूच आहे.

आकाशातील तारे, ग्रह, धूमकेतू, उल्कावर्षाव, ग्रहणे ह्याबद्दल सर्वसामान्य माणसालाही कुतुहल असतेच. वैज्ञानिक त्यांच्या पद्धतीने त्याचा अभ्यास करून विश्वरचनेचे गूढ उलगडण्याचा प्रयत्न करतात तर सामान्य लोक त्यातील मौज अनुभवतात.

शाळेत असताना आपण ग्रहणे म्हणजे काय? ती कशी होतात, कधी होतात, हे मॉडेल्सच्या साह्याने जाणून घेतो. पण आपल्या परिसरातील कधीतरी दिसणारी ग्रहणे प्रत्यक्ष अनुभवायलाच हवीत.

सूर्यग्रहण ही घटना कोणाच्याही नजरेत भरणारी गोष्ट आहे. रामायण महाभारतातसुद्धा खग्रास सूर्यग्रहणाचा उल्लेख सापडतो. इ.स. पूर्व ५८५ मधील ग्रीक इतिहासातील नोंद मजेदार आहे. दोन राज्यांमध्ये युद्ध चालू असताना भरदिवसा रणांगणावर अंधार पसरला. घाबरून जाऊन दोन्ही राज्यांनी युद्ध थांबवले अन् शांतीचा करार झाला. इसवी सनाच्या ५व्या शतकात आर्यभट्टांनी तर १२ व्या शतकात भास्कराचार्यांनी ग्रहणे ही राहू केतू राक्षसांमुळे होत नसून हा सावल्यांचा खेळ आहे असे सांगितले (२१ व्या शतकातसुद्धा आमच्या पत्रिकेत राहू केतू ठाण मांडून बसले आहेत, आहे ना गंमत!)

इ.स. पूर्वी २ऱ्या शतकात ग्रीक शास्त्रज्ञ हिप्पार्कसने चंद्रग्रहणाचे दोन निरनिराळ्या शहरातून निरीक्षण केले. या निरिक्षणांच्या आधारे चंद्राचे पृथ्वीपासून अंतर मोजण्याचा प्रयत्न केला. युरोपमध्ये ग्रहणांचा शास्त्रीय अभ्यास प्रथम केपलरने १६०५ मध्ये केला. यानंतर मात्र ग्रहणांचा सखोल अभ्यास करण्याची परंपरा चालू झाली.

४०० वर्षांपूर्वी १६०९ साली गॅलिलिओने पहिल्यांदा दुर्बीण बनवली आणि सूर्य, चंद्र, तारे ह्यांच्या अभ्यासास गती आली.

आपणा सर्व सजीव सृष्टीचा जीवनदाता सूर्य! त्याला जास्तीत जास्त जाणून घ्यायला हवेच! त्याचा अभ्यास करण्यासाठी त्याचे प्रखर तेज हीच एक मोठी अडचण असते.

सूर्याच्या रंगावरणाचे (क्रोमोस्फिअर) तापमान असते १०,००० ते २०,०००°C तर घनता सूर्यापेक्षा १००० पटीने कमी त्यामुळे प्रकाशाची तीव्रता कमी. ह्याचा अभ्यास करण्यासाठी खग्रास सूर्यग्रहणाची पर्वणी वैज्ञानिक साधतात. रंगावरणाच्या बाहेरच्या बाजूस असते ती सौरप्रभा (करोना). सौरप्रभेतून बाहेर फेकले जाणारे प्रोटॉन्स, त्याचे चुंबकीय क्षेत्र ह्याचा अभ्यास इतर वेळी थोडी फार विशेष उपकरणे वापरून काही शास्त्रज्ञ करतात परंतु खग्रास सूर्यग्रहणाच्या वेळी अतिशय सुंदर दिसणाऱ्या सौरप्रभेचा अभ्यास प्रामुख्याने केला जातो. ह्याच काळात सौर डागांचा अभ्यास, सौर वारे, सौर चक्र, त्याचा पृथ्वीवर होणारा परिणाम ह्याचा अभ्यास मुख्यत्वे केला जातो.


**रावणाला दहा तोंडे आणि वीस हात होते म्हणून जितका अधिक गौरवाल,**
**तितक्या अधिक पटीने त्यास जिंकणारा राम अधिकतर पराक्रमी ठणणार.**

सूर्याच्या पृष्ठभागावर दर ११ वर्षांनी नियमित बदल होतात ते का होतात. ह्याचेही संशोधन सुरू आहे.

इ.स. १८६८ साली महाराष्ट्रातील विजयदुर्गावरून खग्रास सूर्यग्रहणाचा अभ्यास करताना हेलियम वायूचा शोध लागला.

सन १९१६ साली आईन्स्टाईनने व्यापक सापेक्षतावादाचा सिद्धांत मांडला. हा सिद्धांत एका अर्थी गुरुत्वाकर्षणाचाच सिद्धांत आहे परंतु न्यूटनच्या सिद्धांतापेक्षा वेगळा. हा सिद्धांत प्रकाशकिरणांनाही लागू होतो. दूरवरच्या ताऱ्याकडून येणारे प्रकाश किरण सूर्यबिंबाजवळून जाताना सूर्याच्या गुरुत्वाकर्षणाने प्रकाशकिरणांच्या मार्गात बदल होतो व त्यामुळे ताऱ्यांच्या स्थानात बदल झालेला दिसतो.

आईनस्टाईनच्या ह्या भाकिताचा पडताळा घेण्यासाठी मात्र तीन वर्षांचा काळ लागला. २९ मे १९१९ रोजी झालेल्या खग्रास सूर्यग्रहणाच्या वेळी दोन ब्रिटिश मोहिमा आखण्यात आल्या. एक मोहिम आफ्रिका खंडातील प्रिंझीपी ह्या बेटावर तर दुसरी मोहिम ब्राझीलमध्ये होती. सूर्यबिंबाजवळ असणाऱ्या ताऱ्यांची छायाचित्रे काढली गेली आणि ह्यांची तुलना ह्याच ताऱ्यांच्या जानेवारी महिन्यात सूर्यबिंबापासून दूर असताना काढलेल्या छायाचित्रांशी करून आईन्स्टाईनचा सिद्धांत योग्य असल्याचा निर्वाळा देण्यात आला. ह्या सिद्धांतावरूनच बुधाच्या कक्षेच्या गणितातील त्रुटी दूर झाल्या आणि आधुनिक विश्वरचनाशास्त्राचा पाया ह्या सिद्धांतावर उभा राहीला.




सूर्याशी निगडीत अशी अनेक कोडी आहेत.

**शतावधी ते जन्मा येती । मरोनी जाती ना गणती ।**
**देशासाठी मरती, त्यासी देशपति की बुध म्हणती ।।**



शास्त्रज्ञांच्या मते आपल्याला सूर्य अजून पुरेसा कळलेलाच नाही. सूर्यावर होणाऱ्या घडामोडींचा मानवी जीवनाशी काही संबंध आहे का? सूर्यावर दर ११ वर्षांनी बदल का घडतात? ह्या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरे मिळवायची आहेत. त्यासाठी विशेष उपकरणे तर लागतीलच परंतु खग्रास, कंकणाकृती सूर्यग्रहणांची संधी साधणे आवश्यक आहे.

सामान्य माणसांनी मात्र ह्या ग्रहणांची मौज अनुभवायलाच हवी. चंद्रग्रहण साध्या डोळ्यांनी दिसत असल्याने खग्रास चंद्रग्रहणात अत्यंत अंधुक, लालसर रंगाचा चंद्र निरखण्यात मजा नक्कीच येते. पृथ्वीच्या सावलीत शिरणाऱ्या चंद्राच्या बदलत्या रंगछटा बहुतेकांनी अनुभवल्या असतील. सूर्यग्रहणातील चंद्राची सावली आखीवरेखीव असते तर चंद्रग्रहणात पृथ्वीची सावली मात्र तेवढी आखीव रेखीव नसते कारण पृथ्वीवरील वातावरण!

खग्रास सूर्यग्रहणाचा आविष्कार तर आणखीच रोमांचकारक! १६ फेब्रुवारी १९८० साली भारतात सुमारे ८२ वर्षानंतर खग्रास सूर्यग्रहण दिसणार होते. मी मराठी विज्ञान परिषदेबरोबर गोकर्ण महाबळेश्वर येथे ग्रहण बघण्यास गेलो. त्याचे अनुभव आजही अंगावर रोमांच आणतात. पांढऱ्या चादरीवरून पश्चिमेकडून येणारी चंद्राची भली मोठी सावली, (एरवी चंद्राची सावली कधी बघायला मिळणार?) तापमानातील घट, झाडावर स्तब्ध बसलेले पक्षी, आकाशात भरदिवसा दिसणारे बुध, शुक्र, तारे, बेलीज्, बीडस्, खग्रास स्थितीच्या क्षणभर आधी व नंतर दिसणारी डायमंड रिंग, काळा सूर्य व भोवताली तेजस्वी प्रभामंडळ हे सगळेच अनुभव चित्तथरारक होते.

ह्याच सुमारास दूरदर्शनवर वेगळीच गंमत असते. एका वाहिनीवरून ग्रहण दृश्ये, ग्रहण बघताना उत्तेजित झालेला समुदाय दाखविला जातो तर दुसऱ्या वाहिनीवरून एखादा ज्योतिषी ग्रहणाची शुभाशुभ फळे सांगत असतो, लोक स्नानासाठी रेटारेटी करताना, कर्मकांड करतानाची दृश्ये दाखवितात. किती विरोधाभास!

हा सावल्यांचा खेळ आहे. ह्यात काही शुभाशुभ नाही अन्नपदार्थ, पाणी काहीही खराब होत नाही हे सांगण्यासाठी, सिद्ध करण्यासाठी जमेल त्याने हा अनुभव अवश्य घ्यावा व ह्यानिमित्ताने समाजात असणाऱ्या अंध:श्रद्धांना तिलांजली द्यायचा प्रयत्न करायला हवा.



**शस्त्र पाप ना स्वयेचि । शस्त्र पुण्य ना स्वये।**
**इष्टता अनिष्टताही । त्यास हेतूनीच ये ।।**



# आकाशी झेप घेरे पाखरा...

श्री. विवेक साने





भारतीयांचा अवकाशाशी अगदी पुराण-काळापासूनचा संबंध आलेला दिसतो. महर्षी भारद्वाज यांनी 'यंत्र सर्वस्व' नावाचा विमान बनविण्याचा एक अप्रतिम ग्रंथ लिहिला. त्यात त्यांनी विमान चालविण्याची बत्तीस रहस्ये अत्यंत सुव्यवस्थित मांडलेली आहेत. याच ऋषींनी 'अंशुबोधिनी' नावाचा ग्रंथही लिहिला आहे. नारायण ऋषींनी 'विमान चंद्रिका' नावाचा ग्रंथ लिहिला. त्यात ते म्हणतात, जे पृथ्वी, जल व आकाशात पक्ष्याप्रमाणे वेगाने चालू शकेल त्याचे नाव 'विमान'. शौनक ऋषींनीही त्यांच्या 'व्योम यानतंत्र' नावाच्या ग्रंथात म्हटलंय की, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी आकाश मार्गाने जे जाऊ शकेल ते विमान होय. विश्वंभर ऋषी म्हणतात, एका देशातून दुसऱ्या देशात किंवा एका ग्रहावरून दुसऱ्या ग्रहावर जाऊ शकेल ते विमान होय. गर्ग ऋषींचा 'यानबिंदू', चाक्रायणी ऋषींचा 'खेट्यान प्रदीपिका', धुंडीनाथ ऋषींचा 'व्योमयानार्कप्रकाश', अगस्त्य ऋषींचा 'शक्तीसूर्य', ईश्वरऋषींचा 'सौदामिनी कला' शाक्त्यायन ऋषींचा 'वायुतत्त्व प्रकरण', नारदमुनींचे 'वैश्वानर तंत्र' व 'धूम तंत्र' असे कितीतरी प्राचीन ग्रंथ भारतीयांच्या अवकाश ज्ञानाची माहिती देतात.

खगोल विज्ञानाला वेदाचा तिसरा नेत्र असे म्हटलंय. ऋग्वेद, शतपथ ब्राह्मण इ. ग्रंथात याविषयी फारच मौलिक माहिती आलेली आहे. ऋषी दीर्घतमस तर, सूर्याचा अभ्यास करूनच अंध झाले. ऋषी गृत्समद यांनी चंद्राचे मानवी गर्भावर होणारे परिणाम यासंबंधी सांगितले आहे. यजुर्वेदाच्या १८ व्या अध्याया-मधील ४० व्या मंत्रात सूर्याच्या किरणांमुळे चंद्र प्रकाशतो असे म्हटलंय. सुमारे १५०० वर्षांपूर्वी, पाटलीपुत्र नगरीमध्ये आर्यभट्टाची एक वेधशाळा होती. तिचा उपयोग करून त्यांनी बरेच खगोलीय निष्कर्ष काढले.

भास्कराचार्यांनी आपल्या 'सिद्धांत शिरोमणी' या ग्रंथातील यंत्राध्याय प्रकरणात म्हटलंय की, ''काळाच्या सूक्ष्म भागांचे ज्ञान यंत्रांच्या उपयोगाशिवाय असंभव आहे, म्हणून मी आता यंत्राच्या संबंधात सांगतो आहे.'' त्यांनी नाडीवलयंत्र, यष्टियंत्र, घटियंत्र, चक्रयंत्र, शंकुयंत्र, चाप, तुर्य, फलक इत्यादींचे वर्णन त्यामध्ये केले आहे.

भास्कराचार्यांची मुलगी लीलावतीचीही खगोल विज्ञानासंबंधीची जिज्ञासा प्रसिद्ध आहे. सायणाचार्यांनी प्रकाशाच्या गतीचे वर्णन केले आहे.

श्रीमत् भागवतात शुकदेवांना राजा परिक्षित विचारतो की, ''ब्रह्मांडाची व्याप्ती किती आहे?'' तेव्हा ते ब्रह्मांडाच्या विस्ताराचा उल्लेख करताना म्हणतात, ''आपले जे ब्रह्मांड आहे, ते त्याच्या दहापट मोठ्या आवरणाने झाकले आहे. वरचे प्रत्येक आवरण त्यापेक्षा दहापट मोठे असून अशी सात आवरणे मला ज्ञात आहेत. या सर्वांसहित हे संपूर्ण ब्रह्मांड- ज्यामध्ये परमाणु समान दिसते, ज्यामध्ये अशी कोट्यावधी ब्रह्मांडे आहेत ते सर्व कारणांचे कारण आहे.''

पांडवांचे आजोबा उपरिचर वसु हे कायम इंद्राने देऊ केलेल्या विमानातून, फिरायचे.

रामायण काळात मेघनाथ हा सुपर सॉनिक म्हणजे स्वनातीत प्रकारच्या विमानातून, ध्वनीपेक्षा वेगवान विमानातून लढत होता असा उल्लेख आहे. कुबेर, रावण विमान वापरत होते. विश्वकर्मा अशी विमाने

**धर्माज्ञेला औशाज्ञेला समाज-कर्तव्याला हो ।**
**पाळोनीया प्राणा द्याया सिद्ध, तयांचा शुभ लाहो ।।**

बनविण्यात वाकबगार होते.

आता आपल्या देशाच्या स्वातंत्र्यानंतरच्या अवकाश भरारीचा वेध घेऊ. स्क्वाड्रन लीडर राकेश शर्माच्या रूपाने पहिल्या भारतीय व्यक्तीने अंतराळवीर म्हणून या क्षेत्रात पदार्पण केले. त्यांच्यानंतर कल्पना चावला व सुनीता विल्यम्स यांनीही अंतराळवीर म्हणून अवकाश मोहिमेत प्रत्यक्ष सहभाग घेतला. यांच्यापैकी कल्पना चावलाचे अंतराळ मोहिमेतून परततानाच झालेल्या दुर्दैवी अपघातात निधन झाले. सुनीता विल्यम्स हिचे वडील भारतीय वंशाचे पण ती जन्मापासूनच भारताबाहेर लहानाची मोठी झाली. भगवत् गीता हा सुनिता विल्यम्सचा आवडता ग्रंथ असून अवकाश मोहिमेतही भगवत् गीतेची प्रत तिच्याबरोबर ती ठेवते ही बाब अभिमान वाटावी अशीच आहे. भारताच्या दृष्टीने या तीनही अवकाशयात्रींचे योगदान ही एक महत्त्वाची गोष्ट आहे.

१ ऑक्टोबर १९५८ मध्ये अमेरिकेच्या 'नासा'ची स्थापना झाली. तर भारताच्या 'इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनाइझेशनची' (ईस्रो)ची स्थापना डॉ. विक्रम साराभाईंच्या नेतृत्त्वाने १९६९ मध्ये झाली.

इस्रोच्या स्वतंत्र अवकाशविभागाची निर्मिती १९७२ मध्ये झाली. १९७५ मध्ये भारताने पहिला उपग्रह 'आर्यभट्ट' सोव्हिएत युनियनच्या सहकार्याने अवकाशात सोडून या क्षेत्रात पहिले पाऊल टाकले.

अवकाशयान बनविण्याच्या क्षेत्रात आपण १९८० मध्ये आलो. एस.एल.व्ही-३ या अग्नीबाणाने 'रोहिणी' उपग्रहाला त्याच्या कक्षेत सोडले.

अमेरिकेच्या तुलनेत भारताच्या अवकाश कार्यक्रमाला २२ वर्षे उशिरा सुरुवात झाली. आणि अमेरिकेच्या वार्षिक खर्चाच्या तुलनेत 'इस्रो'चा अर्थसंकल्प केवळ ५% आहे. हे पाहता 'इस्रो'ची आजवरची प्रगती अभिमानास्पद आहे असे म्हणता येते. दूरसंचार, दूरदर्शन प्रसार, हवामान दूर संवेदक या उपग्रहांचे तंत्रज्ञान, अवकाशयान तंत्रज्ञान यात भारताचा दबदबा व एक खास 'ब्रँड' निर्माण झालेला आहे. पहिल्याच प्रयत्नात चंद्रावर यशस्वीपणे उपग्रह पाठविणारा देश म्हणूनही भारताचा या क्षेत्रांत दबदबा आहे. या क्षेत्रांतील प्रगत देशांना भारताबरोबर संयुक्त मोहिमा आखण्यात रस आहे हे जाणवते.

२०१०-११ मध्ये रशियाबरोबर संयुक्त प्रकल्पाद्वारे चंद्रावर एक उपग्रह व बग्गी उतरविण्याची भारताची योजना आहे. उपग्रहाला अवकाशात पुन्हा सुखरूपपणे पृथ्वीच्या पृष्ठभागावर उतरविण्याचे तंत्रज्ञान विकसित करणारा भारत हा जगातला अमेरिका, रशिया, चीन नंतरचा फक्त चौथा देश आहे. भारताला अजून मोठा पल्ला गाठावा लागणार आहे. भारतातील उद्योजकांचे योगदान, आराखड्याप्रमाणे उपग्रह, अवकाश याने, भूकेंद्र इ. 'टर्न की प्रोजेक्ट' किंवा 'टोटल आऊट सोर्सिंग' स्वरूपात पूर्ण करून देण्यासाठी सध्यातरी एकही खाजगी कंपनी भारताकडे नाही. उपग्रहीय सेवा पुरवणाऱ्या संस्थांचे खाजगीकरण होणे हे आवश्यक आहे, असे वाटते. अवकाश उत्पादने व सेवांची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत वाढती मागणी आहे व मागणीप्रमाणे उच्च दर्जाची उत्पादने/सेवा देण्याची भारतीयांकडे क्षमता आहे पण त्यादृष्टीने नव्या पिढीला प्रेरित करावे लागेल. म्हणून अँट्रिक्स कॉर्पोरेशन हा व्यापारी विभाग ईस्रोने स्थापन केलेला आहे. त्यायोगे ३०० हून अधिक तंत्रज्ञानांचे हस्तांतरण आत्तापर्यंत केलेले आहे.

भारताची या क्षेत्रातील एकंदर प्रगती नक्कीच अभिमानास्पद आहे. पण क्षमतेच्या मानाने आपली गती कमी आहे. २०२० साली विकसित देशाच्या रूपात आपला देश पाहायचा असेल तर कुसुमाग्रजांच्या शब्दात ''अनंत आमुची ध्येयासक्ती, अनंत अन् आशा । किनारा तुला पामराला ।'' अशा प्रेरणेने सर्वांना काम करीत राहावे लागेल.

**निधडी छाती, पुण्यकर्मात खरोखरीच अभिलषणी असते.**
**पापकर्मात ती मनुष्याला जास्तच हिडीस रूप देते.**

## आठवणी दाटतात

वर्षभरामध्ये वर्धिनीशी संबंधित काही कुटुंबांमध्ये व्यक्तिवियोगाच्या दुःखद घटना घडल्या. या कालावधीत खालील व्यक्तींचे देहावसान झाले.



- ❖ श्रीमती विमलताई देशपांडे
- ❖ सौ. शकुंतला नारायण हायगुंडे
- ❖ श्री. रघुनाथ उर्फ भाऊ घाणेकर
- ❖ सौ. विद्या दिलीपसिंग मोतीवाल
- ❖ सौ. कमलताई वाघले
- ❖ श्री. शंकरराव गानु
- ❖ अजिंक्य राजू अकोलकर
- ❖ श्री. गोपाळराव फडके
- ❖ ॲड. श्री. भा. गं. देशपांडे
- ❖ श्री. राजाभाऊ पांढरकामे
- ❖ श्रीमती हीराबाई कांबळे
- ❖ श्री. अमोल काळेल
- ❖ श्रीमती सद्‌गुणाबेन गुजराथी
- ❖ श्री. रमेश कानडे
- ❖ श्रीमती वसुधा सोहोनी
- ❖ सौ. अनुपमा गद्रे
- ❖ श्रीमती हीराबाई भाऊ भोसले
- ❖ श्रीमती इंदिराबाई कुलकर्णी
- ❖ श्री. वसंत विनायक आपटे
- ❖ श्री. प्रभाकर गानु
- ❖ श्री. बळीराम अर्जून सोनगिरे
- ❖ श्री. भाऊ फाटक
- ❖ श्री. प्रमोद जगताप



❖ **श्री. कांचनभाई शहा :** वर्धिनीचे संस्थापक सदस्य व ज्येष्ठ संघ स्वयंसेवक श्री. कांचनभाई शहा यांचे वृद्धापकाळामुळे दुःखद निधन झाले. ते ८५ वर्षाचे होते. कडबाकुट्टी व्यावसायिक म्हणून त्यांचा नावलौकिक होता. कडबाकुट्टी कारखानदारांच्या सहयोगातून वजनकाटा सुरू करण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. या संस्थेच्या माध्यमातून गरीब लोकांसाठी मोफत दवाखान्यासारखे अनेक उपक्रम त्यांनी यशस्वीपणे चालविले. वर्धिनीच्या कामासाठी त्यांनी स्वतःच्या कडबाकुट्टीची जागा तसेच वजनकाट्याच्या इमारतीमधील जागा उपलब्ध करून दिली होती. राजकीय पक्षातही त्यांनी अनेक वर्षे त्यांनी संघटक या भूमिकेत काम केले होते.

❖ **श्री. अतुल उरसळ :** महाविद्यालयीन जीवन नुकतेच सुरू झालेल्या अतुलच्या पायावर अचानक गाठी येऊ लागल्या. घरगुती उपचारानंतर हॉस्पिटलमध्ये तपासण्या कराव्या लागल्या आणि निदान झालं कॅन्सरचं. हा जीवघेणा आजार १६ व्या वर्षीच मागे लागला, तरीही अतुलच्या चेहऱ्यावरील उत्साह ओसरला नव्हता. या नव्या आजाराला मित्र कसा बनवता येईल याचा त्याने मनापासून प्रयत्न केला. अशा आजारपणातच बारावीची परीक्षा दिली आणि ६५ टक्के गुण मिळविले. एका मोठ्या शस्त्रक्रियेनंतर तब्येत सुधारण्याची चिन्हे दिसू लागली, पण या शत्रूने त्याला पुन्हा गाठले आणि पाहता पाहता हसतमुख अतुल अंथरुणाला खिळला. अखेर १८ नोव्हेंबरच्या रात्री त्याचे दुःखद निधन झाले.


❖ **कुमार अजय विश्वनाथ भगेकर :** वर्धिनीच्या स्वामी अखंडानंद शाखेतील वर्धक कुमार अजय विश्वनाथ भगेकर याचे एका दुर्दैवी अपघातामध्ये दुःखद निधन झाले. अजय हा वर्धिनीच्या सर्व शाखांमध्ये त्याच्यामधील हुशारी, हजरजबाबीपणा आणि सहज मैत्री करण्याच्या गुणांमुळे प्रसिद्ध होता. त्याच्या वियोगाने त्याच्या कुटुंबियांचेच नाही तर वर्धिनीचेही खूप नुकसान झाले आहे.

***या सर्व कुटुंबियांच्या दुःखात वर्धिनी सहभागी आहे.***

**बलिदानाविण वीरांच्या परि राष्ट्रोद्धारही कसा घडे ।**

## आर्थिक स्थिती आणि भविष्यातील आर्थिक गरज

आजीआजोबा नातवंडांशी गप्पा मारताना अनेकदा आपल्या लहानपणी किती स्वस्ताई होती आणि किती कमी पगारामध्ये घरखर्च भागायचा याचे आकडे सांगतात. ते ऐकून नातवंडे आश्चर्य व्यक्त करतात. १०० रुपये दरमहा पगार होता असं ऐकल्यावर असं कसं शक्य आहे असा भाव त्यांच्या चेहऱ्यावर असतो कारण त्यांच्या खाऊला सुद्धा १०० रुपये पुरत नाहीत हे त्यांना माहिती असतं. व्यक्तीजीवनात जे तेच संस्था जीवनात दिसतं. पाहता पाहता वर्धिनीच्या कामाला तीस वर्षे पूर्ण झाली. आजच्या काळात वर्धिनीचा दरमहा होणारे खर्चाचे आकडे पाहिले की १९८०-८१ मध्ये संपूर्ण वर्षाचा खर्च २१०००/- च्या आसपास होता हे सांगूनही खरे वाटत नाही. खर्चाचे आकडे वाढत गेले कारण कामाचा विस्तारही होते गेला आणि महागाईचा राक्षस तर सर्वांच्याच पाठीशी लागलेला आहे. कारणं काही असली तरी खर्च वाढतो आहे आणि वाढत राहणार ही वस्तुस्थिती आहे. वाढलेला खर्च हा जेव्हा कामाच्या वाढीमुळे आहे हे दिसतं त्यावेळी आपल्यासारखे आर्थिक पाठीराखे आनंद व्यक्त करतात कारण वर्धिनी सारख्या संस्थेकडून त्यांची हीच अपेक्षा असते. आर्थिक वर्ष २००८-०९ ची आर्थिक स्थिती सांगायची झाली तर एकूण जमा रक्कम आहे रुपये ३४,७८,६१६ आणि एकूण खर्च झाला आहे रुपये २९,५७,८४८/- झालेल्या खर्चाची विभागणीही आपल्यासमोर मांडणे आवश्यक आहे. ती खालीलप्रमाणे आहे.




**वर्षभराचा एकूण खर्च**

**करांपोटी झालेला खर्च**
रु. ७३,४११/- **(२.४८ %)**

**व्यवस्थापकीय खर्च/घसारा**
रु. ४,४५,०९४/- **(१५.०५ %)**

**उद्दिष्टांवर झालेला खर्च**
रु. २४,३९,३४३/- **(८२.४७%)**

विस्ताराच्या दृष्टीने सांगायचे तर चऱ्होली येथे संस्थेच्या असलेल्या एक एकर जमिनीवर शहरी-ग्रामीण भागातील गरजू मुली व महिलांसाठी जे बहुउद्देशिय प्रशिक्षण केंद्र उभे करायचे आहे त्या कामाला येत्या वर्षात गती मिळेल. या ठिकाणी बांधण्याच्या वसतीगृह व प्रशिक्षण केंद्राच्या इमारत प्रकल्पासाठी सुमारे ३.०० कोटी खर्च येईल असा अंदाज आहे. यामध्ये नर्सिंग पदविका अभ्यासक्रम यासह अन्य अल्पकालीन उद्योग प्रशिक्षण वर्ग सुरू करण्याची कल्पना आहे. <u>३१ मार्च २०११ पर्यंत संस्थेच्या आयकराच्या ३५-एसी या कलमा अंतर्गत एकूण रुपये १,४५,००,०००/- देणगी गोळा करण्याची अनुमती मिळालेली असून देणगीदारांना १०० टक्के आयकर सवलत त्यावर प्राप्त आहे.</u> आपल्या सर्वांना विनंती की आपण यामध्ये आपला सहयोग तर द्यावाच पण आपल्या स्नेह्यांनाही वर्धिनीच्या वतीने विनंती करावी. आपण ज्या आत्मियतेने आजवर या कामाचे पालन-पोषण केले आहे ते तसेच यापुढेही चालू राहील असा विश्वास वाटतो.

**भीतीने वा दुसऱ्या काही सबबीने अन्यायाचा प्रतिकार न करणे म्हणजे देशद्रोह करणे.**

# दैनंदिन शाखा आणि प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**शाखा विभागप्रमुख– श्री. विनोद बिबवे ✆ : ९८५०८९०८२२ भाग १ : भागप्रमुख : श्री. चेतन पैलवान ✆ : ९८८१२३०३०२**

- **समर्थ रामकृष्ण शाखा**
  २/१, मंगळवार पेठ, पारगे चौक,
  पुणे – ४११ ०११.
  शाखाप्रमुख – **श्री. मंदार पोफळे**
  ✆ : ९८८११४७३८६३
  युवकप्रमुख – **श्री. अभिषेक तांबट**
  ✆ : ९१८६०६६६८८३

- **स्वामी योगानंद शाखा**
  नवीन मराठी शाळा, शनिवार पेठ,
  पुणे – ४११ ०३०
  शाखाप्रमुख – **श्री. अमोल कुसुरकर**
  ✆ : ९७३०००३४६५
  युवकप्रमुख – **श्री. गणेश जसवंते**
  ✆ : ९७६६३०५५७०

- **स्वामी श्रद्धानंद शाखा**
  महर्षि आण्णासाहेब शिंदे विद्यालय
  घोरपडे पेठ, पुणे – ४११ ०४२
  शाखाप्रमुख – **श्री. निखिल नवले**
  ✆ : ९५९५०३४३०९
  युवकप्रमुख – **श्री. सचिन शितोळे**
  ✆ : ९३२६६५४९१७

- **भगिनी निवेदिता शाखा**
  आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ,
  पुणे – ४११ ०११
  शाखाप्रमुख – **सुप्रिया फुलावरे**
  ✆ : ९७६५४१७२६०
  शाखा पालक–**विद्याताई किंजवडेकर**
  ✆ : ९९७५४३४७४६

**भाग २ : भागप्रमुख : श्री. प्रशांत कवडे ✆ : ९९७०३०१०५५**

- **स्वामी अखंडानंद शाखा**
  कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय
  बिबवेवाडी, पुणे – ४११ ०३७
  शाखाप्रमुख – **श्री. हर्षद कुलकर्णी**
  ✆ : ९९६००२०३४४
  युवकप्रमुख – **श्री. दत्ता सकट**
  ✆ : ९२७००१९१२७

- **स्वामी दयानंद सरस्वती शाखा**
  विश्वकर्मा विद्यालय, अप्पर इंदिरानगर,
  पुणे – ४११ ०३७
  शाखाप्रमुख – **श्री.चेतन महिंद्रकर**
  ✆ : ९७६७७२५२९४
  युवकप्रमुख – **श्री. राहूल जगताप**
  ✆ : ९९६०७३१८७६

**भाग ३ : भागप्रमुख : श्री. महेश पवळे ✆ : ९८५०६०७०८८**

- **स्वामी सुबोधानंद शाखा**
  ज्ञानदा प्रशाला, नवसह्याद्री वसाहत,
  कर्वेनगर, पुणे – ४११ ०५२
  शाखाप्रमुख – **श्री. मयुर शेडगे**
  ✆ : ८०८७२११२९९
  युवकप्रमुख – **श्री. शिवाजी खरात**
  ✆ : ९७६५५५९११२

- **स्वामी ब्रह्मानंद शाखा**
  म.न.पा. शाळा क्र. १६८, हिंगणे खुर्द,
  पुणे – ४११ ०५१
  शाखाप्रमुख – **श्री. गुरुप्रसाद मुळे**
  ✆ : ९९७००९०६२२
  युवकप्रमुख – **श्री. रोहित सावले**
  ✆ : ९८६०४३१०६१

- **राजर्षी शाहू शाखा**
  सरस्वती विद्यामंदिर, कमिन्स कॉलेज जवळ,
  शाहू कॉलनी, कर्वेनगर, पुणे – ४११ ०५२
  शाखाप्रमुख – **श्री. मयुर लोयरे**
  ✆ : ९९२११५९०५९
  युवकप्रमुख – **श्री. केदार भंडारे**
  ✆ : ९४२२३०३७१९

**शाखा संपर्काच्या वेळा :**
*सोमवार ते शुक्रवार*
सायं. ६ ते ८.३०,
*शनिवार*
दुपारी ४.३० ते ७.३०,
*रविवार*
सकाळी ७.३० ते १०.३०

**भाग ४ : भागप्रमुख : श्री. संदीप मोरे ✆ : ९९२२२४८७८३**

- **स्वामी विवेकानंद शाखा**
  रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय
  पांडवनगर,वडारवाडी, पुणे–१६
  शाखाप्रमुख – **श्री. भिमराव सुभेदार**
  ✆ : ९८९०२७१९७७
  युवकप्रमुख – **श्री. अमर वाबळे**
  ✆ : ९९२२०६६८२६

- **स्वामी अभेदानंद शाखा**
  वीर बाजीप्रभू विद्यालय
  गोखलेनगर, पुणे – ४११ ०१६
  शाखाप्रमुख – **श्री. विजय धोत्रे**
  ✆ : ९६०४७१७८१२
  युवकप्रमुख – **श्री. विक्रांत दिघे**
  ✆ : ९८६०५०२२०१

- **आजोळ (दुपार शाखा)**
  २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक,
  पुणे – ४११ ०११
  पालक– **सौ. मंजुषाताई कुलकर्णी**
  ✆ : ९८५०२०८००९
  (संपर्क – सोम. ते शनि. दु. २ ते ५
  रवि. सकाळी ७.३० ते १०.३०)

- **वीर अभिमन्यू बालशाखा**
  २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक,
  पुणे – ४११ ०११
  शाखापालक– **श्रीमती पुष्पाताई नडे**
  ✆ : ९८२२८२३७५७

**शिक्षण, विशेषत: सामाजिक सद्‌गुण आणि मानसिक नीतिमत्ता वाढविणारे असावे.**

## शारदामणि महिला विभाग

महिला विभाग प्रमुख **– श्रीमती पुष्पाताई नडे** ✆ : ९८२२८२३७५७

'पाकोळी' बालवाडी प्रमुख **– सौ. स्वातीताई कारेकर** ✆ : ०२०-२६१२१७०४

बचतगट समन्वयक **– सौ. वासंतीताई कुलकर्णी** ✆ : ९९७०२२७६४९

सह समन्वयक **– श्रीमती विद्याताई किंजवडेकर** ✆ : ९७६३३६९९८५

### उद्योगशिक्षण वर्ग

१) सहाय्यक परिचर्या (पुणे वर्ग) **– सौ. विजयाताई कुलकर्णी, सौ. लता सत्तूर, सौ. कुंदा जोशी**

सहाय्यक परिचर्या (पौड वर्ग) **– डॉ. सौ. वैदेही व डॉ. सचिन नगरकर, सौ. नंदाताई बेंडखळे, कु. अमृता फाले**

सहाय्यक परिचर्या (वेल्हा वर्ग) **– श्रीमती अंजुम सय्यद, कु. प्रतिभा शिवतरे, कु. सुप्रिया गायखे, सौ. शशीकला वीटेकर**

२) शिवण वर्ग **– सौ. माधुरीताई गुरव, सौ. संगिता पाटील**

३) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग **– सौ. स्वातीताई कारेकर**

४) साक्षरता प्रसार **– श्रीमती सुगंधाताई कबीर**

## प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र –** सौ. मनिषाताई नरडेकर (०२०-२६१२१७०४)

**अभ्यासिका केंद्र –** सौ. सुवर्णाताई पाठक (०२०-२६१२१७०४)

**ग्रंथालय–** श्रीमती नीलाताई कुडलिंगार (०२०-२६१२१७०४)

**फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प**

श्री सुनील कुलकर्णी ✆ : ९६०४०१६७१५

**संगणक विभाग**

श्री अविनाश जोशी ✆ : ९३७१२७४८५१

**पुणे मनपा शिक्षण मंडळ आणि स्व-रूपवर्धिनी संयुक्त संचालित अभ्यासिका केंद्र**

औंध परिसर - श्री. श्यामसुंदर जोशी ✆ : ९२२६१११२३४

शुक्रवार पेठ - श्री. वसंतराव भिडे ✆ : (०२०) २४४७१५०८

पर्वती पायथा - प्रा. श्री. रमेश आपटे ✆ : ९४०३३५९९०८

**संपर्काच्या वेळा**

सोमवार ते शनिवार सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.००

**या या राष्ट्रहितार्थ नित्य झटुनी कर्तव्यकर्मा स्मरा।**

# असे उपक्रम... असे तास... असे दिवस

**संस्थेच्या इमारतीत चालणारे उपक्रम**

**सकाळी ६ ते दुपारी १२ वाजेपर्यंत**

१) व्यायामशाळा : सकाळी ६ ते ८
२) बालवाडी : सकाळी ८ ते दुपारी १२
३) अभ्यासिका : सकाळी ६ ते दुपारी १२

**दुपारी १२ ते सायं. ६ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) उद्योशिक्षण वर्ग, साक्षरता वर्ग : दुपारी १२ ते ४
२) आजोळ प्रकल्प (दुपारशाखा) : दुपारी २ ते ५
३) अभ्यासिका : दुपारी १२ ते सायंकाळी ६

**सायं. ६ ते रात्री १२ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) शाखाविभाग : सायं. ६ ते रात्री ९
२) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग : सायं. ६ ते रात्री ८
३) अभ्यासिका : सायंकाळी ६ ते रात्री १२

**आठवड्यातून एक दिवस चालणारे उपक्रम**

१) माता बालसंगोपन केंद्र (आरोग्य केंद्र)- प्रत्येक बुधवार
२) कुटुंब सल्ला केंद्र - प्रत्येक मंगळवार

**सोमवार ते रविवार चालणारे उपक्रम**

१) दैनंदिन शाखा प्रकल्प*
२) अभ्यासिका
३) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

**सोमवार ते शनिवार उपक्रम**

१) बालवाडी
२) उद्योग शिक्षण वर्ग
३) साक्षरता वर्ग
४) फिरती प्रयोगशाळा / ग्रामविकास प्रकल्प**
५) सेवावस्ती संस्कार वर्ग
६) कुटुंब सल्ला केंद्र
७) शिवणवर्ग
८) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण
९) बचतगट
१०) अभ्यासिका केंद्र

* हा प्रकल्प पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातील शाळांमध्ये संध्याकाळच्या वेळात चालतो.
** हा प्रकल्प मुळशी तसेच हवेली तालुक्यातील निवडलेल्या तेरा गावांमध्ये चालतो.
उर्वरित सर्व प्रकल्प संस्थेच्या इमारतीत त्यांच्या त्यांच्या वेळामध्ये चालतात.

**कार्यालयीन व्यवस्थापक**

श्री. शिवदास शंकर तथा आप्पासाहेब पोतदार,

**कार्यालय विभाग**

सौ. वासंती कुलकर्णी, कु. स्मिता कुलकर्णी, श्रीमती प्रगती तांबट, श्री. अशोकराव चिपळूणकर

(☎ २६१२१७०४, २६१३४३१०)

**कार्यालय**

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक,
पुणे - ४११०११.

**संपर्क**

सोमवार ते शनिवार, दु. ११.३० ते सायं. ५.३०

**सोडी गर्व स्वदेशभार हरण्या यत्नासि आधी करी ।**